**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**पृ. शी.** : नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. XIV OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.

(विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचे प्रस्ताव पुन: प्रस्तुत करण्यात आले)

**तालिका सभापती** : आता या विधेयकावरील एकत्रित चर्चा पुढे सुरु होईल. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील बोलतील.

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि. प. वि. क्रमांक 14- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, नगरपालिकेच्या या सुधारणा विधेयकामध्ये राज्य शासन दोन तीन गोष्टींच्या बाबतीत सुधारणा करावयास मागत आहे. यामध्ये प्रामुख्याने गणपूर्ती नसेल तर सभा घेण्याचा जो अधिकार दिलेला आहे त्याला माझा विरोध आहे. त्या ठिकाणी जाणूनबुजून नवीन अध्यक्ष किंवा सत्ताधारी पक्ष गणपूर्ती होऊ देत नाही. मग नगरपालिकेचे अध्यक्षच स्वत: कारभार करतील. त्यामुळे ही तरतूद चुकीची आहे, असे मला वाटते. कोणत्याही सभेमध्ये किंवा विधिमंडळामध्ये आपण कामकाज करीत असताना गणपूर्ती नसेल तर आपण सभागृहाचे कामकाज थांबवितो. परंतु त्या ठिकाणी गणपूर्ती नसेल तर ताबडतोब एक तासाने बैठक घेण्याची जी तरतूद

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. जयंत प्र. पाटील ....

केलेली आहे त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी उद्देश व कारणे सांगताना असे सांगितले की, त्या ठिकाणी कारभार थांबतो त्यामुळे ही तरतूद केलेली आहे. परंतु हे ठराविक ठिकाणी होते असे मला वाटत नाही. त्यामुळे ही सुधारणा करु नये असे मला वाटते.

सभापती महोदय, उपाध्यक्षांकडे चार्ज देण्याची जी सुधारणा आहे ती चांगली आहे. त्या सुधारणेचे मी स्वागत करतो. अध्यक्ष उपलब्ध नसतील तर उपाध्यक्षाकडे चार्ज देण्याची तरतूद चांगली आहे, असे मला वाटते. कारण जर त्या ठिकाणी अध्यक्ष रजेवर गेले किंवा अध्यक्ष मृत्यू पावले तर उपाध्यक्षाकडे चार्ज द्यावयास पाहिजे, असे मला वाटते. त्या ठिकाणी उपाध्यक्ष हे शोभेची वस्तू झालेले आहेत. त्यांना कोणताही अधिकार नव्हता. त्यामुळे ही तरतूद चांगली आहे. परंतु आपले खाते काय करते हे मला माहीत नाही. आपण जे नियम तयार करतो, जो कायदा तयार करतो त्या कायद्याची अंमलबजावणी 100 टक्के होते की नाही याबद्दल माझ्या मनामध्ये शंका आहे. खोपोली नगरपालिकेचे नगराध्यक्ष परवा जर्मनीला गेले. त्यांनी एक महिना रजा घेतली. त्या ठिकाणी उपाध्यक्षांकडे चार्ज न देता बैठक चालविली. त्या नगरपालिकांमध्ये आपल्या खात्याचे नियंत्रण आहे की नाही ? त्या ठिकाणी आपल्या खात्याचे नियंत्रण असल्याचे दिसून येत नाही.

सभापती महोदय, खोपोली नगरपालिकेची चार पाच प्रकरणे मी या निमित्ताने मांडणार आहे. त्या ठिकाणी नगरपालिकेवर कशा प्रकारे नियंत्रण ठेवतो हे बघावयास पाहिजे. ते मांडण्यापूर्वी मी दोन मुद्दे मांडणार आहे. नगरपालिकेचे अकाऊंट कोठे उघडावयास पाहिजे या बाबतीत नियम केलेले आहेत. असे असताना ते नियम डावलून अर्बन बँकांमध्ये आमच्या नगरपालिकांचे अकाऊंट्स उघडले गेले. रोहा बँक, पेण बँक, खोपोली बँक अशा बँकांमध्ये कोट्यावधी रुपये ठेवले गेले. त्या ठिकाणी नगराध्यक्षच बँकेचे चेअरमन असतात. बरीच वर्षे हे चालले आहे. अनेक वेळा मी सभागृहामध्ये याला विरोध केला आणि सांगितले की, हे चुकीचे चालले आहे. खोपोली नगरपालिकेचे पैसे अशा बँकेत ठेवले गेले. रोहा नगरपालिकेचे साडेतीन कोटी रुपये ठेवले गेले. पेण नगरपालिकेचे जवळजवळ साडेचार कोटी रुपये पेण अर्बन बँकेत ठेवले गेले. रोहा नगरपालिकेचे पैसे पेण अर्बन बँकेत आणि रोहा अर्बन बँकेत सुध्दा ठेवले गेले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/ पूर्वी श्री.बरवड 10:05

श्री.जयंत प्र.पाटील....

यावर शासनाचे नियंत्रण आहे की नाही ?

आम्ही कोणतेही काम करावयाचे म्हटले की, कायद्यातील तरतुदी दाखवून मुख्याधिकारी ते काम अडवितात. त्यामुळे आम्हाला कामे करता येत नाहीत. एखादी इमारत कितीही जुनी असली तरी सीआरझेडच्या तरतुदीमुळे त्या इमारतीच्या जागी नवीन इमारत बांधता येत नाही. कोस्टल झोनच्या बाजूला असलेल्या अनेक इमारती जुन्या झालेल्या आहेत. सभापती महोदय, पुण्याला समुद्र नसल्यामुळे आपण सुदैवी आहात. परंतु संपूर्ण कोकणपट्टयात समुद्र पसरलेला आहे. परंतु समुद्र हा आम्हाला वरदान आहे की शाप आहे ते आम्हाला कळत नाही. ज्या नगरपालिका कोस्टल झ ोनमध्ये आहेत त्या सर्व नगरपालिका क्षेत्रात सीआरझेड कायदा लागू आहे. मालवण, रत्नागिरी, चिपळूण, दापोली, वेंगुर्ले, अलिबाग, पनवेल या सर्व शहरांना सीआरझेड कायदा लागू आहे. परंतु सीआरझेडमुळे कोणतीही जुनी इमारत तोडून त्या जागी नवीन इमारत बांधता येत नाही. अलिबाग शहराच्या आजूबाजूलाच मँग्रोव्हजची झाडे आहेत. त्यामुळे या शहरात एकही विकासाचे काम करता येत नाही. या बाबीवर अधिकारी बरोबर बोट ठेवतात. परंतु आर्थिक व्यवहाराकडे मात्र त्यांचे लक्ष नाही. कदाचित मंत्री स्तरावरुन अधिकाऱ्यांना आदेश जात असल्यामुळे अधिकारी आमचे काम करीत नसतील, अशी वस्तुस्थिती आहे काय याची मला माहिती नाही. परंतु माननीय राज्यमंत्री श्री.भास्करराव जाधव हे सभागृहात मात्र अभ्यासपूर्ण उत्तरे देत असतात, मी त्यांचे कौतुक करीत असतो, त्यांचे अभिनंदन करीत असतो. परंतु त्यांना कोणतेच अधिकार नाहीत. नगरविकास विभागाच्या सचिवांना मी 3 वेळा बोलवून घेतले होते. ते सुध्दा गोड बोलतात, तुमचे काम ताबडतोब करतो असे सांगतात. प्रत्यक्षात काहीच कार्यवाही केली जात नाही.

विधानसभेच्या सन्माननीय सदस्या श्रीमती मीनाक्षी पाटील ह्या मागील काळात मंत्री असताना कोकण विभागाच्या मुख्यालयातील नगरपालिकांना शासनाने प्रत्येक वर्षी 75 लाख रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यापैकी पहिल्या वर्षी फक्त 50 लाख रुपये देण्यात आले. पुढच्या 12 वर्षांच्या काळात एक रुपया सुध्दा दिलेला नाही. या संदर्भात नागपूरच्या अधिवेशनात मंत्री महोदयांना भेटलो होतो. आपण नगरविकास विभागाच्या सचिवांना बोलवून घेतले होते. तरी देखील घोषित केलेला निधी आम्हाला मिळालेला नाही. मग या घोषणा कशासाठी केल्या जातात, बजेटमध्ये कशासाठी तरतुदी केल्या जातात ? त्यासंबंधी विचारणा केली तर सरकारकडे पैसे नाही अशी सबब सांगितली जाते.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, अर्थसंकल्पामध्ये सुध्दा राजकारण डोळ्यासमोर ठेवून तरतुदी केल्या जातात. या सरकारने फक्त राष्ट्रवादी पक्षासाठीच अर्थसंकल्प मांडावा. ज्या नगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या ताब्यात आहेत त्यांनाच निधीचे वाटप करावे. सभापती महोदय, हे पाप आहे आणि भविष्यात त्याची पुनरावृत्ती होऊ शकते. राज्याचा अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे त्याबाबत आमचाच आक्षेप नाही तर कॉंग्रेस पक्षातील लोकांचा सुध्दा आक्षेप आहे. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना मी सांगू इच्छितो की, आम्ही कोणाच्या मेहेरबानीवर राजकारण करीत नाही. आम्ही आमच्या नगरपालिकेमध्ये एक रुपयाचीही करवाढ केलेली नाही. 17 जागांपैकी 16 जागा आम्ही निवडून आणलेल्या आहेत. प्रत्येक जागा 700 ते 800 च्या फरकांनी निवडून आणलेली आहे. हा इतिहास एकदा नाही तर तीन वेळा घडविलेला आहे.

अलिबाग नगरपालिकेला शासनाने एक रुपयाचे अनुदान दिलेले नाही. अनुदान दिले असेल तर मंत्री महोदयांनी मला सांगावे. मंत्री महोदयांचे आणि माझे 25 वर्षांपासून चांगले संबंध आहेत. त्यामुळे मी त्यांच्याकडे एक काम घेऊन गेलो होतो. ते काम करण्याची त्यांची इच्छा आहे. परंतु सन्माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांना काहीच अधिकार नाहीत. त्यांनी आमचे काम करावयाचे म्हटले तरी पालक मंत्री आमचे काम अडवितात. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा यांना विचारतो असे सांगतात. मग आम्ही कोण आहोत, आम्ही या सभागृहात सदस्य म्हणून काम करीत आहोत. आम्हाला काहीच अधिकार नाहीत काय ? राज्याचा निधी ही खाजगी मालमत्ता आहे असे समजून वाटप होत असेल तर आम्ही या सभागृहात कशासाठी बसावयाचे, कशासाठी आम्ही अर्थसंकल्प मंजूर करावयाचा ? हे पाप आहे. त्याची पुनरावृत्ती होऊ शकते. सत्ताधाऱ्यांकडे कायम सत्ता राहू शकत नाही. हे शासनाने लक्षात ठेवावे. कधी ना कधी बदल हा होतच असतो. त्यामुळे मंत्री महोदयांनी मर्दासारखे रहावे. मंत्री महोदय हे छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज, मराठा आहेत असे आम्ही समजतो. मंत्री महोदयांना अधिकार नसलेले मंत्रीपद कशासाठी पाहिजे ?

यानंतर श्री.शिगम...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 10:10

श्री. जयंत प्र. पाटील...

माननीय राज्यमंत्री महोदयांना अधिकारच नाहीत. आपण जर या पध्दतीने काम करणार असाल तर ते योग्य नाही. याचा आपण गंभीरपणे विचार करा. माननीय राज्यमंत्री महोदय एक विशेष दंडाधिकारी नेमू शकत नाहीत...(अडथळा)..

सभापती महोदय, अर्थसंकल्पामध्ये आम्हाला निधी मिळत नसेल तर आम्हाला कोर्टात जावे लागेल. आम्ही कोणा मंत्र्यांकडे अमुक अमुक कामासाठी गेलो नाही. कारण आम्हाला या सभागृहाची ताकद माहीत आहे. या सभागृहाच्या ताकदीवर, आमच्या वाणीवर आणि कायद्याने जे काही अधिकार दिलेले आहेत त्याच्या जोरावर आम्ही आमचे पैसे घेऊ शकतो. आमची तेवढी ताकद आहे. त्या ताकदीवर आम्ही 50 वर्षे राजकारण आणि लोकांची सेवा करीत आलो आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी, पैसे देणार नाही असे एकदाचे जाहीर करुन टाकावे जेणेकरुन आम्हाला या ठिकाणी बोलावे लागणार नाही. जेथे राष्ट्रवादीची सत्ता असेल त्याच ठिकाणी पैसे देऊ, असे त्यांनी सांगावे. जिल्हा नियोजन मंडळाची बैठक घेण्याची मागणी मी डिसेंबर महिन्यापासून करीत होतो. निवडणुकीची आचारसंहिता येईल म्हणून त्याआधी बैठक घ्यावी अशी मागणी करीत होतो. परंतु आता जिल्हा नियोजन समित्या ह्या पालकमंत्र्यांच्या खाजगी मालमत्ता झ ालेला आहेत. मग ते राष्ट्रवादी पक्षाचे मंत्री असोत अथवा काँग्रेस पक्षाचे मंत्री असोत. आम्ही पैसे वाटपासंबंधी जेव्हा कोर्टात गेलो त्यावेळी कोर्टाने सरकारवर ताशेरे ओढले होते. आमचे 19 कोटी रुपये लॅप्स होत होते. ते सरकारकडे पाठविले. सरकारने ते परत नगरपालिकेकडे पाठविले. जिल्हा नियोजन मंडळाची बैठक घेतली नाही. ही बैठक न घेताच पैसे खर्च करण्याचे प्रयत्न पालकमंत्र्यांनी सुरु केले. मी त्या बाबतीत विरोध केला आणि सांगितले की असे करता येणार नाही. सभापती महोदय, 19 कोटी रुपये सरकारकडे परत पाठविले आणि सरकारने ते ताबडतोबीने कोकणातील नगरपालिकेकडे पाठविण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात मी नियोजन आणि अर्थ खात्याच्या सचिवांशी बोललो. जिल्हाधिका-यांशी देखील बोललो. माननीय मुख्यमंत्र्यांकडे नगरविकास खाते असल्यामुळे मी त्यांच्याशी दूरध्वनीवरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत होतो. परंतु त्यावेळी दूरध्वनी लागला नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत्या म्हणून जाणूनबुजून हे पैसे लॅप्स करुन ते नगरपालिकेला वाटले. जेथे राष्ट्रवादी पक्षाच्या उमेदवारांना मते मिळतील त्या ठिकाणी हे पैसे वाटले. हा प्रकार थांबला पाहिजे. जिल्हा नियोजन मंडळाच्या आणि नगरपालिकेच्या संदर्भात अशा त-हेने कारभार होत असेल तर ते आम्ही चालू देणार नाही. एका रात्रीत हा सर्व व्यवहार झाला. 31 तारखेला पैसे खर्च केले आणि 1 तारखेला अकाऊंट क्लोज केले. या संदर्भातील सर्व पत्रव्यवहार, फॅक्स इत्यादी कागदपत्रे मी पुरावे म्हणून ठेवलेले आहेत. मी या बाबतीत कोर्टात जाणार आहे. 30 तारखेला पैसे सरकारकडे पाठविले आणि ते पैसे सरकारने परत नगरपालिकेला दिले आणि त्याच रात्री 4 तासामध्ये 19 कोटी रुपये खर्च करुन टाकले. या राज्याच्या अर्थ खात्याचा हा एक आगळा नि वेगळा विक्रम आहे. असे असताना नगरविकास खात्याचे अधिकारी काय करतात ? तुमची ऑडिटची पध्दत आहे, त्यासाठी तुमचे सचिव जातात, अवर सचिव जातात..

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ प्रथम श्री. शिगम 10:15

श्री.जयंत प्र.पाटील...

टाऊन प्लॅनिंगचे अधिकारी जातात तसेच शिक्षण खात्याचे सभापती देखील जातात.

महोदय, आमच्या रागयड जिल्हयामध्ये खोपोली नगरपालिका ही एक वेगळीच नगरपालिका आहे. महाराष्ट्रामध्ये पिंपरी-चिंचवड आणि खोपोली या दोन नगरपालिका मोठया होत्या. सभापती महोदय, ऐकेकाळी या नगरपालिकांमधून सोन्याच्या धूर निघत असे. या दोन नगरपालिकांमध्ये नेहमी मोठया प्रमाणात निधी शिल्लक असावयाचा या गोष्टीची आपणाला चांगली माहिती आहे. आपण रमाकांतचा वडा खातच मुंबईत यावयाचे. मी आपणाला अनेक वेळा बघितले आहे. त्यावेळी तुम्ही मला ओळखत नसाल. कोणीही व्यक्ती रमाकांतचा वडा खाल्याशिवाय मुंबईला येत नसे आणि जाताना देखील तो वडा खाल्याशिवाय पुण्याला जात नसे. परंतु आता तो वडा खावयास मिळत नाही, त्याचे कारण माननीय श्री. नितीन गडकरी साहेबांनी एक्सप्रेस-वे सुरु केल्यामुळे बरेचसे प्रवासी आता परस्पर मुंबईस येतात आणि पुणे येथे जातात. आता या वडयाचा दर्जा देखील पूर्वीसारखा राहिलेला नाही.

सभापती महोदय, मी जे बोलतो आहे त्या गोष्टीचा आनंद माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांना होत आहे, त्याचे कारण असे आहे की, माननीय नगरविकास राज्यमंत्री महोदय, आपण खरे कार्यकर्ते आहात, आपण ग्रामीण भागातून या पदापर्यंत आलेला आहेत, तुम्हाला अन्याय झालेला सहन होत नाही आणि म्हणूनच आम्ही तुम्हाला मानतो. आम्ही तुमच्याकडे वेगळया नजरेने बघतो. तुम्हाला अन्याय सहन होत नसल्यामुळे तुम्ही कधीही खोटया गोष्टी करणार नाहीत याची मला खात्री आहे.

सभापती महोदय, खोपोली नगरपालिकेत अनेक गैरव्यवहाराची प्रकरणे झालेली आहेत. खोपोली नगरपालिकेची गेल्या वेळी निवडणूक झाली, मी स्वत: या नगरपालिकेच्या निवडणुकीत उतरलो. त्यावेळी मला फक्त तीन नगरसेवक कमी पडले. या नगरपालिकेत शेतकरी कामगार पक्षाचे 11 सदस्य मी प्रथमच निवडून आणले. मी नगरपालिका क्षेत्रात कमी परंतु ग्रामीण भागातील शेतकऱ्यांबरोबर जास्त प्रमाणात काम करणारा एक कार्यकर्ता आहे. खोपोली नगरपालिकेमध्ये तत्कालिन शिक्षण सभापती श्री. मंगेश दळवी यांनी 32 शिक्षकांची बेकायदेशीर भरती केली. शासनाची मान्यता नसताना शिक्षकांची भरती केली गेली. ऑडीटरने या बेकायदेशीर भरती संदर्भात ऑब्जेक्शन घेऊन त्यांच्याकडून 22 लाख रुपयांची वसुली करण्यात यावी अशा प्रकारची नोटीस

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

बजावली गेली. या प्रकरणाची संपूर्णपणे चौकशी केली गेली. प्राथमिक शाळेमध्ये डी.एड्.उत्तीर्ण असलेल्या शैक्षणिक पात्रतेचे शिक्षक नेमावयाचे असतात अशी तरतूद आहे. डी.एड.ची पात्रता असलेल्या शिक्षकांच्या पदांवर बी.एड.किंवा एम्.एड्.ची पात्रता असलेले उमेदवार शिक्षक म्हणून नेमले जात नाहीत व तशा प्रकारे शिक्षक नेमण्याचे अधिकार कोणालाही नाहीत. परंतु या ठिकाणी डी.एड.ची पात्रता असलेल्या शिक्षकांच्या पदावर बी.एड. आणि एम.एड. पात्रता असलेल्या उमेदवारांना शिक्षक म्हणून नेमले गेले आहे. अशा पध्दतीने ज्या उमेदवारांना नियुक्त्या दिल्या गेल्या आहेत, त्यांच्या नावांची यादी माझ्याकडे उपलब्ध आहे व ती यादी मी रेकॉर्डवर आणतो आहे.

महोदय, प्राथमिक शिक्षकासाठी शैक्षणिक पात्रता डी.एड.उत्तीर्ण अशी असताना या महाशयांनी 32 उमेदवारांना शिक्षक पदावर नियुक्त्या दिल्या. त्या अनुषंगाने ऑडीटने त्यांना 22 लाख रुपये वसुली बाबत नोटीस बजावली आहे. श्री. भूषण अरुण मित्री, श्री. अंनत सिताराम सोनावणे, श्रीमती रेखा पुंडलिक सोनावणे, श्रीमती स्वप्ना गोविंद शिंदे या व्यक्ती बी.ए.,बी.एड तसेच श्रीमती अलका सय्यद,एम.ए,बी.एड. श्री. तुपे, एम.ए.,बी.एड.पी.एच.डी.अशा शैक्षणिक पात्रता घेतलेल्या उमेदवारांना प्राथमिक शिक्षक म्हणून नियुक्त्या दिल्या गेल्या. त्या ठिकाणी प्राथमिक शिक्षकांच्या पदावर डी.एड. पात्रता असलेल्या उमेदवारांच्या नियुक्त्या न करता बी.ए.बी.एड. तसेच एम.ए.बी.एड.उत्तीर्ण असलेल्यांना प्राथमिक शिक्षकांच्या नियुक्त्या केल्या गेल्या होत्या. यानंतर पुढे कळसच केला गेला की, या सर्व 32 प्राथमिक शिक्षकांना एक वर्षानंतर कमी करण्यात आले. या 32 शिक्षकांकडून प्रत्येकी 10 लाख, 11 लाख रुपये घेतले गेले. ते सर्व शिक्षक आम्हाला पुन्हा नियुक्त्या देण्यात याव्यात किंवा शिक्षक म्हणून पुन्हा नेमणुका द्याव्यात म्हणून रोज नगरपालिकेत खेटे घालीत आहेत. त्यांना नगरपालिकेने अजूनही शिक्षक म्हणून नियुक्त्या दिलेल्या नाहीत. या प्रकरणी तत्कालीन सभापती श्री. मंगेश दळवी यांच्याकडून 22 लाख रुपयांची वसुली करण्यात यावी अशी नोटीस ऑडीट विभागाने दिली आहे. परंतु नगरपालिकेने श्री. दळवी यांच्याकडून एकही नव्या पैशांची वसुली केलेली नाही. श्री. मंगेश दळवी हे पुन्हा नगरसेवक म्हणून नगरपालिकेत निवडून आले आहेत. परंतु या गंभीर गोष्टीकडे नगरविकास खाते बघत नाही ...

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.......

नगरविकास खात्याने ज्या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे ते काम होत नाही. एफएसआय किती द्यायचा, किती मजल्यांची इमारत मंजूर करायची, सीआरझेडच्या अटी कुठे लागू होतात एवढेच काम नगरविकास खात्याने करायचे आहे का? राज्य शासनाच्या माध्यमातून नगरपालिका प्रशासनावर नगरविकास खात्याचा अंकुश असला पाहिजे. त्या दृष्टीने या शिक्षण मंडळाच्या कारभाराची चौकशी झाली पाहिजे.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : : माननीय सदस्यांना भाषणासाठी दिलेली वेळ संपली आहे. त्यामुळे त्यांना भाषण आटोपते घेण्याची विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये विधेयकावर चर्चा करीत असताना वेळेचे बंधन असू नये. दोन दिवसापूर्वी मी या विधेयकावर माझे विचार मांडत असताना आपण सभापती स्थानावरुन दोन वेळा घड्याळाकडे माझे लक्ष वेधले होते. वास्तविक विधेयकावर चर्चा सुरु झाल्यानंतर घड्याळ्याचा विषय उपस्थित होता कामा नये. विधेयकावर चर्चा होत असताना माननीय सदस्यांनी त्रुटी लक्षात आणून दिल्यानंतर अनेक विधेयके शासनाकडून मागे घेतली गेली आहेत. यापूर्वी अनेक विधेयके आग्रह धरुन सुध्दा हट्टाने मंजूर करवून घेतल्यानंतर माननीय राष्ट्रपतींकडून ती परत पाठविण्यात आली आहेत. सरकारने आमच्या बुध्दिमत्तेचा बेंडबाजा वाजविला असता तरी अधिकाऱ्यांचा आणि शासनाचा बेंडबाजा राष्ट्रपती महोदयांनी वाजविला आहे.

सभापती महोदय, विधेयकावर साधकबाधक चर्चा झाली पाहिजे. माननीय सदस्यांना जे जे मुद्दे सुचतात ते मांडण्याचा प्रयत्न केला जातो. सभागृहात मंजूर होणाऱ्या विधेयकाचे दूरगामी परिणाम राज्यात होत असतात. कोणतेही विधेयक हे पक्षाचे नसते. सभागृहात आलेल्या विधेयकावर होणाऱ्या दूरगामी परिणामांचा विचार करुनच माननीय सदस्य आपले विचार मांडण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे माननीय सदस्यांना विधेयकावर विस्तृतपणे बोलता आले पाहिजे. एकदा विधेयक मंजूर झाले म्हणजे तो कायदा महाराष्ट्रात लागू होतो. सभागृहात विधेयकावर चर्चा होत असताना मंत्री महोदयांना देखील मार्गदर्शन होत असते. नगरविकास राज्यमंत्री महोदयांना काही मुद्दे पटल्यानंतर त्यांनी हे विधेयक रोखून ठेवले आणि अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर सुधारित विधेयक सभागृहापुढे मांडले आहे. म्हणजे सरकारला याची जी जाणीव आहे त्याला फार महत्व आहे. आम्ही सरकारला मदत करीत आहोत. सरकारकडून ज्यावेळी कायदा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

मंजूर केला जातो त्याचे दूरगामी परिणाम महाराष्ट्रावर होणार असतात. जे सरकार आज सत्तेवर आहे, उद्या ते सत्तेवर नसेल परंतु कायद्याचा अंमल अविरतपणे सुरु राहतो. माननीय राज्यमंत्र्यांना याची जाणीव आहे. त्यांच्याबद्दल आम्हाला आदर वाटतो. 12 वर्षे रायगड जिल्हा परिषदेला निधी दिला नाही ही खंत माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी बोलून दाखविली आहे. दिवेआगर येथील गणपतीची मूर्ती चोरीला गेली. म्हणून पाप पुण्याचा प्रश्न निर्माण करण्यात आला. वास्तविक तसे नसते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शिक्षण मंडळाच्या सभापतींनी जो अधिकार आपल्याला नाही, त्या अधिकाराचा वापर करुन नेमणुकीचे पत्र दिले आहे. माझ्याकडे पुरावा उपलब्ध आहे, मी तो पुरावा रेकॉर्डवर आणू शकतो. श्री.मंगेश दळवी, शिक्षण मंडळ सभापती यांनी स्वत:च्या हस्ताक्षराने नेमणुकीचे पत्र दिले आहे. हा प्रकार भयानक आहे. स्वत:च्या हस्ताक्षराने शिक्षण मंडळाचे सभापती नेमणुकीची ऑर्डर देऊ शकतात का? रिकव्हरीच्या दृष्टीने माहिती घेण्यासाठी मी स्वत: खोपोली नगरपरिषदेमध्ये गेलो होतो. माझी पत्नी गेली होती. आमच्या पक्षाने माझ्या पत्नीला निवडणूक प्रचार प्रमुख म्हणून नेमले होते. ती स्वत: जिल्हा परिषद अध्यक्ष होती. रिकव्हरी डिमांड सर्टिफिकेट द्यावे म्हणून तिने मागणी केली असता सर्टिफिकेट दिले गेले नाही. 22 लाख रुपये रिकव्हरी व्हावयाची आहे. असे असताना मागणी करुनही रिकव्हरी सर्टिफिकेट दिले गेले नाही. परिणामी श्री.मंगेश दळवी हे पुन्हा नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यांच्या विरोधात मी दलित समाजातील तरुणाला उमेदवार म्हणून उभे केले होते. एक रुपयाही खर्च न करता तो तरुण उमेदवार 1500 मतांनी पराभूत झाला. श्री.मंगेश दळवी यांच्याबद्दल एवढा राग व संताप तेथील जनतेच्या मनामध्ये निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, सरकारने जे विधेयक आणले त्याचे आम्ही स्वागत केले, सरकारला धन्यवाद दिले आहेत. परंतु या शिक्षण मंडळाच्या कारभाराची चौकशी झाली पाहिजे. याच शिक्षण मंडळाच्या सभापतींनी 2000 लाकडी बेंच खरेदी केले. एका बेंचची किंमत 5000 रुपये दर्शविण्यात आली असून या खरेदीवर 52 लाख रुपये खर्च केले आहेत.

नंतर श्री.खर्चे...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.........

सागवानी लाकडाचे बेंच खरेदी केल्याचे दाखविले पण प्रत्यक्षात हे बेंच देवदार लाकडाचे होते. याची शहानिशा करुन प्रमाणपत्र घेण्याचे काम खरे तर नागपूर येथील वन विभागाचे मुख्य कार्यालय किंवा भोपाळ येथील कार्यालयाकडून करणे आवश्यक असते पण तशी ती न करता त्याच भागातील एका वनपालाकडून हे सागवानी लाकडाचे बेंच असल्याचे प्रमाणपत्र घेतले. आमच्या कार्यकर्त्याने माहितीच्या अधिकारातून मिळविलेल्या माहितीतून असे समजले की, वनपालाला असे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार नाही. त्याचबरोबर एक हजार बेंच खरेदी केल्याचे दाखविले पण प्रत्यक्षात फक्त पाचशे बेंच आणले अशी परिस्थिती आहे.

महोदय, एके काळी या नगर पालिकेत सोन्याचा धूर निघत होता अशी परिस्थिती होती. पैशाचे काय करायचे हा प्रश्न होता. त्या काळात श्री. तन्ना शेट हे खोपोली नगर पालिकेचे अध्यक्ष होते. माझे वडील जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना त्यांना एकमुखाने नगराध्यक्ष म्हणून घोषित केले होते. त्या काळात या नगर पालिकेने परिवहन सेवा सुध्दा सुरु केली होती तरी देखील पैसा शिल्लक राहत होता अशी त्या नगर पालिकेची परिस्थिती होती. त्याच नगर पालिकेत आता पगार देण्यासाठी सुध्दा पैसे नाहीत, एवढी परिस्थिती बदलली आहे. आज या नगर पालिकेचे धिंडवडे निघत आहे, त्यावर शासनाचे नियंत्रण कोणत्या प्रकारचे आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे. शासनाने कायदे बनविले परंतु त्यांची अंमलबजावणी होणे देखील तितकेच महत्वाचे आहे, सुधारणा करण्यासाठी आमचा विरोध नाही पण अशा बाबींकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे अशी आमची मागणी आहे. या सर्व प्रकरणांची चौकशी करण्याची मागणी मी अनेक वेळा सभागृहात देखील केली. आता या विधेयकाच्या निमित्ताने संपूर्ण शिक्षण मंडळाची मागील दहा वर्षापासूनची चौकशी झ ाली पाहिजे व त्यातील सत्य जनतेसमोर आले पाहिजे तसेच सभागृहालाही अवगत झाले पाहिजे अशीही विनंती करतो.

महोदय, जात पडताळणीच्या बाबतीत मी असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, याच नगर पालिकेतील श्री. कुलदीप रामदास शेंडे हे नगरसेवक मराठा समाजाचे आहेत पण त्यांनी आपले प्रमाणपत्र बदलले आहे. मराठा समाजाला ओबीसीचे आरक्षण मिळावे म्हणून आमचे सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे राज्य स्तरावर प्रयत्न करीत आहेत पण त्यांना अद्यापही

....2

श्री. जयंत प्र. पाटील........

यश येत नाही.......अडथळा.......आमचा त्यासाठी विरोध नाही पण रेकॉर्डवर सुध्दा चुकीचे राहता कामा नये. कारण घटनेनुसार आरक्षणाची टक्केवारी 52 टक्क्याच्या वर जाता कामा नये. तसे करायचेच असेल तर त्यासाठी घटना दुरुस्ती करणे अपरिहार्य आहे.....

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्यांना मी अवगत करु इच्छितो की, सभागृहात सध्या ओबीसीचा विषय नाही. आपण कृपया विधेयकावर बोलावे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांचा हा विषय असून ते त्यासाठी फार उत्साही आहेत. तसे पाहिले तर त्यांना या विषयाच्या संदर्भात बोललेच पाहिजे, अन्यथा त्यांच्या राजकीय अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. मी त्यांना या माध्यमातून सांगू इच्छितो की, ज्यावेळी केंद्रीय मंत्री श्री. सलमान खुर्शीद यांनी मुस्लीम समाजासाठी ओबीसीमध्ये 4 टक्के आरक्षणाची घोषणा केली होती तेव्हा मात्र इतर बाबतीत विरोध करणाऱ्यांनी कोणत्याही प्रकारचा विरोध त्यासाठी केला नव्हता.

श्री. विनायक मेटे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी ज्या खुबीने त्यांचे चातुर्य वापरले ते मी जाणून आहेच. उलट आमचे सुरुवातीपासूनच असे म्हणणे आहे की, या राज्यात ज्या ज्या समाजाला आरक्षण मिळते, ......

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे...

जो समाज ओपनमध्ये आहे....

**तालिका सभापती ( श्री. मोहन जोशी )** : सन्माननीय सदस्य जे विचार मांडत आहेत तो विषय विधेयकाचा नाही.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मला एवढेच सांगावयाचे आहे की, ओपनमध्ये जो समाज आहे मग त्यामध्ये मराठा, मारवाडी, ब्राम्हण, मुस्लीम, गुजराथी, कॅथलिक या लोकांना आता जे 25 टक्क्याचे आरक्षण आहे ते 52 टक्क्याच्या व्यतिरिक्त दिले जावे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. बाकीच्या राज्यात ओपन समाजाला 52 टक्के आरक्षण दिले जाते तसेच 52 टक्क्याचे आरक्षण महाराष्ट्रातील ओपनच्या समाजाला दिले जाते एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, श्री. कुलदीप शेंडे यांच्याकडे मराठा जातीचे प्रमाणपत्र आहे परंतु त्यांनी मराठा जात खोडून त्यांनी त्यावर "कुणबी" जातीचा उल्लेख केलेला आहे. या संदर्भात तहसीलदारांनी सुध्दा आक्षेप घेतला असून त्यांनी असे म्हटले आहे की, श्री. शेंडे यांची जात "मराठा" असून त्यांनी जातीच्या प्रमाण पत्रावर खाडाखोड केलेली आहे. यासंदर्भातील सर्व रेकॉर्ड माझ्याकडे उपलब्ध असून हा सर्व प्रकार खोपाली नगर पालिकेत घडलेला आहे. यासंदर्भातील सर्व रेकॉर्ड मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. श्री. कुलदीप शेंडे हे सदस्य असून तेच नगरपालिकेचा कारभार चालवित आहेत. त्यामुळे माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की,त्यांनी एकदा या महानगरपालिकेला भेट देऊन मी जे काही सांगत आहे त्याची खात्री करुन घ्यावी. श्री. कुलदीप शेंडे यांना दोन काका असून त्यांच्या जातीच्या दाखल्यावर "मराठा" असाच उल्लेख आहे तसेच श्री. कुलदीप शेंडे यांच्या चुलतभावाच्या जातीच्या दाखल्यावर सुध्दा "मराठा" असाच उल्लेख आहे परंतु श्री. कुलदीप शेंडे यांच्याच जातीच्या दाखल्यावर "कुणबी" असा उल्लेख आहे. श्री. विनायक मेटे यांची कृपा. त्यामुळे यासंदर्भात आपण आक्षेप घेणार आहात की,नाही ?

सभापती महोदय, माहितीच्या अधिकाराखाली आम्ही जात पडताळणी समितीकडून माहिती मागवली होती त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी विभागीय जात पडताळणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

समिती, कोकण भवन यांनी अशी माहिती दिली आहे की, "जात पडताळणीसाठी 25 ते 30 हजार अर्ज येत असतात. आपण जी माहिती मागितली होती त्याबाबत अभिलेख्यात शोध घेतला परंतु सदर माहिती आम्हाला आढळून आली नाही त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. तुम्हाला यासंदर्भात अधिकची माहिती हवी असेल तर न्यायालय किंवा उपायुक्तांकडून तुम्हाला माहिती मिळू शकेल. आम्ही आपली मागणी पूर्ण करु शकत नाही."

सभापती महोदय, जात पडताळणीचा विषय या सभागृहापुढे असून या विषयावर जेव्हा चर्चा सुरु होईल त्यावेळेस मी या विषयावर माझे विचार व्यक्त करणारच आहे. ज्यांनी जातीच्या प्रमाणपत्रावर "मराठा" जात असा उल्लेख असतांना त्यावर खाडाखोड करुन "कुणबी" जातीचा उल्लेख केलेला आहे त्यांसंदर्भात माहिती मागितली असता ती दिली जात नसेल तर ते योग्य नाही. कायद्याची पायमल्ली होऊन कारभार केला जात असेल तर ते बरोबर नाही त्यामुळे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या नगरपालिकेतील श्रीमती प्रिया प्रवीण जाधव या महिलेला 3 अपत्य आहेत. ही महिला बाजारपेठेतून नगरसेविकेसाठी उभी राहिली होती. रायगड महानगरपालिकेत 2.5 वर्षाने माझाचा नगराध्यक्ष होईल. आताही माझाच नगराध्यक्ष होणार होता परंतु मी सांगितले पुढील वेळेस सत्ता ताब्यात घेऊ.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

तुमच्याकडचे इच्छूक बरेच असतात. त्यातील दोन घेतले की, काम होते. पण आम्ही घेतले नाही. जनतेने कौल दिला आहे तो मानला पाहिजे या मताचे आम्ही आहोत. म्हणूनच आम्ही टिकून राहिलो आहोत. पूर्वी आमचा फक्त एकच नगरसेवक होता. पण यावेळी 11 नगरसेवक निवडून आले आहेत. यासाठी मी स्वत: 3 बैठका घेतल्या. काम केले आणि 11 नगरसेवक निवडून आणले. आमच्याकडे सगळे आहे. मात्र पैसा कमी पडतो. तो आम्ही कुठून आणणार ? ... (अडथळा) ... माझी श्रीमंती आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना द्यायला तयार आहे. माझी श्रीमंती त्यांना द्यायला मला नक्की आनंद वाटेल. गरिबांचे प्रेम हे श्रीमंती पेक्षा मोठे मानणारा मी आहे. सातत्याने 50 वर्षे प्रवाहाच्या विरोधात काम करणारी आमची चौथी पिढी आहे. त्याचा मला अभिमान आहे. आमची चौथी पिढी अजून सत्तेत आली नाही. आमची पिढी देखील अजून पर्यंत कोणत्याही आमिषाला बळी गेलेली नाही. कुठलाही डाग लावून घेतलेला नाही याचा मला आनंद मोठा आहे. तो सन्मान मी पैशा पेक्षा मोठा मानतो. हे येथे बोलण्याचे ठिकाण नाही. आम्ही एका ध्येयाने काम करीत आलेलो आहोत, म्हणून आम्हाला याचे दु:ख होते.

सन्माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते हे देखील एके काळी आमच्या बरोबर काम करीत होते. तरूणपणात त्यांनी आणि मी एकाच वेळी तुरूंगवास भोगला होता. त्यांना सत्ता जवळ वाटल्यामुळे ते आपल्याकडे आले. आम्हाला सत्ता जवळ न वाटल्यामुळे आम्ही बाहेर राहिलो. एवढेच कशाला सांगलीचे सन्माननीय सदस्य श्री.संभाजी पवार हे देखील आमच्या बरोबर होते. ती वेगळी भूमिका होती. ते दिवस आठवल्या नंतर या प्रकरणाबाबत वाईट वाटते. हे बिल महत्त्वाचे आहे. या बिलाला वेळ दिला पाहिजे. मी कोणावर आरोप करीत नाही. बिलावर चर्चा झाली पाहिजे असे आपण कामकाज सल्लागार समिती मध्ये ठरवितो. श्री.रावते साहेब बोलले असल्यामुळे आपण सकाळी बिलावर चर्चा ठेवली. माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव यांना वाटले की, सकाळी बिल पास होऊन जाईल. या हेतूनेच हे बिल आज सकाळी चर्चेला ठेवले. सकाळी सात वाजता मी स्पीड बोट मध्ये बसलो आणि आठ वाजता येथे आलो. आज बोलावयाचे असल्यामुळे मी सगळे रेकॉर्डस काढले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, याची आपण चौकशी करणार आहात की नाही ? ही श्रीमती प्रिया प्रदीप जाधव कोण आहे ? तिला 3 अपत्ये आहेत. महितीचा अधिकार अधिनियमान्वये आम्ही नगरपालिकेकडे माहिती मागविली. आमच्याकडे तीन अपत्यांची प्रमाणपत्र आहेत. ती म्हणते सन 2008 मध्ये अपत्य मरण पावले. कायदा काय म्हणतो याचा देखील मला खुलासा पाहिजे आहे. ते मला रेकॉर्डवर आणावयाचे आहे. तीन अपत्ये झाली आणि त्यातील एक अपत्य गेले असे ती म्हणते. म्हणजे तिला 3 अपत्ये झाली हे ग्राह्य धरणारच ना. त्यामुळे आपण नेमके काय ग्राह्य धरणार हे आम्हाला कळले पाहिजे. सन 2012 मध्ये तिने नोंद केली आहे की, माझे तिसरे अपत्य मेले आहे. आम्ही तक्रार केल्यानंतर तिने सांगितले की, माझा मुलगा मृत पावला आहे. ते आपण ग्राह्य धरणार आहात काय ? या बाबत आम्ही कोर्टात गेलो आहोत. या प्रकरणी कोर्टात केस सुरू आहे. कायद्यामध्ये 3 अपत्ये जीवंत असे म्हटलेले नाही. हे आपण सचिवांना विचारून घ्यावे. तीन अपत्ये झ ाली की, त्याला निवडणुकीला उभे राहता येत नाही. मुसलमानांना 2 बायका करण्याचा अधिकार आहे. हिंदूना कायद्यान्वये दोन बायका करण्याचा अधिकार नाही. मग त्याची एकाच बायकोची तीन अपत्ये धरायची की, दोन बायकांची धरायची हे देखील कायद्यात कुठे आहे ? तेव्हा याचा देखील खुलासा झाला पाहिजे. तिला तीन अपत्ये झालीत. त्याचे दाखले आमच्याकडे आहेत. मुलगा मृत पावला असे ती आता सांगत आहे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी आता मुसलमानांना कितीही बायका असतात असा उल्लेख केला व त्याची नोंद सभागृहाच्या कार्यवाहीमध्ये झाली आहे. खरे म्हणजे हा मुसलमानांच्या अधिकृतपणे केल्या जाणाऱ्या विवाहाचा विषय आहे. या बाबत अलीकडे सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल गंभीर स्वरुपाचा आहे. तो असा की, एखाद्या व्यक्तीच्या अधिकृत असलेल्या पत्नीच्या अपत्यांशिवाय त्या व्यक्तीच्या असलेल्या रखेलच्या मुलांचा देखील त्या व्यक्तीने संभाळ केला पाहिजे. त्या व्यक्तीच्या मालमत्तेतील वाटा तिला व त्या मुलांना दिला पाहिजे. त्यापुढे जाऊन सुप्रीम कोर्टाने मुस्लिम समाजासाठी असे आदेश दिले आहेत की, पूर्वी हे तलाक म्हणावयाचे आणि बायका पळवायचे, आता भगिनी तलाक म्हणून या लोकांना पळवू शकतात. त्यामध्ये पोटगीचे अधिकार दिले आहेत. आता कुणाला किती बायका आहेत हा चर्चेचा विषय होऊ शकत नाही, त्यामधून गंभीरता निर्माण होईल. त्याची वेगळी चर्चा होऊ शकते.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने राज्य सरकारकडून आम्हाला समजले पाहिजे की, तीन अपत्ये कोणती? ती दोन बायकांची असतील तर, तीन अपत्ये झ ााल्यानंतर त्यापैकी एक अपत्य मरण पावले आणि दोन जीवंत असतील तर, याची सुध्दा खऱ्या अर्थाने चौकशी झाली पाहिजे. मंत्री महोदय, नगरपालिकांच्या बाबतीत आपण हा कायदा करु पहात आहात, ज्या ठिकाणी सरपंचाना अधिकार दिले आहेत त्या ठिकाणी नगरपालिकेच्या नगराध्यक्षांना अधिकार नाहीत. त्याचप्रमाणे नगराध्यक्षांना जे अधिकार आहेत ते महापौरांना नाहीत. त्यामुळे सर्वच नगरपालिकांच्या कारभारावर शासनाचे ज्या पध्दतीचे नियंत्रण असावयास हवे तसे ते आज दिसत नाही. त्या ठिकाणी पैश्याचा अपव्यय होत आहे. या खोपोली नगरपालिकेने मागील टर्ममध्ये 3 कोटींचे पाईप खरेदी केले त्यापैकी 25 टक्के पाईप आज शिल्लक नाहीत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महापौरांना काय अधिकार आहेत? ज्या प्रमाणे जामा मशिदीच्या इमामाला नमाज पडण्याचे अधिकार आहेत तसे आपण जाहीर केले आहे. त्याप्रमाणे सभा घेण्याचे अधिकार फक्त महापौरांना असतात. हा नवीन खुलासा या ठिकाणी झाला आहे.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय,या सभागृहामध्ये अत्यंत प्रभावीपणे आणि अभ्यासपूर्ण भाषण करुन विधेयकाची चिरफाड करण्याचे काम माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

श्री. जयंत प्र. पाटील....

करीत असल्याचे मी गेल्या बारा वर्षापासून पहात आहे. ते ज्या पोटतिडिकीने आणि ज्या पध्दतीने विधेयकावर बोलतात ती खरोखरच कौतुकास्पद अशी बाब आहे. या खोपोली नगरपालिकेची मी भरपूर तपासणी केल्यानंतर अनेक किस्से मला आढळून आले. या विधेयकावरील चर्चेला द्यावयाच्या उत्तरामधून मंत्रीमहोदयांकडून माझी अपेक्षा आहे की, त्यांच्यावर राजकीय स्वरुपाचे दडपण येईल. मी आता याठिकाणी रोह्याला झालेल्या घटनेचा उल्लेख करीत नाही. त्या ठिकाणी भयानक प्रकार घडला आहे. त्या घटनेचे प्रताप पाहिले तर वेगळया प्रकारचे दीड तासाचे भाषण मला करावे लागेल. त्यामुळे त्यामधून मी या सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही..

सभापती महोदय, खोपोली आज एक निसर्ग संपन्न शहर आहे, सह्याद्री पर्वताच्या कुशीत, पायथ्याशी वसलेले हे शहर आहे. त्या खोपोलीच्या आजच्या निसर्ग संपन्न वैभवाकडे आज वेगळया प्रकारे पाहिले जाते. आज त्या खोपोली नगरपालिकेचे 50 कोटी रुपये पेण अर्बन बँकेमध्ये पडले आहेत. तेथील जनतेचे, गरीब कामगार, मजुरांचे ते पैसे आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

त्याठिकाणी तेच पैसे परत त्या बँकेमध्ये ठेवले गेले आहेत. सन्माननीय श्री.मोतेसाहेब म्हणाले त्या पध्दतीने नाहीत. जयंत पाटील का काम करतो ? या नगरपालिकेचे पैसे आणि खालापूर शिक्षण मंडळाचे साडेपाच कोटी रुपये पेण अर्बन बँकेमध्ये गेले. तेथे पगार देण्याचा प्रश्न होता. मग मी रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेतून पहिल्यांदा चेक दिला आणि मग सह्या आल्या अशा प्रकारे अर्थ खाते चालवावयाचे असते. अर्थ खात्यामध्ये असा पक्षीय दृष्टीकोन ठेवला नाही, कारण त्याठिकाणी गरिबांची मुले शिकतात हा दृष्टीकोन ठेवला. नगरपालिकेचे पैसे वापरताना ती तुमची खाजगी मालमत्ता नाही की, अमुक पक्षाला द्या, हा राष्ट्रवादी पक्ष आहे, त्याला द्या. पण अरे, काँग्रेसला तर कमीतकमी पैसे द्या. त्या नगरपालिकेच्या ......

श्री.विनायक मेटे (खाली बसून) : सदनामध्ये माननीय मुख्यमंत्रीसाहेब आले म्हणून लगेच बोलू नका.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी जेएनपीटीच्या वेळेला एकदाच त्यांच्या चेंबरमध्ये गेलो होतो.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : तुम्ही माननीय मुख्यमंत्र्यांना अज्ञानी समजता काय ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मला असे वाटते की, ते त्यांच्या चेंबरमधून सभागृहातील कामकाज पहात असतात. त्यानंतर जेव्हा ते सदनामध्ये येतात तेव्हा त्याचे उत्तर देताना ते त्या विषयाच्या अनुषंगाने उल्लेख करीत असतात.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : काल झुणका-भाकरचा विषय काढल्यानंतर त्यांनी कृषी विभागाकडे तो मुद्दा टोलवून टाकला.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आता सदनामध्ये माननीय मुख्यमंत्री देखील उपस्थित आहेत. मला असे सांगावयाचे आहे की, नगरपालिकेच्या निधीचे वाटप गैरमार्गाने चालू आहे. याबाबत चौकशी केली तर ठराविक नगरपालिका आणि ठराविक लोकांना निधी देण्यात आल्याचे दिसून येते. हे केवळ आमचे दुःख नाही तर सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव जगताप यांचे देखील आहे. त्यांच्या नगरपालिकेला एकही पैसा देण्यात आलेला नाही. याबाबतीत मी येथ का उल्लेख केला तर माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव, तुमचे नाव निघाले पाहिजे. याठिकाणी मंत्री कोणतेही असले तरी आम्ही जनतेच्या प्रश्नासाठी त्यांच्याकडे गेल्यानंतर त्यांनी आम्हाला पैसे दिले. या सदनामध्ये अनेक वेळा पाहिले आहे. माननीय मंत्री महोदयांनी मला चार वेळा आश्वासने



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिली. पण अजूनपर्यंत त्याला प्रतिसाद दिल्याचे किंवा निधी प्राप्त झाल्याचे दिसत नाही. म्हणून ज्या नगरपालिका आहेत, त्यांच्याकरता केंद्र शासनाकडून निधी आणण्यासाठी तशा पध्दतीचे नियोजन असावयास पाहिजे. ज्याप्रमाणे बाकीची राज्ये केंद्र शासनाकडून निधी नेतात त्याविषयी मी अर्थसंकल्पाबाबत विचार मांडताना देखील सांगितलेले आहे की, केंद्र शासनाचा जास्तीत जास्त निधी नगरपालिकांसाठी उपलब्ध झाला पाहिजे.

सभापती महोदय, आज ज्या वेगाने आणि गतीने नागरीकरण होत आहे ते पाहता भुयारी गटार योजना करण्यात यावी. मात्र भुयारी गटार योजना बांधण्यासंबंधीचे तंत्रज्ञान आपल्या विभागाकडे आहे असे मला वाटत नाही. भुयारी गटार योजना बांधण्यासंबंधीचे तंत्रज्ञान हे समुद्र किनारा असलेल्या नगरपालिकांकडे तर अजिबात नाही. मालवण येथील भुयारी गटार योजनेचे काम अजूनही प्रलंबित आहे. आमच्या अलिबागच्या बाबतीत हीच स्थिती आहे. तसेच खोपोली येथे समुद्र किनारा नसला तरी तेथे देखील हीच स्थिती आहे. पण भुयारी गटार योजनेसाठी लागणारे जे तंत्रज्ञान आहे, त्याबाबतीत कोणत्याही प्रकारचा अनुभव नसलेले ठेकेदार ही कामे घेतात. त्यासाठी लागणाऱ्या पाईपचा ॲडव्हान्स घेतात आणि प्रत्यक्षात याठिकाणी काम करीत नाहीत अशी स्थिती आहे. खरे म्हणजे या सर्व मूलभूत सुविधा असून त्या नगरपालिकांच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. त्यामुळे याबाबतीत आपण लक्ष दिले पाहिजे. तसेच लाईट, पाणी, ड्रेनेज या तीन गोष्टींबाबत जास्तीत जास्त अग्रक्रम द्यावयास पाहिजे आणि मी माझ्या नगरपालिकेला या कामांना अग्रक्रम दिलेला आहे. म्हणून गेली 30 वर्षे नगरपालिका शेतकरी कामगार पक्षाकडे आहे हे मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेबांना सांगू इच्छितो. त्याठिकाणी दलित वस्तीची संपूर्ण सुधारणा, तेथील पाणी-पुरवठा, रस्ते इ.कामांसाठी जास्त ग्रँट मिळत नसतानाही आम्ही आमच्या स्वत:च्या निधीतून या गोष्टी केलेल्या आहेत. मात्र याबाबतीत शासनाकडून कोणत्याही प्रकारचे नियोजन केल्याचे दिसत नाही. परंतु राज्य शासन या विधेयकाच्या माध्यमातून कोणते तरी वेगळे पॅनेल, वेगळे तंत्रज्ञान विकसित करेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

श्री.जयंत प्र.पाटील.......

सभापती महोदय, मागील अकरा वर्षापासून अलिबाग नगरपालिकेमध्ये ओव्हरसिअरचे पद रिक्त आहे. अलिबाग नगरपालिकेमध्ये शेकापची सत्ता आहे म्हणून ते पद भरण्यात येत नाही काय ? माननीय पालकमंत्री महोदयांनी सांगितले होते की, ओव्हरसिअरचे पद भरण्यात येईल. परंतु अद्याप पर्यंत हे पद भरण्यात आलेले नाही. मी मंत्री महोदयांना स्वत: भेटलो होतो. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, हे पद डायरेक्ट भरण्याची परवानगी देतो. परंतु आतापर्यंत तशी परवानगी दिलेली नाही. या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती मीनाक्षी पाटील यांनी आणि मी देखील पत्र दिले होते. परंतु त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. जर त्या ठिकाणी ओव्हरसिअरचे पद रिक्त असेल तर नगरपालिकेने तांत्रिक बाबी कशा पूर्ण करायच्या ? जनतेला सोयी सुविधा मिळण्यासाठी आणि नगरांचा विकास होण्यासाठी आपण कायद्यामध्ये सुधारणा करतो. मग कायद्याने दिलेल्या अधिकाराची अंमलबजावणी होत नसेल तर ते योग्य नाही. तेव्हा माननीय मंत्री महोदय तरी हे ओव्हरसिअरचे पद लवकरात लवकर भरतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये ज्या दोन-तीन सुधारणा केलेल्या आहेत त्या चांगल्या आहेत. जसे उपाध्यक्षांकडे चार्ज दिला पाहिजे वगैरे. परंतु "कोरम" संदर्भात जी सुधारणा केलेली आहे ती मागे घ्यावी अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. नगरपालिकेमध्ये कोणते फॅक्टर येतात ते आपणास माहीत आहे. आपण "कोरम"ची अट काढून टाकल्यास नगराध्यक्ष एकटेच निर्णय घेतील. तेव्हा ही सुधारणा मागे घ्यावी अशी मी पुन: एकदा विनंती करतो.

सभापती महोदय, या विधेयकावर मी जवळपास 55 मिनिटे बोललो. मी माझ्या भाषणात ज्या मागण्या केलेल्या आहेत त्याची चौकशी माननीय मंत्री महोदय करतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : ( विधानसभा द्वारा निर्वाचित ) : माननीय सभापति महोदय, माननीय सदस्य श्री जयंत पाटील साहब अभी यहां पर अपने विचार रख रहे थे. मुझे लगता है कि माननीय पाटील साहब इस बिल पर तो कम बोले, बल्कि वहां की नगर परिषद के हालात की जानकारी उन्हांने यहां पर ज्यादा दी है.

सभापति महोदय, माननीय मंत्री श्री जाधव साहब यहां पर माननीय सदस्यों द्वारा उठाये गए मुद्दों को बहुत ही ध्यान से नोट कर रहे हैं. मैं यहां पर कहना चाहूंगा कि यह बिल बड़ा ही सरल है. आज पानी की समस्या बहुत ज्यादा बढ़ गयी है. पानी के बारे में सिवरेज के बारे में, सड़क के बारे में तथा अन्य नागरिक सुविधाओं के बारे में आज लोकल बॉडीज पर जवाबदारी बहुत ज्यादा बढ़ गयी है. लेकिन बजट बनाते समय वहां पर इस बात का प्रावधान नहीं था कि पानी और सिवरेज इत्यादि की सुविधा के लिए अलग से बजट बन सके. इसी वजह से यह बिल नंबर 14 यहां पर चर्चा के लिए सरकार द्वारा लाया गया है.

सभापति महोदय, मैं यहां पर सिर्फ दो-तीन बातों का ही जिक्र करना चाहूंग. मेरा कहना है कि लोकल बॉडीज के कर्मचारियों का वेतन तथा पेंशन को उस नगरपरिषद, नगरपालिका या महानगरपालिका की आमदनी से जोड़ा जाता है. इसी वजह से अक्सर ऐसा होता है कि वहां के कर्मचारियों को उनका वेतन तथा निवृत्त कर्मचारियों को उनका पेंशन समय पर नहीं मिल पाता है. इस बात में बहुत ही विरोधाभास दिखायी देता है. क्योंकि हमारे देश में भारत सरकार ने एक पेमेंट ऑफ वेजेज एक्ट बनाया हुआ है. उसके अनुसार कर्मचारियों को समय पर वेतन देने का कानून बनाया गया है. उस कानून के तहत ऐसा प्रावधान है कि हर महीने इतने समय के अंदर कर्मचारियों को उनका वेतन मिल जाना चाहिए. लेकिन ऐसा कानून होते हुए भी लोकल बॉडीज के अंदर कर्मचारियों को उनका वेतन समय पर नहीं मिल पाता है. वहां के कर्मचारियों को दो महीने, चार महीने तथा कभी-कभी तो 6 महीने तक भी वेतन नहीं मिल पाता है. समय पर वेतन न होने का कारण बताया जाता है कि वहां की नगर परिषद या नगर पंचायत की आमदनी कम

...3

अप्रकाशित प्रति / प्रकाशनार्थ नहीं

श्री एस. क्यू. जमा...

है. इस लिए उनका वेतन समय पर नहीं हो पा रहा है. कहा जाता है कि जब टैक्स का पैसा या टोल टैक्स का पैसा आएका तो वहां के कर्मचारियों को वेतन दिया जाएगा. यही हालत वहां रिटायर हुए पेशन पाने वाले कर्मचारियें की है. उन वृद्ध लोगों को भी समय पर पेंशन नहीं मिल पाती है.

सभापति महोदय, आपके माध्यम से माननीय मंत्री महोदय से मेरा अनुरोध है कि इस बिल के पास होने के बाद जब आप इस बिल से संबंधित रुल्स फ्रेम करें तो आप इस बात का ध्यान रखें कि लोाकल बॉडीज के ऊपर इस बात की पाबंदी होनी चाहिए कि वहां के कर्मचारियों को वेतन तथा पेंशन समय पर दिया जाएगा. वहां की लोकल बॉडीज की आमदनी कितनी है तथा सरकार वहां की लोकल बॉडीज को कितनी मदद करेगी, यह एक अलग बात है. लेकिन वहां के कर्मचारियों को वेतन तथा पेंशन समय पर दिए जाने की पाबंदी वहां की लोकल बॉडीज पर होनी चाहिए.

सभापति महादेय, एक और बात मैं यहां पर कना चाहूंगा कि इस बिल में सरकार ने प्रावधान किया है कि यदि आवश्यकता पड़ी तो वाटर बेनिफिट टैक्स, सिवरेज टैक्स तथा अन्य टैक्स लगाएंगे. लेकिन मुझे लगता है कि वहां के नागरिकों पर अलग-अलग नाम से टैकस लगाने की प्रवृत्ति ठीक नहीं है. अलग-अलग नाम से टैक्स लगाने के वजह से वहां के नागरिकों में सरकार के प्रति नाराजगी उत्पन्न होती है. कहीं बिजली की सुविधा देनी है तो आप बिजली टैक्स लगाएंगे, कहीं पर रोड बनाना है तो आप रोड टैक्स लगाएंगे, सिवरेज सिस्टम बनाना है तो आप सिवरेज टैक्स लगाएंगे. मुझे लगता है कि इस प्रकार अलग-अलग नाम से नागरिकों पर बहुत सारे टैक्स लगाना उचित नहीं है. मेरा कहना है कि वहां के नागरिकों पर अलग-अलग नाम के टैक्स लगाने के बजाय उन सब करों को मिलाकर आप किसी एक नाम से टैक्स लगा सकते हैं, इस टैक्स का नाम आप सिटी डॅवलपमेंट टैक्स भी रख सकते हैं, या दूसरा कोई नाम जो आपकी दृष्टि से उचित हो, वह नाम आप उस टैक्स को दे सकते हैं. लेकिन सब तरह के करों

...4

श्री एस. क्यू. जमा.....

को मिलाकर सिर्फ एक ही नाम से कोई टैक्स वहां के नागरिकों पर लगाया जाना चाहिए. सिटी डॅवलपमेंट टैक्स नाम का टैक्स लगाने की बात तो मैंने इस लिए कही क्योंकि डॅवलपमेंट टैक्स में किसी भी प्रकार के टैक्स का समावेश किया जा सकता है.

सभापति महोदय, यदि कुछ समय के लिए वहां के लोगों पर टैक्स लगाना है तो उनसे आप सेस भी ले सकते हैं. क्योंकि थोड़े समय के लिए कुछ पैसा यदि सरकार इकट्ठा करना चाहती है तो वहां पर सेस लगाया जा सकता है. यह सेस वहां के नागरिकों पर एक-दो साल के लिए लगाया जा सकता है. लेकिन किसी भी हालत में अलग-अलग नाम का टैक्स वहां के नागरिकों पर हमेशा के लिए नहीं लगाया जाना चाहिए. बल्कि उस शहर के विकास में वहां के नागरिकों के योगदान के रुप में किसी एक नाम से कोई टैक्स वहां के नागरिकों से लिया जा सकता है.

सभापति महोदय, टैक्स लगाते समय इस बात का ध्यान रखना भी आवश्यक है कि वहां के नागरिकों की आमदनी कितनी है. यदि उस शहर में व्यापारी लोग ज्यादा रहते हैं तो वहां पर ज्यादा टैक्स लगाया जा सकता है. उस शहर में यदि मध्यम वर्ग के लोग रहते हैं तो वहां पर मध्यम वर्ग की आमदनी के हिसाब से टैक्स लगाया जाना चाहिए तथा वहां के नागरिकों की आमदनी यदि बहुत कम है तो वहां के नागरिकों से टैक्स भी बहुत मामुली ही लिया जाना चाहिए.

सभापति महोदय, मैंने यहां पर अपने भाषण में दो सुझाव दिए हैं, मुझे पूरी उम्मीद है कि माननीय मंत्री महोदय मेरे दोनों सुझावों को अवश्य मान्य करेंगे, धन्यवाद.

( इसके बाद श्री बरबड )

असुधारित प्रति / प्रकाशनार्थ नहीं

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2011 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 14- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक या ठिकाणी मांडलेले आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात या सभागृहाच्या सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडला व त्या संदर्भात आपले विचार मांडले. या विधेयकावर बोलत असताना या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य जे कोणतेही विधेयक सभागृहामध्ये आल्यानंतर त्या बाबतीत जीव ओतून आपले विचार मांडतात आणि एक प्रकारे शासनाला मार्गदर्शन करतात असे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब यांनी या विधेयकावर दीड तास आपले विवेचन केले. दुसरे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या विधेयकाच्या निमित्ताने आपल्या काही व्यथा आणि अपेक्षा व्यक्त केल्या तसेच सरकारच्या वतीने काही ठोस निर्णय नगरविकास विभागामार्फत घ्यावेत अशा प्रकारचे महत्वाचे मुद्दे मांडले. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यु.जमा साहेबांनी दोन मुद्दे मांडले. ज्यावेळी आपण नियम तयार करु त्यावेळी पगाराची व्यवस्था करावी आणि सिटी डेव्हलपमेंट टॅक्सचे स्वतंत्र नियोजन करावे अशा प्रकारच्या तरतुदी कराव्यात अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या विधेयकाच्या बाबतीत अत्यंत अभ्यासपूर्ण विचार मांडत असताना विधानसभेचे माजी अध्यक्ष व या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेब यांनी हे विधेयक नगरपालिकांच्या किती हिताचे आहे, सगळ्या नगरपालिकांचे हित जोपासणारे विधेयक कसे आणले आहे या संदर्भात अत्यंत महत्वपूर्ण विवेचन करणारे काही मुद्दे मांडले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी या विधेयकामध्ये अतिरिक्त आयुक्तांची जी नेमणूक करणार आहोत

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

परंतु त्यांना वेतनश्रेणी देण्यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे ते नमूद केलेले नाही. या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला तर शासनावर आर्थिक बोजा पडणार आहे हेही खरे आहे. मंत्री महोदयांनी आपल्यालाही पत्र दिलेले आहे. त्या पत्रात त्यांनी या प्रश्नासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनीच पुढाकार घेऊन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे असे म्हटलेले आहे. त्यामुळे आपल्या दालनामध्ये मंत्री महोदयांसमवेत एक बैठक घ्यावी अशी मी विनंती करतो.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, याबाबत बैठक घेण्यात येईल. या लोकांना वेतनश्रेणी देत असताना सेवा नियमामध्ये त्यांचे वय, पात्रता हे मुद्देही समोर येऊ शकतात. माननीय उप सभापती महोदय आपण आणि सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी पुढाकार घेतला असल्यामुळे माननीय उप मुख्यमंत्री, विभागाचे मंत्री महोदय, या सर्वांनी मान्य केले आहे की, या घटकाच्या मानधनात वाढ झाली पाहिजे. त्यांना न्याय मिळाला पाहिजे. म्हणूनच त्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार एक बैठक घेण्यात येईल.

-----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ. शी.** : कोरेगाव परिसरातील सैनिकांच्या विधवा पत्नींच्या नावे दलालांनी म्हाडाच्या लॉटरीसाठी राखीव कोट्यातून अर्ज भरणे

**मु. शी.** : कोरेगाव परिसरातील सैनिकांच्या विधवा पत्नींच्या नावे दलालांनी म्हाडाच्या लॉटरीसाठी राखीव कोट्यातून अर्ज भरणे यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री जयप्रकाश छाजेड, राजन तेली, सुभाष चव्हाण, उल्हास पवार, मोहन जोशी, श्रीमती अलका देसाई, श्री. एस क्यू ज़मा ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सातारा जिल्ह्यातील कोरेगांव परिसरातील 20 ते 25 सैनिकांच्या विधवा पत्नींना मुंबईत घराचे आमिष दाखवून दलालांनी त्यांच्या नावे सन 2008, 2009 व 2010 च्या म्हाडाच्या लॉटरीमध्ये मालाड, दहिसर, प्रतिक्षानगर, गोरेगांव येथील घरासाठी सैनिकांच्या राखीव कोट्यातून अर्ज भरणे, हे अर्ज लॉटरीत यशस्वी ठरल्यानंतर ती घरे दलालांनी खुल्या बाजारात विकल्याचा प्रकार दिनांक 23 फेब्रुवारी, 2012 रोजी उघडकीस येणे, सन 2011 च्या लॉटरीतील 425 घरांच्या घोटाळ्याचे प्रकरण ताजे असतानाच हा प्रकार उघडकीस आल्यामुळे म्हाडा कार्यालयात उडालेली खळबळ सर्वसामान्य नागरिकांच्या म्हाडाच्या लॉटरी कार्यपध्दतीवरील विश्वास उडाल्यामुळे त्यांच्यात पसरलेला तीव्र संताप व याबाबतची शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे मॅटर कोणाला लहान वाटेल. कारण लष्कराच्या नावाने संपूर्ण 'आदर्श' नावाच्या इमारतीतील फ्लॅटच अनेकांनी बळकावले असल्यामुळे म्हाडातील या सदनिका पळविणारे लोक त्या मानाने लहानच आहेत. मघाशी सभागृहात काय झाले आहे ते सर्वांनीच पाहिले आहे. या प्रकरणात शशी जाधव या नावाच्या दलालाने सैनिकांच्या विधवा पत्नींच्या नावे अर्ज करुन सदनिकांचा ताबा घेतला. हे प्रकरण उघडकीस आलेले आहे. त्याबाबत मंत्री महोदयांना एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, म्हाडाच्या सोडत नि:पक्षपातीपणे काढल्या जातात, आदर्श आहेत, संशयाला जागा नाही असे सांगितले जाते, तरीही या जागा लोक शोधून काढत आहेत. या सदनिका वाटपाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. ही प्रक्रिया सदोष आहे हे लक्षात आल्यानंतर त्यातील दोष दूर करण्यासाठी सरकारने कोणती पावले टाकली आहेत ? या कामासाठी एजंट स्वत:चे डोके वापरत नाहीत. त्यामध्ये मिलीभगत असते. ती प्रशासकीय अधिकाऱ्यांची आणि राजकारण्यांची आहे की नाही हे मला माहीत नाही. पण यामध्ये कोणाकोणाची मिलीभगत आहे हे शोधण्यासाठी शासनाने चौकशी केली आहे काय, यामध्ये ज्या चुकीच्या गोष्टी झाल्याचे निदर्शनास आले आहे त्यामध्ये सरकार कशा प्रकारे दुरुस्ती करणार आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, संबंधित व्यक्तीचे नाव शशी कदम असे आहे. म्हाडाच्या सोडतीमध्ये पारदर्शकता येण्यासाठी ऑनलाईन सिस्टिम सुरु केलेली आहे. या व्यवस्थेवर लोकांचा विश्वास आहे. त्यासाठी मॅस्टेक कंपनीवर सोडतीच्या प्रक्रियेची जबाबदारी टाकलेली आहे. ऑन लाईन सिस्टिम सुरु केल्यानंतर एखाद्या व्यक्तीचा अर्ज स्वीकृत झाल्यानंतर व नंबर लागल्यावर संबंधित व्यक्ती स्वत: येऊन म्हाडाकडे पैसे भरत नाही तोपर्यंत तो पात्र ठरत नाही अशी भूमिका शासनाने घेतलेली आहे. यासंबंधी तक्रार आल्यानंतर तेथे प्रत्यक्षात जाऊन तपासणी केल्यावर या लोकांच्या नावाचा गैरवापर करण्यात आला आहे हे दिसून आले. अर्थात बॉण्ड लिहून धेत असताना, फिजिकल ताबा देत असताना पात्र व्यक्तींनाच ताबा दिलेला आहे. हे होऊ नये म्हणून चौकशी करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले होते. व्हिजिलन्स अधिकाऱ्यांमार्फत चौकशी केल्यानंतर 2 किंवा 3 लोकांनी या सदनिका भाड्याने दिल्याचे व उर्वरित 7-8 सदनिका बंद असल्याचे दिसून आले. या लोकांची फसवणूक झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्यानंतर संबंधित लोकांविरुध्द गुन्हा नोंदविलेला आहे. दलाल व संबंधित अधिकाऱ्यांची हात

4...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर....

मिळवणी झाली आहे का असे विचारण्यात आले आहे.  ही बाब निश्चितपणे तपासली जाईल आणि ज्यांनी अयोग्य काम केले असेल त्यांना पाठिशी घालण्याची भूमिका राज्य सरकारची राहणार नाही.

यानंतर श्री.शिगम....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

किंबहुना मी जरी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा आणि आघाडी सरकारचा राज्यमंत्री असलो तरी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मराठीच्या संदर्भात या सभागृहामध्ये साडेसात तास भाषण केले, जे विचार मांडले त्या बद्दल शिवसेनेच्या नेत्यांनी अशा व्यक्तीचा शिवतीर्थावर सत्कार केला पाहिजे अशा माझ्या त्यांच्या विषयीच्या भावना आहेत, इतका मला त्यांच्या विषयी आदर आहे. हा एक मोठा विषय होऊ शकतो. मला तो विषय या ठिकाणी काढायचा नव्हता. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे प्रत्येक गोष्टीमध्ये, प्रत्येक विषयामध्ये मराठी भाषेच्या वापराचा आग्रह धरीत असतात. त्यांच्या या आग्रहाबद्दल मला अभिमान आहे. परंतु ज्या जनतेने तीन वेळा महानगरपालिकेची सत्ता त्यांच्या हातात दिली त्या महानगरपालिकेचा कारभार कोणत्या भाषेमध्ये चालतो याकडे त्यांनी पाहिले असते तर बरे झाले असते. मुंबई महानगरपालिकेमधील प्रत्येक पत्रव्यवहार, किंबहुना झोपडपट्टीमध्ये राहाणा-या माणसाला एखादी नोटीस जरी द्यावयाची असली तरी ती इंग्रजीमध्ये दिले जाते. मी हे येथे जबाबदारीने सांगत आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा जो आग्रह आहे त्यास मुंबई महानगरपालिकेमधूनच सुरुवात झाली तर त्याचा परिणाम खूप मोठ्या प्रमाणावर होईल. आपण मराठी माणसांचे नेतृत्व करीत आहात. असो, मी त्या विषयाकडे न जाता विधेयकावर बोलतो.

कलम 54(3)मध्ये असे म्हटलेले आहे की, "The State Government may appoint one or more persons to be called Additional Municipal Commissioner who shall, subject to the control of the Commissioner, exercise all or any of the powers and perform all or any of the duties and functions, of the Commissioner." यामध्ये देखील असा शब्दप्रयोग केलेला आहे की, मुख्याधिका-यांना जे काम ठरवून दिलेले आहे ते त्यांनी करावयाचे आहे. त्यामुळे एकाच वेळी दोन सत्ता केंद्रे होणार नाहीत. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी अडचण सांगितली होती ती अडचण येणार नाही.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी गणपूर्तीच्या संदर्भात काही शंका उपस्थित केल्या. गणपूर्तीच्या संदर्भात विधेयकामध्ये अशी तरतूद करण्यात आलेली आहे की, एखादी नवीन निवडणूक झाल्यानंतर जेव्हा समित्यांचे सभापती

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

नेमण्याचा तसेच समित्यांवर किती सदस्य घ्यावयाचे यासंबंधीचा विषय ज्या बैठकीमध्ये असतो अशा बैठकीच्या वेळी गणपूर्ती असणे आवश्यक आहे. अन्य बैठकीच्या वेळी गणपूर्तीची आवश्यकता असलीच पाहिजे असे नाही. ब-याच वेळेला असे होते की, दुस-यांना संधी मिळू नये, आपल्याच हातात कारभार रहावा या उद्देशाने सत्ताधारी पक्षाचे लोक किंवा नगराध्यक्ष वा उपनगराध्यक्ष अशा प्रकारची बैठकच होऊ देत नाही. त्यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होण्याऐवजी ती केंद्रीत होते. म्हणून नवीन समित्यांचे सभापती आणि समित्यांचे सदस्य नेमण्याच्या संदर्भात गणपूर्तीसंबंधीची तरतूद केलेली आहे. ही स्वागतार्ह अशी तरतूद आहे हे आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

सभापती महोदय, कर्जाच्या मुदतीसंबंधीचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. घेतलेले कर्ज फेडण्यासाठी 60 वर्षाची तरतूद आहे. 60 वर्षे हा कालावधी खूप आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. या विधेयकातील प्रत्येक कलम सन्माननीय सदस्यांनी वाचले तर त्यांच्या लक्षात येईल की, नगरपालिकेच्या सार्वजनिक हिताच्या दृष्टीने, लोकांच्या हिताच्या दृष्टीने उभारले जाणारे कोणतेही कर्ज हे शासनाच्या पूर्व परवानगीनेच उभारले जाईल अशी तरतूद विधेयकामध्ये आहे. ते कर्ज फेडण्यासाठी हप्ते ठरवून दिलेले आहेत.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

व्याजाचे समान हप्ते पाडून दिलेले आहेत, ते हप्ते देण्यामध्ये काही कसूर झाली तर त्यांना मिळणारी जी अनुदाने आहेत, त्यात 12 वा वित्त आयोग असेल, 13 वा वित्त आयोग असेल, सरकारचे वैशिष्ट्यपूर्ण योजनेचे अनुदान असेल, रस्ते विकासाचे अनुदान असेल, केंद्र शासनाकडून येणारे अनुदान असेल, दलित वस्ती विकासाचे अनुदान असेल, अशी वेगवेगळी प्राप्त होणारी अनुदाने आहेत, ती अनुदाने गोठविण्याबाबतचे अधिकार या विधेयकाच्या माध्यमातून देण्यात आलेले आहे.

महोदय, 60 वर्षे म्हणजे अत्यंत दीर्घ कालावधी आहे असा उल्लेख करण्यात आला आहे. परंतु त्यासाठी वेगळी तरतूद केलेली नाही. यासंदर्भात पूर्वीच्याच कायद्यात तरतूद आहे. एखादे कर्ज उभारत असताना ते कर्ज किती कालावधीमध्ये फेडले पाहिजे, त्यासंबंधी हप्ते कसे द्यावेत याबाबतीत मूळ कायद्यातील तरतुदीला बाधा न आणता पूर्वीची तरतूद तशीच ठेवलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या पगाराची परस्पर सोय केली असा देखील प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला.

श्री. दिवाकर रावते : नगरपालिकेने कर्जाचे हप्ते दिले नाही तर त्यांना मिळणारी अनुदाने गोठविली जातील. नगरपालिकेस प्राप्त होणारी अनुदाने गोठविली तर त्या नगरपालिका क्षेत्रांचा विकास थांबेल. महाराष्ट्रातील नगरपालिकांची आर्थिक स्थिती कशी आहे याबाबतची माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना आहे. आज महाराष्ट्रातील काही नगरपालिकांकडे विजेच्या बिलांची एक-एक कोटी रुपयांची थकबाकी आहे. संभाजीनगर महानगरपालिकेकडे विजेची बिलाची थकबाकी 250 कोटी रुपये एवढी आहे. काही नगरपालिका, महानगरपालिकांनी आर्थिक परिस्थतीमुळे पाणी पुरवठा योजना ताब्यात घेतलेल्या नाहीत. या कायद्यात अशी तरतूद आहे की, नगरपालिकेकडे कर्जाचे हप्ते थांबले, ते हप्ते त्यांना देता आले नाही, त्यांची अनुदाने बंद केली जातील, पर्यायाने त्या ठिकाणी विकासाची कामे होणार नाहीत. अकोला महानगरपालिकेत कर्मचाऱ्यांना वेतन देण्यासाठी पैसे नाहीत, निवडणुकांसाठी पैसे नाहीत. अशीच परिस्थिती

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

अमरावती नगरपालिकेची आहे. नगरपालिकेने कर्जाचे हप्ते वेळेवर दिले नाहीत तर त्यांच्यावर जप्ती आणली जाईल. कर्ज घेण्यासाठी नगरपालिका फक्त जमीनच गहाण ठेऊ शकते, कर्जाचे हप्ते भरले नाहीत म्हणून शासन त्यांची जमीन जप्त करु शकते हे बरोबर होणार नाही.

महोदय, प्रत्येक महानगरपालिकेने वेगवेगळया योजनांची कामे हाती घेतलेली आहेत. त्या योजनांच्या कामांची किंमत आता तिपटीने वाढलेली आहे. जी योजना 100 कोटी रुपये किंमतीची होती, त्या योजनेची किंमत आता 300 कोटी रुपये एवढी झालेली आहे. त्या नगरपालिका पुढील 60 वर्षात उत्पन्न वाढीचा विचारही करु शकत नाही. कर्ज फेडण्याचा विषय तर बाजूलाच ठेवा. या रक्कमेपैकी 80 टक्के अनुदानाची रक्कम आहे. प्रश्न असा आहे की, उद्या जर नगरपालिकेची आर्थिक स्थिती कोसळली तर त्यांना भविष्यात कोणत्याही बाबीसाठी कर्ज उभे करता येणार नाही. अशा प्रकारची या विधेयकामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. पगाराचा वेगळा विषय आहे. त्या नगरपालिकांचे अनुदान शासनाकडून गोठविले जाईल. पण त्यांना भविष्यात कोणतीही योजना राबविण्यासाठी कर्ज उभे करता येणार नाही. शासन त्यांच्याकडून सर्व गहाणखताची कागदपत्रे जप्त करणार आहे. यामध्ये आधी सरकार आणि मग इतर अशा प्रकारची तरतूद आहे, हा गंभीर विषय मी उपस्थित केला होता.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मोठ्या शहरांना जेएनएनयुआरएम मार्फत कर्ज दिले जाते. छोट्या शहरांना युआयडीएसएसएमटी मार्फत कर्ज दिले जाते. ही कर्जे देत असताना त्यामध्ये केंद्र सरकारचा हिस्सा, राज्य सरकारचा आणि नगरपालिकांचा हिस्सा ठरलेला असतो. कोणतीही योजना राबवित असताना त्या नगरपालिकेची आर्थिक स्थिती कशी आहे याचा शासनाला अभ्यास करावाच लागतो. त्यांची कर्ज परतफेडीची क्षमता कशी आहे ते सुध्दा पहावे लागते. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी म्हटले ते बरोबर आहे. पण बऱ्याच वेळा याचे उत्तरदायित्व शासनाला घ्यावेच लागते. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 2-3 महानगरपालिकांचे उदाहरण दिले आहे. अकोला महानगरपालिकेची कर्मचाऱ्यांची पगार देण्याची आर्थिक क्षमता नसल्यामुळे शासनानेच त्यांना 16 कोटी रुपये दिले आहेत. त्या महानगरपालिकेला शासनाने 243 किंवा 244 कलमाखाली नोटीस देऊन आपले म्हणणे मांडण्याची संधी दिलेली आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

त्यांचे म्हणणे मांडून झाल्यावर तेथे प्रशासकांची नेमणूक केलेली आहे. ही वस्तुस्थिती आहे.

सन्माननीय सदस्यांनी 290 कोटींच्या भुयारी गटार योजनेबाबत उल्लेख केला आहे, सोलापूर, अकोला, औरंगाबाद या महानगरपालिकांची उदाहरणे सांगितली आहेत. या विधेयकातील मूळ उद्देशाची माहिती यापूर्वीच सांगितलेली आहे. महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा व जल निस्सारण या विषयासाठी स्वतंत्र अकाऊंट आहे आणि त्याचे स्वतंत्र ऑडिट केले जाते. तशा प्रकारे नगरपालिकांमध्येही व्यवस्था करावी, जेणे करुन केंद्र व राज्य सरकारकडून निधी दिला जातो. त्याचे अकाऊंटिंग होऊ शकेल.

यानंतर श्री.भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव........

तिसरा मुद्दा जो आपण मांडला त्याचा खुलासा मी केलेला आहे. माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी आर्थिक शिस्त आणावी असे सांगितले आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात 14 रुपये दरडोई ग्रँट रस्त्यासाठी दिली जात होती. आता हे प्रमाण लोकसंख्येच्या 50 टक्के झालेले आहे.

सभापती महोदय, एक मुद्दा अकाऊंट कोड बूक याबद्दल उपस्थित केलेला आहे. आता त्या संदर्भात बदल करण्यात आले असून यापुढे म्युनिसिपल अकाऊंट मॅन्युअल, 2011 लागू झालेले आहे. त्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत डबल एंट्री अकाऊटिंग होणार आहे. महालेखापालांनी त्या संदर्भात काही आक्षेप घेतले आहेत, त्या संदर्भातील ऑडिट पॅरा पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरु आहे. कमर्शियल प्रकल्पाकरिता अर्थसंकल्प तयार करावा अशी एक सूचना केली होती. ही बाब सुध्दा तपासून बघता येईल. सध्या वॉटर, पॉवर, सांडपाणी प्रक्रिया याबरोबर आणखी कोणकोणते टॅक्स आहेत यावर भाष्य केले होते. कायद्यात वेगवेगळ्या तरतुदी केलेल्या आहेत. सर्वसाधारण कर, सर्वसाधारण पाणीपट्टी, दिवाबत्ती, स्वच्छता कर, विशेष शौचकूप, अग्निशमन, पर्यावरण या व्यतिरिक्त वॉटर, पॉवर व सांडपाणी प्रक्रिया हे तीन कर आहेत. माननीय सदस्यांनी ज्या ज्या मुद्यांचा उल्लेख केला होता त्यांची दखल घेऊनच या तरतुदी केलेल्या आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नगरपालिकांनी त्यांचा निधी कुठे ठेवावा या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. नगरपालिकांनी त्यांचा पैसा अर्बन, सहकारी बँकांमध्ये ठेवल्यानंतर त्याची काय वासलात लागली हे आपल्या सर्वांच्या नजरेसमोर आहे. नगरविकास विभागाने या संदर्भात स्पष्टपणे आदेश दिलेले आहेत. कोणत्याही नगरपालिकेने यापुढे त्यांचा निधी राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवला पाहिजे असा निर्णय शासनाने घेतला आहे. काही अर्बन बँका चांगल्या आहेत. त्या संदर्भात देखील विचार झाला पाहिजे. चिपळूण अर्बन बँक चांगली आहे. त्यामुळे खास बाब म्हणून काही गोष्टींचा विचार झाला पाहिजे, त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी कांदळवनाचा मुद्दा उपस्थित केला होता. कांदळवन असल्यामुळे विकास कामे करता येत नाहीत असे त्यांनी सांगितले. दोन दिवसांपूर्वी विधानसभेत माननीय सदस्या श्रीमती मिनाक्षी पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला वन विभागाच्या माध्यमातून उत्तर देत असताना मी स्पष्टपणे सांगितले की, 1991 साली सॅटेलाईट





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

सर्व्हे झाला असून त्यामध्ये जे काही कांदळवन घोषित करण्यात आले आहे त्या पलीकडे कोणतेही कांदळवन गृहित धरुन विकास कामांना अडचण निर्माण केली जाणार नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी कोणत्या काळातील अपत्ये ग्राह्य धरायची याबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. या संदर्भात कायद्यात स्पष्ट तरतूद नसली तरी मला असे वाटते की, 12 वा 16 डिसेंबर, 2003 पूर्वी जन्मलेली तीन अपत्ये असतील तर कोणतीही अडचण येणार नाही. त्या नंतरच्या काळात जन्मलेली तीन अपत्ये असतील तर अडचण येऊ शकते. हा तांत्रिक मुद्दा उपस्थित केलेला आहे. हयात असलेली मुले या संदर्भात डिबेट होऊ शकते. माननीय सदस्यांनी स्वत: या संदर्भात न्यायालयात केस दाखल केली आहे. त्यामुळे हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे मी त्यावर अधिक भाष्य करणे उचित समजत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, न्यायप्रविष्ठ हा विषय बाजूला ठेवावा. हा प्रश्न महाराष्ट्रात सगळीकडे निर्माण झालेला आहे. ॲडव्होकेट जनरलना विचारुन नवीन कायदा करता येत असेल तर करण्यात यावा किंवा कायद्यात सुधारणा मांडली तर बरे होईल.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : महोदय, खोपोली नगरपरिषदेत 22 शिक्षकांच्या नियमबाह्य नेमणुका झाल्याचा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. यासंदर्भात मी असे सांगू इच्छितो की, अशा प्रकारच्या नेमणुका करता येत नाही हे मी पुन्हा सांगतो. त्यासाठी शिक्षणाधिकारी यांची मान्यता घ्यावी लागते व ती रेग्युलर प्रोसेस आहे, नवीन आहे अशातला भाग नाही. तसेच यामध्ये ज्या कॅटेगरीज व क्वॉलिफिकेशनचे लोक शिक्षक म्हणून घेतले आहेत, हा मुद्दा अचानक उपस्थित झालेला असल्याने ही बाब तपासून घेऊन चुकीचे काही घडले असेल तर त्यात दुरुस्ती करण्याचे काम सुध्दा विभागाच्या वतीने केले जाईल.

सन्माननीय सदस्यांनी याच नगर पालिकेत श्री. कुलदीप रामदास शेंडे यांचे नाव घेतले. यासंदर्भात मागील वेळी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते की, अशा प्रकारे जात बदलून खोटे प्रमाणपत्र मिळवून कोणी लाभ घेत असेल तर तसा फायदा त्या व्यक्तिला मिळता कामा नये. त्यानुसार खरोखरच हा प्रकार झाला असेल तर तो आपोआपच न्याय मिळेल यात शंका नाही.

या विधेयकावर बोलत असताना शासनाचे बजेट आहे की काय असाही उल्लेख करण्यात आला. तो सन्माननीय सदस्यांचा अधिकारच आहे. पण आपण अशा आविर्भावात बोललात की शासन फार मोठ्या प्रमाणात विरोधकांवर अन्याय व अत्याचार करीत आहे किंवा आपल्या अधिकाराचा वापर करुन संपूर्ण राजकारण अडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत आहे अशी जी शंका व्यक्त केली ती योग्य नाही. मला या निमित्ताने सांगितले पाहिजे की, जेएनएनयुआरएम, युआयडीएसएसएमटी किंवा फायनान्स कमिशन मधून तसेच दलित वस्ती सुधार योजनांसाठी राज्य शासनाने अशा नगर पालिकांना मदत केलेली आहे हे मात्र विसरता येणार नाही. एकंदरित ज्या योजना राज्याच्या तिजोरीतून चालविल्या जातात त्यांना देखील शासनाने मदत केली आहे. त्यात लोकसंख्येच्या आधारावर 50 टक्के निधी आपण दिलेला आहे. सुवर्ण राज्य नगरोत्थान अभियान ज्या 84 नगर पालिकांमध्ये राबविले जात आहे त्यात आपल्या नगर पालिकांचाही समावेश केलेला आहे, म्हणून शासन कोणत्याही प्रकारचा अन्याय करीत नाही हे मी पुन्हा सांगू इच्छितो. तसेच माझ्या राजकीय जीवनात कोणत्याही प्रकारचा पक्षपात मी कधीही केला नसून कोणावरही अन्याय

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

सुध्दा केलेला नाही. राजकारणात असलो तरी खोटे बोलणे मला जमत नाही. खरे बोलल्यामुळे अनेक वेळा राजकीय जीवनात फटके सुध्दा खाल्ले आहेत. या निमित्ताने मात्र इतकेच सांगू इच्छितो की, जे जे मुद्दे सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केले त्यांची नगर विकास विभागाच्या वतीने गांभीर्याने दखल घेऊन तसेच कोणाच्याही दबावाला बळी न पडता आमचा विभाग प्रयत्न करील अशी ग्वाही देतो. एवढे बोलून हे विधेयक मंजूर करावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

**उप सभापती** : मंत्री महोदय बोलताना आता असे म्हणाले की "राजकारणात असलो तरी खोटे बोलणे मला जमत नाही" याचा अर्थ राजकारणात असलेले लोक खोटे बोलतात असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, माझ्या म्हणण्याचा तसा अर्थ नाही. मला असे म्हणावयाचे की, माझ्या आयुष्यात मी अगोदर ट्रान्सपोर्टचा बिझनेस केला तेव्हाही मला खोटे बोलणे जमत नव्हते आणि आता देखील खोटे बोलता येत नाही.

**उप सभापती** : आता मी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव प्रथम मतास टाकतो.....

श्री. विनोद तावडे व श्री. दिवाकर रावते (बसून) : महोदय, आम्ही मत विभागणी मागतो.

**उप सभापती** : मी प्रस्ताव मतास टाकलेला आहे.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. दिवाकर रावते : महोदय, मत विभागणी मागण्याचा आमचा अधिकार आहे, आम्ही "पोल" मागितलेले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जे मुद्दे मांडले आहेत त्यासंदर्भात मी शब्दश: खुलासा केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अडचणीचे मुद्दे मांडले तसेच जे विधेयक माझ्या मनाला पटले नाहीत अशी दोन विधेयके मी स्वत:हून मंत्री असतांना सुध्दा मागे घेतलेली आहेत व यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी उल्लेख सुध्दा केलेला आहे. या विधेयकाच्या संदर्भात अडचणीचा मुद्दा असता तर मी स्वत:हूनच विधेयक थांबवले असते. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी पोलची मागणी न करता हे विधेयक एक मताने .....ते न जमल्यास फारतर बहुमताने संमत करावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, कोरमच्या मुद्याशी विरोधी पक्ष कन्सर्न असून त्यासाठीच आम्ही पोलची मागणी केली होती. शासनाचा सर्व कारभार हळू हळू हे शासन प्रशासनाकडे देत असून लोक प्रतिनिधीकडे कमी अधिकार देत आहे एवढाच आमचा मुद्दा आहे. या विधेयकाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय, सर्व काळजी घेणार असतील तर आम्ही पोलचा आग्रह धरणार नाही. सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य खाजगीमध्ये असे म्हणतात की, आमचे सरकार प्रशासनाच्या ताब्यात ब-याच गोष्टी द्यावयास लागले आहे. माननीय बॅ.अंतुले यांनी लोक प्रतिनिधीची प्रतिष्ठा वाढवली होती तशीच परंपरा हे शासन पुढे सुरु ठेवणार आहे का ? शेवटी लोकप्रतिनिधी हा लोकप्रतिनिधी असतो. नगरपालिका, महापालिका, 74 व्या घटना दुरुस्तीमध्ये लोकप्रतिनिधींचे अधिकार खाली आले असून पुन्हा आपले अधिकार प्रशासनाच्या ताब्यात देणार असू तर लोकप्रतिनिधींचे महत्व नकळत कमी होत जाईल. आपल्याला आजच्या स्थितीत ते योग्यही वाटत असेल परंतु 5-10 वर्षाने ते तितकेसे योग्य राहणार नाही एवढाच आमचा मुद्दा आहे. त्यावर शासन जरुर विचार करेल अशी अपेक्षा गृहीत धरुन आम्ही पोलची मागणी मागे घेत आहोत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** :आता मी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांचा प्रस्ताव पुन्हा मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून असंमत झाला.

**उप सभापती** :आता मी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांचा प्रस्ताव पुन्हा मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून असंमत झाला.

**उप सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 20 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. भास्कर जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 14 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2011 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 14 संमत झाले आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होऊन नियमित बैठक 11.45 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 11.29 ते 11.45 पर्यंत स्थगित झाली.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. भारवि...

**(स्थगिती नंतर)**

**(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

**माननीय सभापतींच्या निदेशाचे पालन करणे**

(तालिका सभापती आसनस्थ होताच सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी जय विदर्भ अशी घोषणा देतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांना आपण ताकीद दिली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी माननीय सभापतींनी दिलेल्या आदेशाचे पालन केले पाहिजे. याबाबत माननीय सभापतींनी निर्णय दिलेला आहे. तरी देखील या सभागृहात आगाऊपणे कोणी सन्माननीय सदस्य वागत असेल तर ते आम्ही सहन करणार नाही. जय महाराष्ट्र असेच बोलले पाहिजे.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, विदर्भ आमची राजधानी होती.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या संबंधी माननीय सभापतींनी रुलिंग दिलेले आहे. तरी सुद्धा सन्माननीय सदस्य उलट का बोलत आहेत ? माननीय सभापतींनी रूलिंग देताना ते जर उपस्थित नसतील तर त्यांच्या पक्ष प्रतोदांकडून माननीय सभापतींनी काय रूलिंग दिले आहे ते त्यांनी समजावून घेतले पाहिजे. आदरणीय सभापति महोदय ने कहा था कि जय महाराष्ट्र, जय विदर्भ कहने में दिक्कत नहीं है.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, विदर्भ महाराष्ट्रामध्ये नाही काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांना सांगू इच्छितो की, आपणास माननीय सभापतींनी एकदा निलंबित देखील केले होते.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : "विदर्भ" भारतीय जनता पार्टी के इसमें है, क्या इस शब्द के लिए आपका विरोध है ?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझे एवढेच म्हणणे आहे की, परवा माननीय सभापती महोदयांनी.....

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय......

श्री.विनोद तावडे : माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी जी मेरी आवाज आपसे ज्यादा ऊंची है.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री जैनुद्दीन जव्हेरी जी आप नीचे बैठिए.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : विदर्भ मेरा है...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम यांनी हा विषय मांडला. त्यावर चर्चा झाली. तद्‌नंतर परवाच माननीय सभापती महोदयांनी आपले मत देखील व्यक्त केले. ते म्हणाले की, आधी जय महाराष्ट्र म्हणून नंतर जय विदर्भ म्हणण्यास कोणतीही हरकत नसावी. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.जमा देखील होते. माननीय सदस्य श्री जैनुद्दीन जी आप उस समय सभागृह में नहीं थे. उस समय क्या बात हुई, आप थोड़ा समझ लीजिए.उस समय यह बात माननीय सभापति महोदय ने कही है. त्यामुळे माननीय सभापतींनी जे रुलिंग दिले आहे त्याचे पालन केले पाहिजे. ते त्यांनी मान्य केले पाहिजे. ते जर मान्य करीत नसतील तर त्यांना आपण बाहेर काढले पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सभापती महोदयांनी त्या दिवशी या संबंधातील निर्णय दिलेला आहे. तो निर्णय या सभागृहाला बंधनकारक आहे. आता प्रश्नोत्तरे घेण्यात येतील.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे...

**मौजे जातेगाव (ता.गेवराई, जि.बीड) येथील पेयजल पाणी पुरवठा योजनेत झालेला अपहार**

**(8) * 25929 ॲड. उषा दराडे , श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , श्री.विक्रम काळे** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे जातेगाव (ता.गेवराई, जि.बीड) येथील पेयजल पाणी पुरवठा योजनेत अपहार झाल्याचे दिनांक 14 डिसेंबर, 2011 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले वा तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे,प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र. 25929....

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, मौजे जातेगाव, तालुका गेवराई जिल्हा बीड येथे पेयजल योजना मंजूर करण्यात आली. त्या योजनेमध्ये भ्रष्टाचार झाल्याबाबत तक्रार करण्यात आली होती. त्या संदर्भात श्री. पवार, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बीड यांनी चौकशी केली आहे काय, असल्यास त्याबाबतच्या अहवालामध्ये काय म्हटले आहे? तसेच, ही योजना किती दिवसात पूर्ण होऊन जातेगावच्या लोकांना पाणी दिले जाणार आहे?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, पाणी पुरवठा योजनेची चौकशी केली असता त्यामध्ये काहीही अनियमितता झालेली आढळली नाही. ही योजना सन 2013 पर्यन्त पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या पाणी पुरवठा योजनेमध्ये झालेल्या अपहाराची चौकशी करावी या करिता प्रश्न उपस्थित केला होता. या योजनेमध्ये झालेल्या घोटाळयाची चौकशी स्थानिक कार्यकारी अभियंत्यांनी केली आहे. माझा प्रश्न असा आहे की, या घोटाळयाची चौकशी कार्यकारी अभियंत्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पातळीवर केली जाईल काय आणि त्यामध्ये जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल काय? तिसरा प्रश्न असा आहे की, जनतेला पाणी देण्यासाठी ही योजना तयार करण्यात आली असल्यामुळे या योजनेचे काम तातडीने पूर्ण करुन किती दिवसात ही योजना कार्यान्वित करुन लोकांना पाणी दिले जाणार आहे?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर अगोदर देतो. यामध्ये टप्पा एक आणि टप्पा दोन अशाप्रकारच्या योजना असून जातेगाव आणि एक तांडयाकरिता असलेली योजना टप्पा एक मध्ये येते आणि इतर सात तांडयामध्ये असलेली योजना टप्पा दोनमध्ये घेतली आहे. अशाप्रकारे टप्पा एक आणि टप्पा दोनमधील दोन्ही योजना अपूर्ण असून त्या सन 2013 पर्यन्त पूर्ण होतील. माननीय सदस्यांनी या प्रकरणी कार्यकारी अभियंत्यामार्फत चौकशी न करता उच्च स्तरीय चौकशी करावी अशी मागणी केली आहे. मी या संदर्भात सांगू इच्छितो की, मंत्रालयीन पातळीवरील एस.सी.आय. यांना त्या ठिकाणी पाठवून या प्रकरणी चौकशी पूर्ण केली जाईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील सर्व शिक्षकांना २४ वर्षांची वेतन श्रेणी लागू करण्याबाबत**

**(१) * २५६६५ श्री.कपिल पाटील , श्री.जयंत प्र.पाटील , श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे , प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.सतीश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २२३१५ ला दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शिक्षकांना २४ वर्षांची वेतन श्रेणी लागू करावी अशी मागणी शिक्षक भारती आणि अन्य संघटनांनी सातत्याने केली आहे हे खरे आहे काय,

(२) शिक्षकांना मुख्याध्यापकाशिवाय पदोन्नतीची दुसरी संधी नसल्यामुळे सर्व शिक्षकांना इतर राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे सरसकट २४ वर्षाची पदोन्नती वेतनश्रेणी मिळण्याबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, त्यामागील शासनाची भूमिका काय आहे ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) होय.

(२) व (३) शिक्षकांना २४ वर्षांच्या सेवेनंतर जाणीवपूर्वक काही अटींच्या अधीन राहून निवडश्रेणी लागू करण्यात आलेली आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, राज्य सरकारच्या सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना २४ वर्षाची सेवा झाल्यानंतर वरिष्ठ श्रेणी दिली जाते. असे असतांना फक्त शिक्षकांच्या बाबतीत दुजाभाव ठेवून त्यांना यामधून बाजूला कां काढण्यात आले आहे? दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देतांना "शिक्षकांना २४ वर्षांच्या सेवेनंतर जाणीवपूर्वक काही अटींच्या अधीन राहून निवडश्रेणी लागू करण्यात आलेली आहे" असे म्हटले आहे. म्हणजेच ज्यांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढ करुन घेतली आहे,ज्यांनी पदवीचे शिक्षण घेतले आहे त्यांना ही वेतनश्रेणी देय आहे. ती देतांना फक्त २० टक्केच शिक्षकांना सवलत दिली जाते. यामध्ये अधिक शिक्षण घेण्याची प्रेरणा नष्ट होत आहे. यामुळे अन्य राज्यांमध्ये केंद्राप्रमाणे ज्यांनी विशेष अर्हता प्राप्त केली आहे अशा सर्व शिक्षकांना २० टक्केची अट काढून टाकून राज्य सरकारच्या अन्य कर्मचाऱ्यांप्रमाणे ही निवड श्रेणी सरसकट सर्वांना लागू करणार काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २५६६५....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, केंद्र सरकारने चट्टोपाध्याय कमिशनच्या शिफारशीनुसार त्रिस्तरीय वेतनश्रेणी १२ ऑगस्ट १९८७ रोजी केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना लागू केली. त्यानंतर राज्य सरकारने २ सप्टेंबर १९८९ रोजी एक जी.आर. काढून त्रिस्तरीय वेतनश्रेणी या राज्यामध्ये लागू केली. त्यामध्ये असे अंतर्भूत आहे की, २० टक्के कर्मचाऱ्यांना वरिष्ठ श्रेणीमधून निवड श्रेणीमध्ये निवडण्यात येते. अशाप्रकारे सरकारी कर्मचाऱ्यांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी बरोबरच आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात येते. अशा दोन वेगवेगळया प्रकारच्या योजना असल्यामुळे त्यांची या ठिकाणी तुलना होऊ शकत नाही.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर समाधानकारक नाही. याचे कारण असे की, राज्य सरकारने राज्यातील सर्व शिक्षकांना २४ वर्षाची निवडश्रेणी सरसकट लागू केली. आपण वरिष्ठ श्रेणी लागू केल्यानंतर त्याचा लाभ फक्त २० टक्के लोकांना देता. याचा अर्थ असा की, सर्वांना बढतीची संधी नसल्यामुळे ते शिक्षक मुख्याध्यापकाच्या पदावर येऊ शकत नाहीत. त्याचप्रमाणे उप मुख्याध्यापक या पदाची बढती मिळत नाही. या ठिकाणी अशाप्रकारची अट आहे की, एस.एस.सी. डी.एड. झालेल्या शिक्षकांनी पदवीधर झाले पाहिजे आणि बी.एड. झालेल्या शिक्षकांनी पोस्ट ग्रॅज्युएशन केले पाहिजे. या अटी शासन शिथिल करणार काय? त्याचप्रमाणे केंद्र सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू केल्यानंतर तो जसाच्या तसा राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आला. केंद्र सरकारने हा आयोग लागू करीत असतांना कोणतीही अट घातली नव्हती. तरीसुध्दा केंद्र सरकारमधील शिक्षकांना निवड श्रेणी दिली जाते.जर त्या ठिकाणी ही अट लावली जात नाही तर महाराष्ट्रातील शिक्षकांना ही अट कां लावली जात आहे? ही लावण्यात आलेली अट आपण रद्द करणार काय, आणि त्या प्रमाणे सरसकट सर्व शिक्षकांना ही वेतनश्रेणी लागू केली जाईल काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी आता सांगितल्याप्रमाणे या ठिकाणी दोन वेगवेगळया प्रकारच्या वेतनश्रेणी आहेत. आपण त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्याचे तत्व स्वीकारतांना त्यामध्ये शिक्षक आणि अन्य कर्मचारी यांच्या कामाचे स्वरुप वेगवेगळे आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25665 ......

श्रीमती फौजिया खान .....

त्यांना व्हेकेशन असतात आणि या दोन विभिन्न बाबी आहेत त्यामुळे ही गोष्ट एकमेकांशी जोडता येणार नाही. तसेच सन्माननीय सदस्यांनी अटी बाबत सांगितले. याबाबत सांगावयाचे तर ज्या अटी आहेत त्या अनुषंगाने कुठेतरी निवड करण्यासाठी त्यांनी स्वत:च्या कार्यक्षमतेमध्ये वाढ करावी या हेतूने सर्व निकष ठरविण्यात आलेले आहेत. यामध्ये बदल करता येणार नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिल्याप्रमाणे आश्वासित प्रगती योजनेचा आणि शिक्षकांना मिळणाऱ्या त्रिस्तरीय वेतन श्रेणीचा कोणताही संबंध नाही. शिक्षकीय पदांना आश्वासित प्रगती योजना लागू नाही. आमची जी त्रिस्तरीय वेतनश्रेणी आहे ती देत असताना ज्या अटी टाकण्यात आलेल्या आहेत त्या अटींचा परिणाम अशा प्रकारे झाला आहे. प्रशिक्षण घेण्याच्या बाबतीत आमची कोणतीही अडचण नाही. तुम्ही आम्हाला प्रशिक्षण द्या. मग आम्हाला वरिष्ठ किंवा निवड श्रेणी साठी जे काही प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे ते घेण्यासाठी आमचे शिक्षक तयार आहेत. प्रश्न एवढाच आहे की, अन्य ज्या जाचक अटी आहेत त्याचा परिणाम आज महाराष्ट्रातील 50 टक्के शिक्षकांवर होत आहे. ग्रामीण भागात 20 टक्क्याची अट टाकण्यात आली. ज्याठिकाणी आठवी-नववी आणि दहावीचे तीनच वर्ग आहेत त्या शाळेमध्ये एक मुख्याध्यापक आणि चार शिक्षक अशी पदे मंजूर होतात. मात्र 20 टक्क्याच्या अटीमध्ये आमच्या 50 टक्के शाळा बसत नाहीत. म्हणून या ज्या अटी आहेत, त्या सर्व शिक्षकांना निवड श्रेणीपासून वंचित ठेवणाऱ्या आहेत. शासन 12 वर्षाची निवडश्रेणी सर्वांना देते. पण 24 वर्षानंतरची जी निवड श्रेणी आहे, ती 20 टक्के लोकांनाच मिळेल अशा प्रकारची अट आहे आणि ती निवृत्त होतानाच मिळते. मात्र त्या कालावधीमध्ये संबंधितांनी उच्च शिक्षण घ्यावयाचे, पदव्युत्तर पदवी प्राप्त करणे हे अडचणीचे आहे. म्हणून 24 वर्षाची सेवा, त्यांची गुणवत्ता, त्यांच्या प्रशिक्षणाच्या संबंधातील अटी आम्हाला मान्य आहेत. मात्र बाकीच्या ज्या जाचक अटी आहेत उदाहरण द्यावयाचे तर 20 टक्क्याच्या संबंधातील अट आहे, ती आपण रद्द करणार आहात काय आणि त्याचा लाभ सर्व शिक्षकांना देण्याच्या दृष्टीने फेरविचार करणार आहात काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, याबाबत फेरविचार होणार नाही. 20 टक्केच पदे ही निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहेत आणि आज सुध्दा ज्या संस्थेमध्ये पाच पेक्षा कमी संख्या आहे तेथे आपण हे ग्राह्य धरत नाही. त्यामुळे याबाबतीत जे काही शिथिल करता येईल त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाबत विचार करण्यात आला आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्ही देखील शिक्षक आहोत आणि आम्ही सुध्दा अभ्यास करुन येथे प्रश्न उपस्थित करीत असतो. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, शिक्षकांनी आपली अर्हता वाढविली पाहिजे, बिलकूल वाढविली पाहिजे आणि याला विरोध नाही. पण 24 वर्ष झाल्यानंतर वरिष्ठ श्रेणी मिळते, ज्याला निवड श्रेणी म्हणतात म्हणजे पगारामध्ये थोडीशी वाढ होते आणि 24 वर्षानंतर सेवानिवृत्त होण्यासाठी तीन किंवा चार वर्षाची नोकरी शिल्लक रहाते आणि मग बी.एससी झालेला माणूस एम.एससी कसा होईल ? आपण सुध्दा शिक्षणातील महर्षी आहात. एखादा माणूस वयाच्या 55 व्या वर्षी एम.एससीला ॲडमिशन घेऊन तेथे प्रॅक्टीकल करु शकतो काय? माननीय मंत्री महोदया देखील एक शैक्षणिक संस्था चालवितात. 55 व्या वर्षी कोण एम.एससी करणार आणि तो प्रॅक्टीकल कसे करणार ? तो शिक्षक विद्यार्थ्यांना शिकविणार की प्रॅक्टीकल करणार आहे? आपण ही वास्तविकता तपासावी.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आमची अशी मागणी आहे की, ज्यांनी 24 वर्षे पूर्ण केली आहेत, त्या सगळया शिक्षकांना ही वेतनश्रेणी मिळावयास पाहिजे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे एकतर 20 टक्क्याची अट काढून टाकावी तसेच पोस्ट ग्रॅज्युएशनची अट देखील काढून टाकावी. आपण प्रशिक्षणाची अट ठेवावी, त्यासाठी प्रोग्रॅम तयार करावा आणि आमचे शिक्षक प्रशिक्षण घेण्यास तयार आहेत. पण या दोन अटी काढण्यासाठी सरकार किमान विचार करील एवढे तरी म्हणावे. माननीय मंत्री महोदयांनी नकारात्मक भूमिका घेऊ नये अशी आपल्याकडून अपेक्षा आहे. त्यामुळे याबाबतीत आपण किती दिवसामध्ये निर्णय घेणार आहात ?

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25665..

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शिक्षक पदव्युत्तर शिक्षण केव्हाही घेऊ शकतात त्यासाठी त्यांनी वयाची 55 वर्षे होईपर्यंत थांबण्याची आवश्यकता नाही. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे 20 टक्क्याची अट राहणार आहे. त्या संदर्भात शासनाने जागरुकपणे निर्णय घेतलेला आहे आणि त्यामध्ये बदल होणार नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी शिक्षकांच्या पदव्युत्तर शिक्षणा संदर्भात प्रश्न विचारला होता. सन्माननीय सदस्यांना मंत्री महोदयांकडून "होय" अशा उत्तराची अपेक्षा होती आणि माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे देताना शिक्षकांनी पदव्युत्तर शिक्षण घेतले पाहिजे असे सांगितले. पदव्युत्तर शिक्षण घेतल्यामुळे शिक्षक प्रशिक्षित होतात आणि त्यामुळे ते शिक्षण क्षेत्रात योग्य होतात. माझा प्रश्न आहे की, श्री.वेळूकर यांनी सिध्द केलेले आहे की, ते पीएचडी नसताना पीएचडीचे प्रमुख होऊ शकतात. तेव्हा आपण या संदर्भात श्री.वेळूकर यांचे मार्गदर्शन घेणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न मूळ प्रश्नाशी संबंधित नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सहावा वेतन आयोग जशाच्या तसा लागू करण्यात येईल अशी घोषणा राज्य सरकारने केली होती. परंतु सहावा वेतन आयोग लागू करताना शिक्षकांच्या बाबतीत "हकीम" कमिटी नेमण्यात आली. अन्य शासकीय कर्मचाऱ्यांची कोणतीही अधिकची अर्हता न पाहता त्यांना अधिकची वेतनश्रेणी देत आहात. परंतु शिक्षक स्वत:ची गुणवत्ता सिध्द करीत 24 वर्षाच्या सेवेनंतर किमान समान न्याय मागत आहे आणि शासन 20 टक्क्याची अट घालत आहे. म्हणजे उर्वरित 80 टक्के शिक्षकांवर शासन अन्याय करीत आहे. तेव्हा हा भेदभाव दूर करावा एवढीच आमची मागणी आहे. एका बाजूला शासन 24 वर्षाची वेतनश्रेणी लागू करीत आहे तर दुसरीकडे त्या बाबत 20 टक्क्याची अट घालत आहे हे बरोबर नाही. तेव्हा शासनाने असा भेदभाव करणे योग्य नाही. तेव्हा शासन या अटीमध्ये बदल करणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळ्या प्रकारे प्रश्न विचारले तरी आम्हाला अटीमध्ये बदल करता येणार नाही.

------ ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अनुदानित/विनाअनुदानित संस्थेतील शाळांची व कायम अनुदानित तुकडयांची बिंदु नामावली स्वतंत्र ठेवण्याबाबत**

**(2) * 25012 श्री.वसंतराव खोटरे , प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.विक्रम काळे , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.अनिल भोसले , श्री.जयवंतराव जाधव , श्री.संदिप बाजोरिया : तारांकीत प्रश्न क्रमांक 21487 ला दिनांक 16 डिसेंबर, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अनुदानित/विनाअनुदानित संस्थेतील शाळांची व कायम विना अनुदानित तुकड्यांची बिंदु नामावली स्वतंत्र ठेवण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव यांनी सहाय्यक आयुक्त (मावक) विभागीय आयुक्त, नाशिक यांना पत्र क्र. मावक/कार्या18/कावि/45878/2009, दिनांक 29 ऑगस्ट,2008 च्या पत्राबाबत सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(3) नसल्यास, उपरोक्त बाबतीत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) शा.नि. दि.20.7.2009 अन्वये कायम विना अनुदानित शाळांमधील "कायम" हा शब्द वगळण्यात आला आहे. तसेच कायम विना अनुदानित तुकड्यांमधीलही "कायम" शब्द वगळण्यात आला आहे. त्यामुळे सद्य स्थितीत या शाळा व तुकड्या विनाअनुदानित आहेत. सबब, एका संस्थेच्या अनुदानित व विनाअनुदानित शाळांचे व तुकड्याचे रोस्टर एकत्र ठेवणे आवश्यक आहे.

(2) व (3) कार्यवाही चालू आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी माझ्या प्रश्नाचे अर्धे उत्तर बरोबर दिलेले असल्यामुळे मी त्यांचे सुरुवातीला अभिनंदन करतो. एकाच संस्थेतील अनुदानित व विना अनुदानित तुकड्यांचे रोस्टर एकत्रित ठेवणे आवश्यक आहे हा शासनाचा निर्णय योग्य आहे. मी या निमित्ताने शासनाच्या निदर्शनास एक बाब आणू इच्छितो की, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचेकडे जवळपास 300 ते 400 शाळांची रोस्टर पडताळणीकरिता प्रलंबित आहेत. आयुक्त कार्यालय सांगते "आम्हाला तसे पत्र दिले तरच आम्ही रोस्टरची पडताळणी करु." तेव्हा

..3..



AJIT/ D/ MMP/ पूर्वी श्रीमती रणदिवे.. 12:00

ता.प्र.क्र.25012 ....

श्री.वसंतराव खोटरे...

एकाच संस्थेतील अनुदानित व विना अनुदानित तुकड्यांचे रोस्टर एकत्रित ठेवणे आवश्यक आहे असे पत्र अधिवेशन संपण्यापूर्वी उप संचालक, शिक्षण आणि शिक्षण विभागाला पाठविण्यात येईल काय ? दुसरे म्हणजे इयत्ता 11 वी व 12 वीच्या शाळांतील कायम शब्द अजून काढलेला नाही. तो लवकरात काढला जाईल. रोस्टर एकत्रितपणे होत असेल तर चांगलेच आहे कारण यामुळे भेदभाव नाहिसा होणार आहे. तेव्हा आपण उप संचालक, शिक्षण यांना तसेच शिक्षण विभागाला अनुदानित आणि विना अनुदानित तुकड्याचे रोस्टर एकत्र ठेवण्या बाबत पत्र पाठविणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे तसे पत्र पाठविण्यात येईल आणि यातील संदिग्धता दूर करण्यात येईल.

--------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विनाअनुदान काळातील सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरणेबाबत**

**(3) * 25576 श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे , प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.सतीश चव्हाण , श्री.कपिल पाटील , श्री.जयंत प्र. पाटील , डॉ.सुधीर तांबे , श्री.रामनाथ मोते , श्री.विनोद तावडे , श्री.संजय केळकर , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.राजन तेली , श्री.एम.एम.शेख , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री. एस. क्यू. ज़मा : तारांकित प्रश्न क्रमांक 23163 ला दिनांक 23 डिसेंबर, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) माध्यमिक शिक्षकांची विनाअनुदानित सेवा वरिष्ठ / निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याचा निर्णय माहे नोव्हेंबर, 2006 मध्ये झाला आहे, हे खरे आहे काय,

(2) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विनाअनुदान काळातील सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरणेबाबत प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, उक्त प्रकरणी मुंबई व औरंगाबाद उच्च न्यायालयाने काही याचिकाकर्त्यांना वरिष्ठ व निवडश्रेणी ग्राहय धरण्याबाबतचा निर्णय दिलेला आहे व निर्णयाची अंमलबजावणी न केल्यास शासनाविरूद्ध अवमान याचिका दाखल करण्याचा दिलेल्या इशाऱ्यासंदर्भात शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(3) असल्यास, गेल्या पाच वर्षापासून शिक्षकेतर कर्मचारी, उच्च माध्यमिक शिक्षक व प्राथमिक शिक्षक यांची विनाअनुदानित सेवा वरिष्ठ / निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबत या सभागृहात सातत्याने विषय उपस्थित झाला आहे, हे खरे आहे काय,

(4) दिनांक 21 डिसेंबर, 2011 रोजी या विषयासंबंधी निर्णय घेण्याच्या सभागृहातील आश्वासनाची पूर्तता होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(5) उक्त प्रकरणी मुंबई व औरंगाबाद उच्च न्यायालयाने काही याचिकाकर्त्यांना वरिष्ठ / निवडश्रेणी ग्राह्य धरण्याबाबत निर्णय दिलेला आहे व निर्णयाची अंमलबजावणी न केल्यास शासनाविरुध्द अवमान याचिका दाखल करण्याच्या दिलेल्या इशाऱ्यासंदर्भात शासनस्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली ,

(6) नसल्यास, उक्त प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ? ..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25576....

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) होय.

(2), (3), (4) व (5) सदर न्यायालयीन प्रकरणी सुधारित शपथपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकेतर कर्मचारी आणि प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक यांच्या विनाअनुदानित काळातील सेवा वरिष्ठ व निवडश्रेणी साठी ग्राहय धरण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(6) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाने दिलेले आदेश हे सरकार मानणार आहे की नाही असा प्रश्न उपस्थित झालेला आहे. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आणि मुंबई उच्च न्यायालयाने शासनास निदेश दिलेले आहेत की, विनाअनुदानित काळात केलेली सेवा सर्व लाभांसाठी ग्राह्य धरावी. सन 2006 मध्ये राज्य शासनाने प्राथमिक शिक्षकांच्या बाबतीत निर्णय घेतला होता. आता प्राथमिक शिक्षक,उच्च माध्यमिक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी घटक राहिले होते,

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25576 ..... श्री. विक्रम काळे ....

यासाठी आम्ही 2006 ते 2012 पर्यंत सहा वर्षे वेळोवेळी या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करीत आहोत. शासन फक्त विचाराधीन आहे एवढे उत्तर देत आहे. दोन्ही हायकोर्टांनी शासनाला डायरेक्शन्स दिलेल्या आहेत. शासनाने कोर्टाचा आदर करावा असे मला वाटते. म्हणून ज्या पध्दतीने माध्यमिक शिक्षकांची विनाअनुदानित काळातील सेवा ग्राह्य धरली त्याच पध्दतीने प्राथमिक शिक्षक त्याचबरोबर शिक्षकेतर कर्मचारी आणि उच्च माध्यमिक शिक्षकांची विना अनुदानित काळातील सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याचा निर्णय अधिवेशन संपण्यापूर्वी शासन घेणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, हा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. विभागाने शासनाकडे जो प्रस्ताव पाठविला होता त्यावर शासनाने असे मत व्यक्त केले होते की, हे शक्य होणार नाही कारण या बाबतीत वित्तीय भार जास्त आहे. तरी सुध्दा फेरविचार करण्यासाठी विभागाने पुन्हा शासनाकडे विनंती केलेली आहे आणि ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटले आहे की, न्यायालयीन प्रकरणी सुधारित शपथपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या सुधारित शपथपत्रामध्ये शासनाने काय भूमिका घेतलेली आहे ? ज्यांनी विनाअनुदानित काळात शासनाकडे पैसे नाहीत, पैसे देण्याची नियत नाही म्हणून बिनपगारी काम केले त्याना फक्त त्यांची सेवा वरिष्ठ आणि निवडश्रेणीसाठी जोडून मागत आहोत. कारण सेवानिवृत्तीच्या वेळी ती सेवा त्यांच्या कामी येणार आहे. माध्यमिकच्या बाबतीत आपण ती दिलेली आहे. उच्च माध्यमिक आणि प्राथमिकला दिलेली नाही. शिक्षकेतरांना आपण दिलेली नाही. आपल्याला असा भेदभाव करता येणार नाही. यामध्ये वित्तीय भार फारसा येत नाही. शासनावर भार येतो म्हणून आपण अनुदान दिले नाही. ते त्यांनी सोसले आणि पुन्हा अजून सोसायचे हे बरोबर नाही. नोकरीतील अर्धे आयुष्य त्यांनी बिनपगारी काढले त्यांना आपण सांगणार की, आपली सेवा ग्राह्य धरणार नाही. कारण शेवटी त्यांची जी आठ ते दहा वर्षे शिल्लक राहतात त्यावेळी तरी त्यांना न्याय मिळावा एवढी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25576..... श्री. कपिल पाटील ....

अपेक्षा आहे. त्यामुळे माध्यमिक शिक्षकांना जो न्याय लावला तो न्याय शासन प्राथमिक आणि उच्च माध्यमिकला लावणार का आणि सुधारित शपथपत्रामध्ये ही भूमिका शासन घेणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शपथपत्र हायकोर्टात सादर करण्यात आलेले आहे आणि त्यामध्ये शासनाने ही भूमिका घेतलेली आहे की, शासनाला यावर कॉन्शस निर्णय घ्यावा लागेल कारण यामध्ये वित्तीय भार जास्त आहे. या संदर्भात शासन विचार करीत आहे. अशा पध्दतीची भूमिका आपण घेतलेली आहे.

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, माध्यमिक विभागाला शासनाने हे लागू केलेले आहे. यामध्ये वित्तीय भाराचे कारण प्रस्तुत नाही कारण माध्यमिक विभागाला हे लागू केलेले आहे. केवळ उच्च माध्यमिक, शिक्षकेतर आणि प्राथमिक विभागाला टाळत आहेत. असा भेदभाव करण्याचे कारण दिसत नाही. म्हणून या सर्वांना तातडीने हे लागू करणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शासनाच्या विचाराधीन आहे याचा अर्थ असा आहे की, सगळ्या बाजूंनी विचार करुन या बाबतीत शासन निर्णय घेण्यासाठी कार्यवाही चालू आहे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे तशाच प्रकारचे उत्तर एक वर्षापूर्वी दिले होते. दिनांक 22.3.2011 रोजी माननीय मंत्री महोदयांनी जसेच्या तसे उत्तर दिलेले आहे. त्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, नागपूरच्या अधिवेशनात माननीय शिक्षण मंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, या प्रश्नाच्या बाबतीत विभाग विचार करीत आहे. त्यानुसार फाईल देखील मूव्ह केली असून यासबंधीचा निर्णय कॅबिनेटच्या बैठकीमध्ये होणार आहे. हे सुध्दा त्यावेळी सांगितले होते. त्याकरिता फाईल मूव्ह करण्यात आली असून काही त्रुटी विभागाने काढल्या असून ती फाईल आता प्रोसेसमध्ये आहे. तसेच ही बाब आर्थिक बाबीशी निगडित असल्याने लवकरात लवकर मंत्रिमंडळामध्ये हा विषय आणून त्यावर निर्णय घेण्यात येईल. या गोष्टीला वर्ष झाले. या संदर्भात 543 शिक्षकेतर कर्मचारी कोर्टामध्ये जिंकलेले आहेत. त्यांना वैयक्तिक लाभ अजून मिळालेला नाही. प्राध्यापक, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक हे सुध्दा कोर्टात जिंकून आलेले आहेत. त्यांना वैयक्तिक लाभ मिळालेला नाही. या बाबतीत धोरणात्मक निर्णय

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25576..... श्री. वसंतराव खोटरे ....

घेऊन शिक्षकेतर कर्मचारी, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक, प्राथमिक शिक्षक यांना वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ही सेवा गाह्य धरण्यात येईल का आणि या बाबतीत शासन निर्णय घेणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, धोरणात्मक निर्णय घेण्याच्या संदर्भात एकदा शासनाकडून नकारात्मक पध्दतीने निर्णय घेण्यात आलेला आहे. तरी सुध्दा विभागाने पुन्हा विनंती केलेली आहे आणि ती बाब आता कार्यवाहीच्या प्रक्रियेमध्ये आहे असे मी सांगितले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ पूर्वी श्री.बरवड 12:10

ता.प्र.क्र.25576....

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हा प्रश्न गेल्या 10 वर्षांपासून या सभागृहात मांडण्यात येत आहे. विना अनुदानित सेवा पेन्शनसाठी ग्राह्य धरली जाते, उपदान देताना त्यांची सेवा ग्राह्य धरली जाते, वेतन निश्चित करीत असताना त्यांची सेवा ग्राह्य धरली जाते. त्याप्रमाणेच प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विना अनुदानित काळातील सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात यावी असा आग्रह आहे. शासनाने दिनांक 28.11.2006

रोजी माध्यमिक शाळांसाठी निर्णय घेतला आहे. परंतु प्राथमिक, उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यातून वगळले आहे. हा प्रश्न गेल्या 6 वर्षांमध्ये 22-23 वेळा सभागृहात आलेला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांनी 2011 मध्ये दिलेल्या उत्तराचा उल्लेख केलेला आहे. त्यापूर्वी दिनांक 12.4.2010 रोजी सुध्दा मंत्री महोदयांनी असेच उत्तर दिलेले आहे. परंतु या "हा लाभ मिळावा यासाठी संचालकांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. यामुळे शासनाला दरवर्षी 27 कोटी 41 लाख रुपयांचा खर्च येणार आहे. हा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविलेला आहे. सदर प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर गेलेला आहे. मंत्रिमंडळामध्ये या संदर्भात चर्चा झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल" त्यानंतर माननीय सभापतींनी निर्देश दिल्यानंतर मंत्रिमंडळ यावर लवकरात लवकर निर्णय घेईल एवढेच मी सांगू शकते असे मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. सभापती महोदय, या सभागृहात सातत्याने एकच प्रश्न विचारला जात आहे. त्यामुळे सरकारला प्राथमिक, उच्च माध्यमिक असा भेदभाव करता येणार नाही. या विषयावर आता खूप चर्चा झालेली आहे. सभागृहात एकच विषय सातत्याने मांडणे बरोबर नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, हा भेदभाव दूर करण्याच्या दृष्टीने माध्यमिकसाठी काढण्यात आलेला जी.आर. प्राथमिक व उच्च माध्यमिकच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी जसाचा तसा लागू करण्यासंबंधी शासन धोरणात्मक निर्णय घेऊन जी.आर.काढणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, एकाच विषयावर अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारत आहेत. त्यामुळे माझे उत्तर सुध्दा तेच असणार आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांना वेगळे उत्तर देऊ शकणार नाही.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

ता.प्र.क्र.25576....

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

प्रा.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, माध्यमिक शिक्षकांप्रमाणे उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रश्न 10 वर्षांपासून सभागृहात उपस्थित केला जात आहे. 543 शिक्षकेतर कर्मचारी कोर्टामध्ये गेले होते. कोर्टाने निर्णय दिल्यानंतरही त्यांना अद्याप लाभ मिळालेला नाही. त्यांना तो लाभ मिळेल काय आणि सर्वांसाठी शासन या अधिवेशनामध्ये या संदर्भातील जी.आर.काढणार आहे काय ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर मंत्री महोदयांना तेच तेच उत्तर देता येणार नाही. कोर्टाने दिलेल्या निर्णयाबाबत मंत्री महोदय उत्तर देण्याचे टाळत आहेत. सभागृहात तेच तेच उत्तर देता येत नाही. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न त्यांना मान्य नसेल तर त्यांनी तसे सांगावे. मान्य असेल तर मंत्रिमंडळामध्ये झालेल्या निर्णयाची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारत आहेत. त्या अनुषंगाने माननीय राज्यमंत्री उत्तर देत आहेत. यापूर्वी जसा प्रश्न विचारला होता त्यामुळे तसेच उत्तर दिलेले आहे. प्रश्नाचे स्वरुप सारखेच असल्यामुळे उत्तर देखील तसेच दिले जात आहे. सन्माननीय सदस्यांना अभिप्रेत असलेले उत्तर मंत्री महोदयांनी दिले पाहिजे अशी अपेक्षा करणे योग्य नाही. सन्माननीय राज्यमंत्र्यांनी या प्रश्नामुळे शासनावर आर्थिक भार पडणार असल्यामुळे हा प्रश्न विचाराधीन असल्याचे वारंवार सांगितले आहे. सरकारसमोर हा प्रश्न असल्यामुळे सरकार त्यावर विचार करीत आहे. त्याबाबत कधी निर्णय होईल हे सांगता येत नाही. सरकार अनुमती देईल त्यावेळी हा प्रश्न सुटेल. जर सन्माननीय सदस्य तेच तेच प्रश्न विचारत असतील तर उत्तर सुध्दा तसेच दिले जाईल. मंत्री महोदयांकडून वेगळे उत्तर कसे काय येऊ शकेल ?

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 12:15

ता.प्र.क्र.25576.....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर शांत बसावे.

श्री. विक्रम काळे : सन्माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांना शिक्षकांबद्दल फार तळमळ आहे, योगायोग असा असतो की, जेव्हा शिक्षकांच्या संदर्भातील प्रश्न सभागृहामध्ये चर्चिला जातो त्यावेळी माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे साहेब हे सभागृहामध्ये हजर असतात आणि आज देखील तसा योगायोग आहे. माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे साहेब हे राज्याचे माजी मुख्यमंत्री होते, ते नेते आहेत त्यामुळे त्यांनी शिक्षकांच्या संबंधी मंत्रिमंडळामध्ये शब्द टाकावा जेणेकरुन तेच तेच उत्तर येणार नाही.

सभापती महोदय, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांचे आझाद मैदानावर धरणे आंदोलन सुरु आहे. भेदभाव मिटविण्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवून माननीय शिक्षण विभागाच्या मंत्र्यांनी माननीय वित्त मंत्र्यांकडे जावे.माध्यमिक शाळेच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना जो जी.आर. लागू केलेला आहे त्याप्रमाणे तो प्राथमिक शाळेच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना देखील लागू करावा अशी मागणी आहे...

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांचा या ठिकाणी उल्लेख केला की, ते माजी मुख्यमंत्री होते. उद्या त्यांचा वाढदिवस आहे. ते भावी काळात मुख्यमंत्री होवोत अशा त्यांना शुभेच्छा द्या...

श्री. विक्रम काळे : माझा प्रश्न असा आहे की, शिक्षक उच्च न्यायालयामध्ये गेल्यानंतर उच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयाचे पालन सरकार करील काय ? उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यामध्ये भेदभाव केला जाणार नाही याची हमी शासन देईल काय ?

प्रा. फौजिया खान : आर्थिक अडचणीची हार्ड रिॲलिटी न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील खाजगी अनुदानित शाळांमधील कायम विनाअनुदानित तुकड्यांचा कायम शब्द वगळण्याबाबत**

**(४) * २६३८१ श्री.रामनाथ मोते , श्री.विनोद तावडे , श्री.संजय केळकर , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो पुंडलिक गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायम विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचा (इंग्रजी माध्यम वगळून) परवानगी आदेशातील "कायम" शब्द वगळण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील किती प्राथमिक व माध्यमिक शाळा मुल्यांकनास पात्र ठरणार आहेत,

(३) शासनमान्य अनुदानित खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये शासनाने वाढीव / अतिरिक्त तुकडयांना कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील कायम विनाअनुदानित तुकडयांची संख्या किती आहे,

(५) कायम विनाअनुदानित शाळांप्रमाणेच अनुदानित शाळांमधील कायम विनाअनुदान तुकडयांचा "कायम" शब्द वगळण्याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी शासनास अनेक निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंदाजे ४००० प्राथमिक व माध्यमिक शाळा मूल्यांकन होण्यास पात्र आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) तुकड्यांची संख्या निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५), (६) व (७) शासन निर्णय दिनांक १६ मार्च, २०१२ अन्वये कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या प्राथमिक व माध्यमिक (इंग्रजी माध्यम वगळता) शाळांतील वाढीव तुकड्यांचा/ वर्गांचा कायम शब्द काढण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

श्री. रामनाथ मोते : मी शासनाला आणि माननीय मंत्री महोदयांना मनापासून धन्यवाद देतो, त्यांचे आभार व्यक्त करतो. कायम विनाअनुदानित शाळांचा "कायम" शब्द काढण्यात आला, प्राथमिक आणि माध्यमिक शाळा विनाअनुदानित ठरल्यामुळे त्यांचे मूल्यांकन होईल आणि त्या मूल्यांकनानुसार त्या अनुदानास पात्र ठरतील. दिनांक 16 मार्चला जी.आर. निघाला आणि कायम विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचा "कायम" हा शब्द गेला. हा "कायम" शब्द गेल्यामुळे 16 मार्चच्या शासन निर्णयापासून राज्यातील किती प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील तुकड्यांना याचा लाभ होणार आहे, तुकड्यांची संख्या किती आहे ? ज्या पध्दतीने "कायम" शब्द काढल्यामुळे 2012-13 पासून मूल्यांकन करुन अनुदान देण्यात येणार आहे त्या पध्दतीने 2012-13 पासून

..3..



MSS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 12:15

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यांना टप्पानिहाय अनुदानासाठी पात्र ठरविण्यात येणार आहे काय ? ज्या पध्दतीने त्या शाळांना अनुदानास पात्र ठरविलेले आहे, ज्या पध्दतीने त्यांना 2012-13 पासून अनुदान देण्यात येणार आहे त्या पध्दतीने या तुकड्यांना सुध्दा 2012-13 पासून शासन अनुदानास पात्र ठरविणार आहे काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26381....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या प्रश्नाबाबत सुरुवातीपासून काहीही कन्फ्यूजन गरज नव्हती असे मला वाटते.शाळांच्या बाबतीत "कायम" शब्द काढण्यात आला, तेव्हा तुकडयांच्या देखील "कायम" शब्द काढण्यात आलेला आहे असे अभिप्रेतच होते व तसा शासनाने आदेशही दिलेला होता. याबाबातचे क्लेरिफिकेशन करण्यासंबंधी शासनाने पुन्हा एक जी.आर.काढलेला आहे. शासनाने शाळा मूल्यांकनाचा दुसरा निर्णय घेतलेला आहे तो निर्णय देखील अतिशय स्पष्ट आहे. आपण 2012-2013 पासून शाळांचे मूल्यांकन करुन, त्या शाळा अनुदान पात्र म्हणून ठरविणार आहोत. तशीच पध्दत, तशीच प्रक्रिया या शाळा तुकडयांसाठी देखील लावणार आहोत.

डॉ.रणजित पाटील : ज्या शाळांना अनुदान आहे, अशाच शाळांमधील तुकडया विना अनुदानित होत्या. मला असे वाटते की, ज्या शाळांना वर्षानुवर्षे अनुदान आहे, त्या ठिकाणी सर्व प्रकारच्या सुविधा आहेतच. त्या शाळांमधील तुकडयांची पुन्हा मूल्यांकनाची आवश्यकता काय ?

प्रा.फौजिया खान : मूल्यांकनाची आवश्यकता आहे. त्याचे कारण असे आहे की, शाळा मूल्यांकनाबाबत निकष ठरविलेले आहेत, त्याप्रमाणे त्या शाळांमधील तुकडयांसाठी इन्फ्रास्ट्रक्चर आहे किंवा नाही, त्याचे लर्निंग आऊटकम कसे आहे, या सर्व गोष्टी बघणे आवश्यक आहे. या गोष्टीची पाहणी करण्यासाठी मूल्यांकनाची आवश्यकता आहे.

श्री.कपिल पाटील : माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी नुकतेच सांगितले की, विना अनुदानित शाळांचा कायम हा शब्द गेला, त्याचवेळेला तुकडयांच्या देखील कायम शब्द गेलेला आहे. ज्या तारखेस कायम हा शब्द गेला असेल, त्या तारखेपासून अनुदानित शाळांमधील कायम विना अनुदानित तुकडया होत्या, त्या अनुदानावर आल्या असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे त्या 100 टक्के अनुदानास पात्र ठरतात. टप्प्याला नाही. त्या तारखेपासून त्या तुकडया अनुदानास पात्र आहेत आणि त्यांना ते मिळत आहे असा त्याचा अर्थ अभिप्रेत होतो काय ?

प्रा.फौजिया खान : नाही.

---------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अमरावती येथील गोल्डन किड्स पूर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या व्यवस्थापन पालकांची गैरकायदेशीररित्या फसवणूक करून आर्थिक लूट करीत असल्याबाबत**

**(५) * २५२३३ डॉ.रणजित पाटील , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.भगवान साळुंखे** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील एल.वाय.डी.जे.लेडीज क्लब अमरावती द्वारा संचालित गोल्डन किड्स पूर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांच्या व्यवस्थापन पालकांची गैरकायदेशीररित्या फसवणूक करुन आर्थिक लूट करीत असल्याबाबतची तक्रार पोलीस आयुक्त, अमरावती शहर, शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती व शिक्षणाधिकारी माध्यमिक-प्राथमिक यांना दिनांक १७ ऑक्टोबर, २०११ रोजी पालक संघर्ष समिती, गोल्डन किड्स विद्यालय यांनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण उपसंचालक, अमरावती यांनी शिक्षणाधिकारी माध्यमिक व प्राथमिक, अमरावती यांना चौकशीचे आदेश दिनांक १० जून, २०११ रोजी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदेशानुसार चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) त्यानुसार सदर गोल्डन किड्स विद्यालय पालकांची फसवणूक करीत असल्यास त्या संस्थाचालकांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) अद्यापपर्यंत कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) व (२) होय.

(३), (४) व (५) चौकशी करण्यात येत आहे.

डॉ.रणजित पाटील : या प्रश्नातील उप प्रश्न क्रमांक ३,४ व ५ ला चौकशी करण्यात येत आहे अशा प्रकारचे उत्तर देण्यात आलेले आहे. सदरहू चौकशीचा अहवाल चौकशी अधिकाऱ्याने १६ ऑगस्ट, २०११ रोजी सादर केलेला आहे व त्याच्या अहवालाची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. त्या अहवालात असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, प्राथमिक शाळेची संच मान्यता घेतलेली नव्हती. शिक्षक पालक संघाच्या बैठका घेतल्या जात नाहीत, त्यासंबंधी काटेकोरपणे अंमलबजावणी

३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ प्रथम श्री.शिगम

१२:२०

ता.प्र.क्र.२५२३३

डॉ.रणजित पाटील..

होत नाही. २००१ पासून जी फी वाढ होत आहे, ती नियमबाहय आहे. २०१०-१०११ व २०११-२०१२ या कालावधीत संस्थेचा खर्च झाला आहे, त्या खर्चापेक्षा संस्थेचे उत्पन्न किती तरी जास्त आहे. तरी देखील सातत्याने फी वाढ करण्यात आली. या सगळया गोष्टीवरुन लक्षात येते की, पालकांनी संस्थेच्या बाबतीत तक्रार केलेली होती, त्यात तथ्य आहे. सदरहू तक्रारीची पूर्णपणे चौकशी करुन पालकांना न्याय मिळेल काय ?

प्रा.फौजिया खान : पहिल्यांदा असे स्पष्ट करण्याची गरज आहे की, उप संचालकांनी जे पत्र लिहिले आहे, त्यात त्यांनी तीन प्रकारची कार्यवाही करण्याबाबत कळविलेले आहे. फी वाढीच्या बाबतीत तक्रार आहे, त्यासंदर्भात २००९ या वर्षी जी फी होती, ती फी तशीच ठेवावी असे उप संचालकांनी आदेश दिले. संस्थेने जास्त फी आकारली असेल तर ती पालकांना परत देण्यात यावी अशा प्रकारचा आदेशही उप संचालकांनी दिला आहे. तसेच त्यांनी या प्रकरणी दुसरी चौकशी समिती नेमली आहे, त्या समितीमध्ये १० सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. या संस्थेबाबत गेल्या दहा वर्षाचा अभ्यास करण्यात यावा याबाबत त्या चौकशी समितीला आदेशित केले गेले आहे. त्याप्रमाणे चौकशी समिती चौकशीचे काम करीत आहे. मला या ठिकाणी उल्लेख करावयाचा आहे की, ही नामांकित शाळा आहे, चांगल्या प्रकारची शाळा आहे..

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ पूर्वी श्री.गिते... 12:25

ता.प्र.क्र.25233......... प्रा.फौजिया खान........

या सस्थेने सन 2010-11 मध्ये 500 रुपये शिक्षण शुल्क व 500 रुपये टर्म फी आकारली. 2011-12 मध्ये त्यात 100 रुपये वाढ करुन 600 रुपये फी आकारण्यात आली. या संस्थेची मराठी माध्यमाची दुसरी एक शाळा आहे. ही फी अवाजवी आहे असे वाटत नाही. त्या शाळेचे जे स्टॅण्डर्ड आहे त्याची माहिती घेतली असता ही फी वाजवी आहे असेच दिसते.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, गोल्डन किड्स विद्यालय ही खरोखरच एक चांगली शैक्षणिक संस्था आहे. या शाळेत 4000 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे काही त्रुटी असतील, तक्रारी असू शकतील. परंतु जी फी घेतली जाते ती वाजवी आहे. तेथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू केलेला आहे. सहावा वेतन आयोग अद्याप लागू केलेला नाही. शिक्षकांना बँकेमार्फत वेतन दिले जाते. तेथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोगाप्रमाणे वेतन दिले जाईल काय? शासन संस्थेला तसे आदेश देईल काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, एका बाजूला आकारली जाणारी फी जास्त आहे असे सांगण्यात येते आणि दुसऱ्या बाजूला सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन मिळावे अशीही मागणी केली जाते. याच कारणामुळे उपसंचालकांनी जी ऑर्डर दिली त्या विरुध्द शिक्षण संस्थेने कोर्टात धाव घेतली आहे. हा विषय न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, उपसंचालक, अमरावती यांनी चौकशीचे आदेश दिनांक 10 जून, 2011 रोजी दिले आहेत हे खरे आहे काय? या प्रश्नाला शासनाने "होय" असे उत्तर दिले आहे. असल्यास, उक्त आदेशानुसार चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत? या प्रश्नाला "चौकशी करण्यात येत आहे" असे उत्तर दिले आहे. माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील हे त्याच विभागातील आहेत. असे असताना शासनाकडून मोघम उत्तर दिले जात आहे. चौकशी पूर्ण झाली की नाही याची आता चौकशी करावयाची काय? सन्माननीय सदस्यांनी या उत्तराच्या माध्यमातून कोणता बोध घ्यायचा?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आदरणीय विरोधी पक्षनेत्यांनी मी यापूर्वी जे स्पष्टीकरण दिले ते ऐकले नसावे. मी असे सांगितले होते की, चौकशी दोन प्रकारची आहे. उप संचालकांनी पहिली प्राथमिक स्वरुपाची चौकशी फक्त फी वाढीच्या संदर्भात केलेली आहे. दुसरी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25233......... प्रा.फौजिया खान........

चौकशी करण्यासाठी एक चौकशी समिती गठीत केली आहे. ती चौकशी समिती दहा वर्षाच्या कार्यकाळाबाबतचा अभ्यास करणार आहे. त्या चौकशी समितीचा अहवाल येणे अद्याप बाकी आहे.

श्री.विनोद तावडे : चौकशी कधी केली आणि अहवाल कधी येणार हे सभागृहाला सांगितले पाहिजे. माननीय सदस्य हे त्याच भागातील आहेत. त्यांचा स्वत:चा अनुभव आहे की, 500 रुपये टर्म फी घेतली जाते आणि ऑन कॅपिटेशन मनी घेतात. या शाळेकडे प्रचंड निधी शिल्लक आहे. हे वास्तव असताना माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्याप्रमाणे ही चौकशी केव्हा सुरु झाली आणि केव्हा पूर्ण होणार व कोणती कारवाई केली जाणार आहे?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, उपसंचालकांनी जे पत्र दिनांक 4.3.2012 रोजी दिले त्यामध्ये 2-3 मुद्यांचा उल्लेख केलेला आहे. दिनांक 4.3.2012 रोजी आदेश देण्यात आले आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, प्रश्न विचारल्यानंतर आदेश दिले आहेत. मंत्री महोदय अधिकाऱ्यांना का पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत?

प्रा.फौजिया खान : अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. चौकशी सुरु आहे. माननीय सदस्यांनी सभागृहात सांगितले आहे की, ही संस्था चांगली आहे, बँकेमार्फत शिक्षकांना वेतन देत आहेत. शाळेचे स्टॅण्डर्ड चांगले आहे, विद्यार्थी चांगले आहेत. हे देखील लक्षात घेणे आवश्यक आहे.

-------

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भुसावळ (जि.जळगाव) तालुक्यातील अनुसूचित जाती/जमाती तसेच दारिद्रय रेषेखालील पात्र विद्यार्थ्यांचे गणवेश कापड ठेकेदारांकडून वेळेवर मिळत नसल्याबाबत**

**(6) * 26379 प्रा.दिलीपराव सोनवणे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.विक्रम काळे** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) भुसावळ (जि.जळगाव) तालुक्यातील अनुसूचित जाती/जमाती तसेच दारिद्रय रेषेखालील पात्र विद्यार्थ्यांचे गणवेश कापड मागणी करुनही आता तब्बल 8 महिन्यानंतर ठेकेदाराकडून पोहच झाले असून ते साधन केंद्रात पडून आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, झालेल्या विलंबास जबाबदार असलेल्या ठेकदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडून कापडाचा पुरवठा विलंबाने झाला हे खरे आहे. तथापि, सदर कापडाचा पुरवठा शाळा स्तरावर करण्यात आला आहे.

(2) महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडून कापड पुरवठा उशिराने केल्याबाबत रू.1,26,094/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा.दिलीपराव सोनवणे : महोदय, भुसावळ (जि.जळगाव) तालुक्यातील अनुसूचित जाती/जमाती तसेच दारिद्रय रेषेखालील पात्र विद्यार्थ्यांचे गणवेश कापड मागणी करुनही आता तब्बल 8 महिन्यानंतर ठेकेदाराकडून पोहच झाले असून ते साधन केंद्रात पडून आहे, हे खरे आहे काय या प्रश्नाला मंत्री महोदयांनी "अंशत: खरे आहे" असे उत्तर दिले आहे. या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, शासनाच्या योजनेतून मिळणारे गणवेश शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येईल काय, तसेच ज्या अधिकाऱ्यांमुळे हा विलंब झाला आहे त्यांच्याविरुध्द शासन कारवाई करणार काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, सर्व शिक्षा अभियान ही केंद्र शासनाची योजना असून त्या माध्यमातून सन 2010-11 च्या अखेरीस त्यासाठी मान्यता मिळाली होती, तेव्हा हे गणवेश वाटपाचा निर्णय आपण घेतला होता. त्यानंतर गणवेशांमध्ये एकरुपता असावी म्हणून यंत्रमाग महामंडळाकडून कापड घेण्याचे ठरले व ते स्थानिक पातळीवर शिवून घेण्याचे ठरविण्यात आले. या प्रक्रियेत विलंब झाला ही गोष्ट खरी असून त्यासाठी आपण यंत्रमाग महामंडळावर दंड आकारलेला आहे. यापुढील काळात यासंदर्भात स्ट्रीमलाईन कसे करता येईल याची दक्षता घेण्यात येईल.

-----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे तुरची (ता.तासगाव, जि.सांगली) या गावाचा पाणीपुरवठा योजनेबाबत**

**(7) * 25048 श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील, श्री.रामनाथ मोते, श्री.नागो पुंडलिक गाणार, डॉ.रणजित पाटील** : सन्माननीय **पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे तुरची (ता.तासगाव, जि.सांगली) या गावाच्या पाणीपुरवठा योजनेखाली भारत निर्माण मधून सुमारे पावणे दोन कोटीचा निधी मंजूर होऊन सहा महिने झाले आहेत, हे खरे आहे काय.

(2) असल्यास, सदर योजनेच्या कामास अद्यापही सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(3) तसेच जिल्हापरिषदेचे प्रशासकीय अधिकारी नस्ती गहाळ झाल्याचे सांगून वारंवार कामात अडथळा निर्माण करीत असल्याचे माहे जानेवारी, 2012 च्या पहिल्या आठवड्यात निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, सदर योजना त्वरित पूर्ण करण्याबाबत तसेच कामात अडथळा निर्माण करणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही. कामास सुरुवात झाली आहे.

(3) हे खरे नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. भगवान साळुंखे : महोदय, ही योजना डिसेंबर मध्ये मंजूर झाली, त्यानंतर मात्र ही फाईल बरेच दिवस गहाळ झाली म्हणून नकारात्मक उत्तर दिलेले आहे असे वाटते. या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, या कामाची सुरुवात कधी झाली, कामाला विलंब होण्याची कारणे काय आहेत आणि हे काम केव्हा पूर्ण होणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, या कामाला प्रशासकीय मान्यता दि. 21.12.2011 रोजी मिळाली. प्रत्यक्षात निधी मात्र फेब्रुवारी, 2012 मध्ये रिलीज झाला असून 2013 पर्यंत हे काम पूर्ण होणार आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये एअर होस्टेस/फ्लाईट स्टुअर्ड हे व्यवसाय अभ्यासक्रम समाविष्ट करण्याबाबत.**

**(8) * 25339 श्री.संजय केळकर, श्री.विनोद तावडे, श्री.रामनाथ मोते** : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) एअर होस्टेस/फ्लाईट स्टुअर्ड हे व्यवसाय अभ्यासक्रम एन.सी.व्हि.टी. मान्यताप्राप्त नसल्याने मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी पत्र दि.08/12/2011 नुसार लोकप्रतिनीधींना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्य शासनाने आदिवासी मुलींना एअर होस्टेस (हवाई सुंदरी) बाबत प्रशिक्षण देण्यासाठी गत 3 वर्षात सुमारे 2 कोटी रुपये खर्ची घेतले आहेत, हे खरे आहे काय,

(3) असल्यास,एअर होस्टेस/फ्लाईट स्टुअर्ड हया अभ्यास क्रमांना मान्यता नसताना आदिवासी मुलींना शिक्षण द्यावयाचे असे भासवून अनावश्यक खर्च केला त्याची जबाबदारी निश्चित करुन तो खर्च शासन वसूल करणार आहे काय,

(4) असल्यास, किती कालावधीत खर्च वसूल करण्यात येणार आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव पाचपुते** : (1) हे खरे आहे.

(2) राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत दिनांक 7/12/2007 च्या शासन निर्णयान्वये आदिवासी मुलींना हवाई सुंदरी प्रशिक्षण देण्याची योजना सुरू करण्यात आली होती. परंतु ती अद्याप पर्यंत राबविण्यात आलेली नाही. सदर योजनेमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही आदिवासी विकास विभागामार्फत सुरू आहे.

दरम्यान आदिवासी विकास विभागाकडून केंद्र शासनाच्या निधीतून केंब्रीज विद्यापीठाची मान्यता असलेल्या संस्थामार्फत सन 2006-07 व 2007-08 मध्ये अनुक्रमे 100 व 481 प्रशिक्षणार्थ्यांना संबंधित अप्पर आयुक्त, आदिवासी यांच्यामार्फत प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

----------

श्री. संजय केळकर : महोदय, हा प्रश्न मागील अर्थसंकल्पिय अधिवेशनात सुध्दा विचारला होता. हे खरे आहे की, तीन वर्षात शासनाने दोन कोटीचा खर्च केला आहे. तसेच या योजनेतून 100 आणि 481 मुले व मुलींनी प्रशिक्षण पूर्ण केले असे शासनाने सांगितले आहे. या निमित्ताने मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, या योजनेसाठी सन 2007-08 मध्ये केंद्र शासनाचाही पैसा वापरलेला आहे, तसेच या मुलांनी केंब्रीजचा कोर्स सुध्दा केलेला आहे. या अनुषंगाने माझा प्रश्न असा आहे की, ज्या मुले व मुलींनी हे प्रशिक्षण पूर्ण केले त्यांना आतापर्यंत किती विमान कंपन्यांमध्ये नोकरी मिळाली, किती मुले व मुली नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत आणि शासन या मुलांना नोकऱ्या मिळाव्यात म्हणून कोणते प्रयत्न करीत आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 25339** ......

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आदिवासींच्या मुला-मुलींना वेगवेगळया सर्व्हीसमध्ये संधी मिळावी यासाठी विशेषत एअर होस्टेस/फ्लाईट स्टुअर्डच्या संदर्भात केंब्रीज विद्यापीठाचे मान्यताप्राप्त कोर्सेस आपण सुरु केलेले आहेत. यासंदर्भात ज्या संस्थेला हे काम दिले होते त्यामध्ये 100 मुलींनी प्रशिक्षण पूर्ण केले असून त्यातील 64 मुली वेगवेगळया सर्व्हीसमध्ये नोकरीला लागलेल्या आहेत. या 100 मुलींपैकी 36 मुलींनी आम्हाला सर्व्हीस करावयाची नाही असे कळविलेले असतांना सुध्दा आम्ही त्यांच्याशी संपर्क ठेवलेला आहे. अशाच प्रकारचा कोर्स मॉडीफाय करुन सुरु करण्याच्या संदर्भात खात्याने पूर्ण अभ्यास केला असून यामध्ये हवाई सुंदरीचाच कोर्स नाही तर तत्सम कोर्सेस जोडलेले असून यासंदर्भातील फाईल माननीय मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात गेलेली आहे. यासंदर्भातील नवीन कोर्सेस सुरु केले जातील तेव्हा त्यामध्ये जरुर ती दक्षता घेतली जाईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, केंब्रीज विद्यापीठाची मान्यता असलेल्या संस्थांमार्फत प्रशिक्षण देण्यात आलेले आहे असा उल्लेख उत्तरात करण्यात आलेला आहे परंतु मुंबई विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संस्थांना हे काम का दिले गेले नाही ? एअर होस्टेसच्या वेगवेगळया खाजगी संस्था असून त्यातून हजारो मुला-मुलींना नोकरीची संधी मिळत असेल तर केंब्रीज विद्यापीठाच्या संस्थेतून प्रशिक्षण घेतलेल्या 100 अधिक 481 प्रशिक्षणांर्थीपैकी केवळ 64 विद्यार्थ्यांनाच नोक-या मिळालेल्या आहेत. एअर होस्टेस/फ्लाईट स्टुअर्डच्या नोकरींसाठी खाजगी संस्थामध्ये 5-10 लाख रुपये फी आकारुन प्रशिक्षण दिले जाते याबाबत या सदनात पूर्वी चर्चाही झालेली आहे. आदिवासींच्या मुला-मुलींसाठी स्पेशल कोटा ठेवून अशा प्रकारचे प्रशिक्षण दिले जात असेल व 481 पैकी केवळ 64 विद्यार्थ्यांनाच नोकरी लागत असेल तर या समाजाची कोठे तरी फसवणूक केली जात आहे असे मला वाटते त्यामुळे यासंदर्भात आपण काय उपाययोजना केली जाणार आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा या विषयाच्या संदर्भातील चांगला अभ्यास असून ते या क्षेत्रात काम करीत असतात. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, ज्या 100 प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे त्यातील 64 प्रशिक्षणार्थींना नोकरी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते... **ता.प्र.क्र. : 25339** ......

मिळालेली असून यातील 33 प्रशिक्षणार्थींनी आम्हाला नोकरी करावयाची नाही असे कळविले आहे. 481 प्रशिक्षणार्थींचा कोर्स आताच संपला असून अर्ज वगैरे करण्यासाठी वेळ लागण्याची शक्यता आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, यासंदर्भात केंद्र शासनाच्या निधीमधून आदिवासी मुलींसाठी प्रशिक्षण दिले जात आहे. परंतु राज्य शासनाच्या निधीमधून प्रशिक्षण दिले जात नाही. एअर होस्टेस/फ्लाईट स्टुअर्डच्या संदर्भातील अभ्यासक्रम अभ्यास क्रमाच्या पुस्तकात दिला जाणार आहे काय ? एअर होस्टेसच्या संदर्भात ज्या जाहिराती दिल्या जातात त्यामध्ये एकही आदिवासी मुलगी नसते. त्यामध्ये केवळ सुंदर मुलींचे फोटो असतात. या जाहिरातीमध्ये आदिवासींच्या मुलींचे फोटो दिले तर आपणही त्या ठिकाणी गेले पाहिजे असे त्यांना वाटेल त्यामुळे एअर होस्टेसच्या जाहिरामध्ये आदिवासीं मुलींचे फोटो दिले जातील काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाला "होय" असे उत्तर असून दुस-या प्रश्नाच्या संदर्भात, अभ्यास करुन निर्णय घेतला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी मूळ प्रश्न विचारला असून राज्यातील आयटीआयमध्ये एअर होस्टेस/फ्लाईट स्टुअर्डचे अभ्यासक्रम सुरु झाले पाहिजेत असा त्यांनी उपप्रश्न विचारलेला आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी बजेटमधील अधिकचा पैसा विमान सेवेसाठी खर्च केला जाईल असे सांगितलेले आहे. यामुळे विमान सेवा चांगल्या प्रकारे सुरु होऊ शकतीलही. एअर होस्टेस/फ्लाईट स्टुअर्डचे प्रशिक्षण खाजगी संस्थांमधून दिले जात असून या संस्था वारेमाप पैसे घेत असतात असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. पावसकर यांनी विचारला आहे. त्यामुळे यासंदर्भात शासनाने चांगला अभ्यास करुन अधिकृत कोर्सेस आयटीआय मार्फत सुरु केले तर ते उपयोगी ठरु शकतील व त्याचा फायदा ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थी-विद्यार्थिनींना नोकरी मिळण्याच्या संदर्भात होईल. म्हणून तसा अभ्यासक्रम सुरु केला जाणार आहे काय ?

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, प्रशिक्षण पूर्ण केलेल्या 100 प्रशिक्षणार्थींपैकी केवळ 64 प्रशिक्षणार्थींना नोकरीला लावले त्यातील किंग फिशर विमान कंपनीत किती प्रशिक्षणार्थी सेवेत

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : **25339** ......

श्री. विनोद तावडे...

होते? ही विमान कंपनी बंद पडल्यामुळे या प्रशिक्षणार्थींच्या नोक-या गेल्या असतील त्यांच्या संदर्भात शासन काय करणार आहे ?

यानंतर श्री. भारवि...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25339...

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाला उत्तर आहे सजेशन फॉर ॲक्शन. दुसऱ्या प्रश्ना संबंधी असे उत्तर आहे की, किंगफिशर कंपनीमध्ये एकही आदिवासी मुलगी नव्हती. त्यामुळे तिला काढून टाकण्याचा प्रश्नच येत नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, 64 मुली नोकरीला लागल्या आहेत असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. उर्वरित मुलींना नोकरी न लागल्यामुळे त्यांनी आपल्याकडे किंवा संबंधित संस्थेकडे संपर्क साधला आहे काय ? असा माझा पहिला प्रश्न आहे. लेखी उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, "राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत दिनांक 7.12.2007 च्या शासन निर्णयान्वये आदिवासी मुलींना हवाई सुंदरीचे प्रशिक्षण देण्याची योजना सुरू करण्यात आली होती. परंतु, ती अद्याप पर्यंत राबविण्यात आलेली नाही. सदर योजनेमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही आदिवासी विकास विभागामार्फत सुरू आहे." सदर सुधारणा शासन कधी पर्यंत करणार आहे व त्या सुधारणेमध्ये नवीन काय आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे. 36 मुलींनी नोकरी करणार नसल्याचे कळविले आहे. आम्ही त्यांच्याशी संपर्क ठेवून आहोत. ज्यांना गरज आहे त्यांना मार्गदर्शन करीत आहोत. नवीन कोर्स करताना आम्ही सर्व बाबींची माहिती घेतली आहे. हवाई सुंदरीच नव्हे तर केबीन क्रूक, स्वागतिका, यासह अनेक पदांसाठी चांगल्या नोकऱ्या आहेत. आदिवासी मुलींमध्ये विश्वास निर्माण करणे, आत्मविश्वास जागृत करणे यासंबंधातील एक अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून त्या संबंधातील फाईल माननीय मुख्यमंत्र्यांकडे पोहोचली आहे. या शिवाय अन्य काही मागण्या असतील तर त्या सन्माननीय सदस्यांनी दिल्या तर किंवा सूचना दिल्या तर आम्ही त्याचा विचार करू.

......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील ऊस तोड कामगारांच्या मुलांकरिता हंगामी निवासी वसतीगृहासाठी 131.49 रुपयांचा प्रस्ताव**

**(9) * 25188 श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.केशवराव मानकर** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील ऊस तोड कामगारांच्या स्थलांतरीत झालेल्या मुलांच्या हंगामी निवासी वसतिगृहांसाठी सन 2011-12 या वर्षाकरता 131.49 लाख रुपयांचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेकडे जिल्हा परिषदेच्या सर्व शिक्षा अभियानाने पाठविला असताना अद्यापपर्यंत मंजुरी दिली नसल्याची बाब माहे जानेवारी, 2012 च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर रक्कम मंजूर न झाल्याने या अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यानुसार सदर रक्कम शासन केव्हापर्यंत देणार आहे,

(3) अद्यापपर्यंत न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) व (2) सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत सन 2011-12 च्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकात राज्यातील 12 जिल्ह्यांसाठी हंगामी निवासी वसतीगृह या उपक्रमासाठी रू. 2,946.50 लाख इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली होती. सदर प्रस्तावास केंद्र शासनाच्या प्रकल्प मान्यता मंडळाची मंजुरी प्राप्त झाली आहे. तथापि, अमरावती जिल्हा परिषदेमार्फत तरतूद नसल्याने डिसेंबर, 2011 मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे निधी उपलब्ध करण्यासाठीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास वसतिगृह सुरू न केल्यामुळे मान्यता देण्यात आली नव्हती. याप्रकरणी संबधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यासाठी शासनाने चौकशीचे आदेश दिलेले आहेत. दरम्यान मार्च, 2012 मध्ये धारणी आणि चिखलदरा तालुक्यामध्ये तरतूद उपलब्ध करून हंगामी निवासी वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, ऊस तोड कामगारांच्या मुलांची अवस्था काय होत असेल ? ऊस तोड कामगारांच्या मुलांच्या वसतिगृहाचा हा प्रश्न आहे. यासाठी शासनाचे बजेट आहे. मुले शिकायला तयार आहेत. त्यामुळे मी फक्त दोनच प्रश्न विचारणार आहे. ज्या अधिकाऱ्याने दिरंगाई केली आहे, त्याच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? तसेच, त्यांना चौकशी संबंधात कोणते आदेश दिले होते. ज्या अधिकाऱ्याने कामचुकारपणा केला आहे, त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25188 ....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा प्रश्न वेगवेगळ्या माध्यमातून चौथ्यांदा सभागृहा पुढे येत आहे. 260 अन्वये आलेल्या प्रस्तावाला देखील माननीय मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. सभागृहात वारंवार तोच प्रश्न येत आहे. त्यामुळे त्याचे उत्तर आपण बदलू शकत नाही. ज्या जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी वेळेवर प्रस्ताव पाठविलेला नाही, त्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची कारवाई सुरू केली आहे. त्यानंतर त्यांच्यावर पुढील कारवाई करण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी बीड जिल्ह्या पुरतेच बोलणार आहे. बीड जिल्ह्यामध्ये जवळपास 300 ते 325 वसतिगृहे आहेत. त्यात एकूण 30 ते 40 हजार मुले आहेत. त्यापैकी 16 हजार मुलेच तेथे आहेत. बाकीच्या मुलांना त्यांच्या आईवडिलांनी पाठविले नाही. त्यामुळे 16 हजारा पर्यंत आकडा आलेला आहे. या वसतिगृहांची अतिशय दूरवस्था झाली आहे. त्यामुळे आईवडिलांनी मुलांना तेथे पाठविले नाही. ही क्लेशदायक घटना आहे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे... ता.प्र.क्र. 25188....

सभापती महोदय, शाळेच्या एका खोलीचा कोंडवाडा करुन त्यामध्ये 20-20 मुलांचा ग्रुप करुन त्यांना ठेवण्यात येते. त्यांना गावामध्ये अन्य एखाद्या खोलीची व्यवस्था करुन त्या ठिकाणी ठेवले जात नाही. इतकी वाईट अवस्था असल्यामुळे अन्य पालकांनी आपल्या मुलांना त्या शाळेमधून काढून घेतले आहे. माझा प्रश्न असा आहे की, पुढील वर्षीपासून हंगामी स्वरुपामध्ये वसतिगृहाची सोय करणार काय. दुसरा प्रश्न असा की, बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी वसतिगृहाची एक कायम स्वरुपी योजना तयार करुन पाठविली होती ती योजना आपण कार्यान्वित करणार काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मघाशी सांगितल्याप्रमाणे या अधिवेशनामध्ये या विषयावर चार वेळा चर्चा करण्यात आली आहे. त्या वेळी माननीय मंत्र्यांनी या प्रश्नाचे उत्तर दिले आहे.

**उप सभापती** : प्रश्नोत्तरांचा तास संपलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काही वेळेला प्रश्नोत्तराच्या तासाचा अवधी संपल्यानंतर सुध्दा चार ते पाच मिनिटे त्या प्रश्नावर चर्चा पुढे सुरु असते. असे असतांना एका गंभीर विषयावर चर्चा सुरु असतांना आपण एक-दोन मिनिटे वाढवून दिली पाहिजेत.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. विनायकराव मेटे यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, या प्रश्नावर या सभागृहामध्ये चार वेळा चर्चा झालेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, उस तोड कामगारांच्या मुलांचा प्रश्न आहे. एक तर आपण उस शाळा सुरु करा किंवा आश्रमशाळा सुरु करा. बीड जिल्ह्यातील ऊस तोड कामगारांच्या जिव्हाळयाचा विषय आहे. असे असतांना या ठिकाणी चिखलदऱ्याचा संबंध कुठे येतो? त्या भागामध्ये साखर कारखाना आहे काय?

(गोंधळ)

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराला माझी हरकत आहे. त्यांनी सांगितले की, या प्रश्नावर अनेक वेळा चर्चा झाली आहे. माझा प्रश्न असा आहे की, आपण हा प्रश्न सोडवीत नसल्यामुळे वारंवार चर्चा करावी लागत आहे. जोपर्यन्त हा प्रश्न सोडविला जात नाही तोपर्यन्त आम्ही दररोज हा प्रश्न उपस्थित करु. आम्हाला संविधानात्मक जे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे.... ता.प्र.क्र. 25188....

अधिकार दिले गेले आहेत त्याचा वापर करुन आम्ही हे प्रश्न उपस्थित करु. त्या भागातील ऊस तोड कामगारांच्या मुलांची अवस्था कशी आहे हे आपल्याला माहीत नाही काय? पिढयान् पिढया ही मुले आपल्या आई-वडिलांबरोबर ऊस तोडायला जातात, त्यांनी शिक्षण घेऊ नये असे सरकारला वाटते काय? या बाबतीत मंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे.

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ऊस तोड कामगारांवर हे शासन वेळोवेळी अन्याय करीत आहे. सर्व शिक्षा अभियानामधून आपल्याला आश्रमशाळा बांधता येत नाहीत काय?

(विरोधी पक्षातील सर्व माननीय सदस्य उभे राहून घोषणा देतात.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ऊस तोड कामगारांवर वेळोवेळी अन्याय करणाऱ्या सरकारचा निषेध करुन आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाकडील सर्व माननीय सदस्य सभात्याग करतात.)

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मला सभागृहामध्ये स्पष्टीकरण करुन सांगावयाचे आहे की, आदरणीय श्री. विनायकराव मेटे साहेबांनी प्रश्न विचारला म्हणून मी उत्तर दिले की, एकाच अधिवेशनामध्ये वारंवार एकच प्रश्न विचारला जात असून त्या बाबत मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिले आहे. त्यांनी दिलेले उत्तर मी देत आहे.

**उप सभापती** : प्रश्नोत्तरांचा तास संपलेला आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचने संबंधी

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेला आहे. त्या संदर्भात त्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विरोधी पक्षनेत्यांतर्फे देण्यात आलेली नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना अगोदर घेतली पाहिजे.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी प्रथम सूचना दिली असल्यामुळे त्यांची सूचना प्रथम घेतली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाचे एकूण 14 सदस्य आहेत. देशातील सहा राज्यांमध्ये अशाप्रकारची स्थिती आहे. हे मतदारसंघ भारतीय संविधानाने निर्माण केलेल्या घटनेनुसार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानानुसार भारतीय जनतेला प्रदान करण्यात आले आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील . . . .

हा मतदार संघच रद्द करण्याची श्री.विरप्पा मोईली यांची शिफारस होती. त्या शिफारशीला राज्य शासनाने मान्यता दिल्याचे वर्तमानपत्रामध्ये जाहीर झालेले आहे. नाशिकमध्येही अन्य एका ज्येष्ठ नेत्यांनी याबाबत घोषणा केल्याचे आम्ही वाचले आहे.मुंबईमध्ये दोन्ही सभागृहांचे अधिवेशन सुरु असताना, सदनामध्ये कामकाज सुरु असताना जर राज्य शासनाने सभागृहाला विश्वासात न घेता एवढा महत्वाचा निर्णय घेतला असेल तर या सभागृहाला हक्क पोहोचतो की, याबाबत शासनाने नेमका काय निर्णय घेतलेला आहे ते आम्हाला कळले पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना संविधानाच्या सभेमध्ये असा प्रश्न विचारला होता की, तुम्ही शिक्षक आणि पदवीधरांनाच का मतदार संघ देत आहात, इतर कोणाला का देत नाही ? त्याबाबत विस्तृत चर्चा झालेली आहे, डिबेट झालेले आहे आणि त्याबाबत मी येथे सांगत नाही. पण आता माझ्याकडे या दोन्ही डिबेटचे ग्रंथ आहेत. या डिबेटमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री.पंजाबराव देशमुख, श्री.नागप्पा आणि श्री.रंगा यांनी या मतदार संघाची कशी गरज आहे हे सांगितले आहे. त्यांनी असा शब्द वापरला आहे की, "रफ ॲण्ड टंबल ॲक्टीव्ह पॉलिटीक्स" यामध्ये जे निवडून येऊ शकत नाही पण लोअर हाऊसला सल्ला देऊ शकतील अशा पध्दतीने सेकंड चेंबरमध्ये ज्या माणसांची गरज आहे अशा व्यक्ती कुठून निवडून आणावयाच्या ? तर त्यांनी अशा व्यक्ती निवडून आणण्याची जबाबदारी ही शिक्षक आणि पदवीधर मतदार संघावर सोपविलेली आहे. या दोन्ही वर्गावर त्यांचा प्रचंड विश्वास होता आणि या विश्वासाला पात्र ठरुन या सहाही राज्यामध्ये अनेक सन्माननीय सदस्य निवडून आले आणि त्यांनी या सभागृहामध्ये कॉन्ट्रीब्यूट केलेले आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेले संविधान, त्यात केलेली रचना आणि त्यानुसार जी व्यवस्था करण्यात आलेली आहे, ती मोडण्याचा अधिकार अन्य कोणालाही नाही.परंतु यासंबंधात संसद मूलभूत चौकटीला हात न लावता दुरुस्ती करु शकते.

सभापती महोदय, सरपंचांना अधिकार देण्याच्या संदर्भात ही भूमिका घेतलेली आहे की, हे 14 मतदार संघ रद्द करावयाचे आणि ते ग्राम पंचायतीमधील प्रमुखांना द्यावयाचे. विधान परिषदेच्या रचनेच्या संदर्भातील घटनेतील 171 कलमामध्ये असे म्हटलेले आहे की,"शक्य होईल तितपत जवळजवळ 1/3 सदस्य हे त्या राज्यातील नगरपालिका, जिल्हा मंडळे आणि संसद कायद्याव्दारे निश्चित करील अशी अन्य स्थानिक प्राधिकरणे यांचे सदस्य मिळून बनलेल्या मतदारगणांकडून निवडून दिले जातील.यामध्ये ही तरतूद आहे आणि या सभागृहात एकूण 96 सन्माननीय सदस्यांची

संख्या ठरविण्यात आली असताना आपण फक्त 78 जण आहोत म्हणजे जागा रिक्त आहेत. त्यामुळे अशी कोणती परिस्थिती निर्माण झाली आहे जेणेकरुन मतदार संघ रद्द करण्याची गरज भासत आहे आणि हा प्रश्न केंद्र शासनाचा आहे असे म्हणून आपल्याला टाळता येणार नाही. विधान मंडळाची विधान सभा आणि विधान परिषद ही दोन्ही सभागृहे संविधानाने निर्माण करण्यात आलेली आहेत. त्यामुळे संविधानातील बदलाच्या संदर्भात जर बाहेर काही घडामोडी किंवा प्रयत्न केला जात असेल तर त्या बाबतीत या सदनामध्ये चर्चा झाली पाहिजे.

सभापती महोदय, ज्यावेळी श्री.विरप्पा मोईली कमिटीच्या शिफारशी आल्या तेव्हा मी नागपूर येथील अधिवेशनाच्या वेळी हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय सभापती महोदयांनी सांगितले होते की, ज्यावेळेला आपल्यासमोर हा विषय येईल तेव्हा ही चर्चा घेता येईल. पाहिजे तर आपण रेकॉर्ड काढून पहावे, त्यावेळी माननीय सभापती यांनी रुलींग दिलेले आहे. त्यामुळे जर विधानसभेचे अधिवेशन सुरु असताना बाहेर घोषणा होत असतील आणि जर सभागृहाला विश्वासात घेतले जात नसेल तर तो या सभागृहाचा अवमान आहे, भारतीय संविधानाचा अवमान आहे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या उद्देशाने संविधान निर्माण केले आणि या दोन मतदार संघांवर विशेष विश्वास व्यक्त केला, त्या विश्वासाला तडा देण्याचा अधिकार कोणालाही नाही. सभापती महोदय, मी आज या सदनामध्ये या प्रश्नाच्या संबंधात नियम 289 अन्वये चर्चा करण्यात यावी अशी मागणी केली आहे. मी नियम 93 अन्वये वेगळी सूचना दिलेली असून त्या सूचनेअंतर्गत आपल्याला चर्चा करता येईल.

सभापती महोदय, केंद्र शासनाने घटनात्मक आढावा घेण्यासाठी सन्माननीय श्री.पूर्णो संगमा यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली होती. त्या संगमा कमिटीबद्दल देशामध्ये राळ उठली होती की, तुम्हाला अशा प्रकारे घटना बदलता येणार नाही. आता पुन्हा एकदा तुम्ही त्या अजेंड्यानुसार जात आहात काय ? या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे. म्हणजेच सन्माननीय श्री.संगमा कमिटीने जे काही ठरविले होते, त्यांचा अजेंडा होता की, काही जणांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची घटना मागच्या दाराने उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न सुरु आहे तो आजही सुरु आहे काय असा प्रश्न आहे. म्हणून या सदनामध्ये चर्चा झाली पाहिजे. विरप्पा मोईली कमिटी ही ॲडमिनिस्ट्रेटीव्ह रिफॉर्मसाठी नेमण्यात आली होती,ती घटनात्मक चौकट मोडण्यासाठी नव्हती आणि तो अधिकार नसताना त्यांनी तशा प्रकारची शिफारस करणे, त्याबाबतीत बाहेर काही घोषणा करणे आणि मग मंत्रिमंडळाने ....

परस्पर निर्णय घेणे हे बरोबर होणार नाही. या सभागृहामध्ये 14 शिक्षक प्रतिनिधी उपस्थित आहेत आणि अन्य जे सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत त्यांना विश्वासात घेतले पाहिजे. म्हणून सदनामध्ये आजच या संदर्भात मी नियम 93 अन्वये जी सूचना दिलेली आहे, ती विचारात घेऊन त्यावरील चर्चा सुरु करावी अशी माझी मागणी आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ MMP/ पूर्वी श्रीमती रणदिवे... 12:55

**उप सभापती** : या संदर्भातील निर्णय मी राखून ठेवीत आहे. या संदर्भात माननीय सभापतींशी उद्या चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

यानंतर सन्माननीय विरोधी पक्ष नेते व अन्य सन्माननीय सदस्यांनी "पाणी टंचाई व दुष्काळी परिस्थिती बाबत नियम 289 अन्वये प्रस्तावाचा सूचना दिलेली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यावर आपले विचार मांडावेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र या भागांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्या संदर्भात आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये परतीचा पाऊस झाला नसल्यामुळे पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, शिक्षक मतदार संघ रद्द केले पाहिजेत असे लोक का म्हणतात ? राज्यात टंचाईची परिस्थिती निर्माण झालेली असताना आपण आपली जागा सोडून दुसरीकडे का जात आहात ? मी महत्वाच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधत आहे...

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सभागृहात महत्वाच्या प्रश्नावर चर्चा सुरु असताना सन्माननीय विरोधी पक्ष नेते सुध्दा अनेकवेळा जागा सोडतात. परंतु आम्ही त्यावेळी आक्षेप घेत नाही. सभागृहात महत्वाची चर्चा सुरु असताना मी सभागृह सोडलेले नाही, फक्त सन्माननीय सदस्यांशी बोलण्यासाठी जागा बदलली आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांना अशा प्रकारे आक्षेप घेता येणार नाही. आम्ही सभागृहात माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा सन्मान राखतो. परंतु त्यांना शिक्षक आमदारांबाबत अशा प्रकारचे उद्‌गार काढता येणार नाहीत. या सभागृहात शिक्षक आमदारांनी अनेक चर्चेत भाग घेतलेला आहे. मग ती चर्चा दुष्काळावरील असेल, खैरलांजी प्रकरणावरील असेल, सच्चर अहवालावरील असेल व अन्य चर्चेत देखील भाग घेऊन ठामपणे आपली मते मांडलेली आहेत. तेव्हा माननीय विरोधी पक्ष नेत्यांना अशा प्रकारचे विधान करता येणार नाही, त्यांनी आपले विधान मागे घ्यावे. आम्ही केवळ शिक्षकांच्या प्रश्ना विषयी बोलत नाही. अशा प्रकारे आम्ही अपमान सहन करायचा काय ?...

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील ज्या तऱ्हेने बोलले ते योग्य नाही. त्यांनी केलेले भाष्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे. शिक्षक आमदारांनी शिस्तीने वागले पाहिजे....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम आणि जयंत प्र.पाटील यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांचे म्हणणे मांडावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी रागावण्याचे काही कारण नाही. ते चळवळीतील कार्यकर्ते आहेत. त्यांचा महत्वाचा विषय असू शकेल, परंतु मी देखील टंचाईसारखा महत्वाचा प्रश्न उपस्थित केला होता...सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, मी, आपले म्हणणे ऐकले आहे. (अडथळा)

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 289 प्रस्तावान्वये दुष्काळी प्रश्ना संदर्भात सूचना दिलेली आहे. सभागृहात गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी आपापसातील वाद मिटवावेत. आता माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, राज्यात टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्या संदर्भात आम्ही नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. टंचाईवर मात करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करताना दिसत आहे. परंतु त्यांच्या प्रयत्नाची दिशा अपुरी वाटते्. तेव्हा आपण सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा घ्यावी अशी आपणास विनंती आहे. आम्हाला या विषयावर विधायक चर्चा करायची आहे. या संदर्भात काल परवा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केल्यानंतर काही लोकांनी आमच्याशी संपर्क साधला.

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

आणि सांगितले की, सभागृहाच्या बाहेर काही घोषणा करतात, हा तुमचा हक्कभंग असून या बाबत सभागृहात बोलावे. परंतु आम्ही असे म्हटले की, ज्यावेळी माणसे मरत आहेत, जनावरे मरत आहेत, अशा वेळी आम्ही तो विषय उपस्थित करणार नाही. आम्ही ही बाब पॉझिटिव्हली घेत आहोत. कारण चार-चार दिवस सभागृहाचे कामकाज बंद असेल आणि तत्काळ कार्यवाही करावयाची असेल तर राजकीय नेतृत्वाला तशा पध्दतीचे निर्णय घ्यावे लागतात. त्यामुळे आम्ही हा हक्कभंगाचा विषय करत नाही. कारण ज्या गोष्टी घाईने करावयाच्या असतात त्या केल्याच पाहिजेत. परंतु त्यानंतर आज सभागृहाचे कामकाज होत असेल तर या सभागृहात या विषयाच्या संदर्भात चर्चा व्हावयास पाहिजे. कारण माननीय मुख्यमंत्र्यांचे आणि त्यांच्या सोबतच्या मंत्र्यांचे जे दौरे झाले आणि त्यातून स्थिती समोर आलेली आहे. मग रोजगार हमीच्या योजनेच्या कामांच्या बाबतीत असेल किंवा चाऱ्याच्या बाबतीत असेल त्या बाबतीत स्थिती समोर आलेली आहे.

चाऱ्याच्या बाबतीत आम्ही दुभत्या जनावरांना चारा देणार नाही, आम्ही दारिद्र्य रेषेखालील लोकांना देणार असे सांगण्यात आले आणि त्या लोकांकडे शेळ्या-मेंढ्या आणि बाकीची अशी जनावरे असतात की ज्यांना जास्त चारा लागणार नाही, मग दुभती जनावरे कशी जगवावयाची असे अनेक वेगवेगळे प्रश्न सर्वसामान्य माणूस विचारत आहे. समजा टेंभू धरणाचे काम 1999 मध्ये थांबले असेल तर ते पुढे होऊ शकते किंवा काही ठिकाणी पाणी उपलब्ध आहे आणि काही किलोमीटरची पाईपलाईन टाकली तर त्याचा उपयोग होऊ शकतो, असे अनेक प्रश्न आहेत त्या संदर्भात आम्हाला सरकारला या चर्चेच्या माध्यमातून सूचना करावयाच्या आहेत. या दुष्काळ आणि टंचाईच्या संदर्भामध्ये शासनाने ठोस पावले उचलली तर त्याचा सर्वसामान्य माणसांना उपयोग होणार आहे. त्यामुळे या दुष्काळसदृश्य, टंचाईच्या परिस्थितीच्या संदर्भामध्ये सगळे कामकाज बाजूला ठेऊन तातडीने या विषयावर चर्चा केली तर या ठिकाणी ठोस निर्णय किंवा ठोस कृती ताबडतोबीने चालू होऊ शकते. त्यामुळे मला आपल्यामार्फत आग्रहाची विनंती करावयाची आहे की, ही नियम 289 अन्वये दिलेली प्रस्तावाची सूचना आपण स्वीकारावी आणि आजच या विषयावरची चर्चा सुरु करावी अशी आमची मागणी आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, चार दिवसाच्या सुट्टीनंतर सभागृहाचे कामकाज होत असताना आज अशी परिस्थिती आहे की, माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय मंत्री त्या भागामध्ये भयंकर दुष्काळ पडलेला आहे आणि त्यामुळे सतत दौरे करीत आहेत असे आम्ही दूरचित्रवाहिनीवरुन पाहात आहोत, संपूर्ण महाराष्ट्र पाहात आहे. आम्ही सुध्दा त्या ठिकाणी जाऊन आलो. सगळी परिस्थिती योग्य आहे का, सर्व आलबेल आहे का, या संदर्भात आमची सुध्दा मते आहेत. या महाराष्ट्रामध्ये सर्वांनी दुष्काळी परिस्थितीला तोंड देत असताना प्रत्येकाला जे वाटते ते सांगणे, आपापल्या पक्षाच्या माध्यमातून न सांगता धोरणात्मक सांगणे आणि सरकारचे काही प्रयत्न अपुरे पडत असतील तर त्यांना सहकार्य करणे तसेच सरकारच्या प्रयत्नामध्ये काही त्रुटी असतील तर त्या योग्य पध्दतीने सांगणे याकरिता तातडीने या विषयावर चर्चा झाली पाहिजे.

माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे अनेक बाबतीत आमच्याकडेही चर्चा होती की, काय चालले आहे, तुम्ही काय करीत आहात, विरोधी पक्ष काय करीत आहे, मुख्यमंत्री असे जाहीर करत आहेत, तुम्ही यावर बोला. मी सांगितले की, माणूस मरत असेल, शेतकरी मरत असतील तर सभागृहाची प्रतिष्ठा मोठी नाही. प्रतिष्ठेच्या बाबतीत नंतर पाहू पण आज त्यांना मदत होत असेल ती मदत त्यांना तातडीने केली गेली पाहिजे अशी आमची भावना आहे. पण ती मदत केली जात आहे का हाही आमच्यापुढे प्रश्न आहे. त्या भागामध्ये जाऊन आल्यानंतर आम्ही जे ऐकले ते फार गंभीर आहे. त्यातही प्रशासन त्या बाबतीत काम करीत आहे का ? राज्याचे प्रमुख मंत्री ज्यावेळी दूरदर्शनच्या माध्यमातून लोकांना सांगतात आमचे तलाठी आणि ग्रामसेवक बियरबारमध्ये बसलेले असतात आणि काम करीत नाहीत त्यामुळे सरकारच्या या इच्छाशक्तीला काही मारक असे घडत आहे का याची आम्हाला चिंता वाटते. गंभीर दुष्काळ आहे असे शासनाचे मत असेल, सरकार त्या ठिकाणी पाहणी करण्यासाठी जात असेल आणि सुट्टीच्या दिवशी जाऊन त्या ठिकाणी बैठका घेत असेल तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. आमच्या दृष्टीने तर ही गंभीर बाब आहेच.

माननीय सभापती महोदय हे त्या जिल्ह्यातील आहेत. त्या जिल्ह्यात काय आक्रोश आहे हे माननीय सभापती महोदयांना माहीत आहे. त्यामुळे हा विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा कसा

RDB/ KTG/ MMP/

श्री. दिवाकर रावते .....

होतो हे सुध्दा माननीय सभापती महोदयांनी आम्हाला विचारावयास नको. माननीय सभापती महोदय त्या जिल्ह्यातील असल्यामुळे त्यांनी स्वत:हून जाहीर करावयास पाहिजे की, या बाबतीत ताबडतोब चर्चा झाली पाहिजे. एवढी यामध्ये गंभीरता आहे. या संदर्भात जी चर्चा करावयाची आहे ती आम्ही चर्चेच्या वेळी करुच परंतु ही चर्चा तातडीने म्हणजे तातडीनेच झाली पाहिजे. त्यामुळे वेळ न लावता या चर्चेला आपण सुरुवात करावी. संध्याकाळपर्यंत आणखी चार ठिकाणी जनावरांना चारा देऊ शकलो तर ती ढोरं वाचतील. श्री. शरद पवार साहेबांनी जाहीर केले की, माणसे वाचवा. मग ढोरं मेली तर चालतील का ? त्या बाबतही आम्हाला प्रश्न पडलेला आहे. सत्ताधारी पक्षाकडील काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आम्हाला काय चर्चा करावयाची आहे ते मी सांगत आहे. आम्हाला तो अधिकार आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ पूर्वी श्री.बरवड 13:05

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, श्री.दिवाकर रावते यांना जी गोष्ट माहीत नाही त्या गोष्टीबाबत ते माननीय श्री.शरदराव पवार साहेबांचे नाव घेऊन बोलत आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय श्री.पवार साहेब दूरदर्शनच्या वाहिनीवर स्वत: बोलले आहेत. ते आम्ही पाहिलेले आहे. ज्यावेळी या विषयावर चर्चा सुरु होईल त्यावेळी ते काय बोलले होते त्याबाबत आम्ही जरुर बोलू. ते दूरदर्शनच्या वहिनीवर बोलले आहेत, ते सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांच्या घरात येऊन कानात बोललेले नाहीत. ज्यावेळी एखाद्या मंत्र्यांचे वक्तव्य जगजाहीर होते त्यावेळी त्या वक्तव्यावर आम्हाला बोलण्याचा अधिकार आहे. जेव्हा सरकारकडून वक्तव्य केले जाते तेव्हा त्या वक्तव्यावर आम्हाला बोलण्याचा अधिकार आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, श्री.शरदराव पवार साहेबांनी जाहीर केले की, माणसे वाचवा. मग ढोरं मेली तर चालतील काय ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी असे जे वाक्य त्यांचे नाव घेऊन उच्चारले आहे. ते वाक्य कामकाजातून काढून टाकण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या भावना व्यक्त करीत असताना माननीय श्री.शरद पवार साहेबांचा जो उल्लेख केलेला आहे तो कामकाजातून वगळण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, त्यांचे नाव कशा प्रकारे घ्यावयाचे ते आपणच आम्हाला सुचवावे. मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, त्यांच्या नावाऐवजी केंद्रीय कृषी मंत्री असे म्हटले तर चालेल का ? केंद्रीय कृषी मंत्र्यांनी शेतकऱ्यांची काळजी घेतली पाहिजे, शेतकरी जगला पाहिजे यासाठी त्यांना प्रथम पाणी द्यावे, ढोरांना नंतर पाणी पाजावयाचे सांगितले की नाही हे आम्हाला जाणून घ्यावयाचे आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य पुन्हा माननीय श्री.शरद पवार यांचे नाव घेऊन बोलत आहेत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी केंद्रीय कृषी मंत्र्यांचे नाव घेतलेले नाही.

2...

09-04-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) II-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपण रेकॉर्ड तपासून बघावे.

श्री.दिवाकर रावते : देशामध्ये केंद्रीय कृषी मंत्री एकच आहेत. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, त्यांचे नाव घेऊ नये. त्यामुळे मी त्यांचे नाव घेतलेले नाही.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सभागृहात अशा प्रकारे चर्चा होत असेल तर या विषयाचे गांभीर्य निघून जाईल.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय राज्यमंत्र्यांना या विषयाचे गांभीर्य वाटत असेल तर शासनाने या विषयावर त्वरित चर्चा सुरु करण्याला मान्यता दिली पाहिजे. सरकारला या विषयाचे गांभीर्यच वाटत नाही. दूरदर्शनच्या माध्यमातून मंत्री एकमेकाला शिवी घालत आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांनी आम्हाला गांभीर्याबाबत सांगू नये. राष्ट्रवादी काँग्रेसचे व काँग्रेसचे मंत्री एकमेकांबाबत दूरदर्शनच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात जाहीर पंचनामा करीत आहेत. सभापती महोदय, या विषयावर तातडीने चर्चा व्हावी अशी आमची मागणी आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मंत्री एकमेकाबाबत काय पंचनामा करीत आहेत ते सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

श्री.दिवाकर रावते : काय पंचनामा करीत आहेत ते सांगतो. परंतु प्रथम या विषयावर चर्चा सुरु करावी.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्री एकमेकाबाबत काय बोलत आहेत ते आम्हाला सांगावे असे मंत्री महोदय म्हणाले. चर्चा सुरु झाल्यावर आम्ही सांगतो.

**उप सभापती** : राज्यात निर्माण झालेली पाणी टंचाई व दुष्काळजन्य परिस्थिती हा विषय सभागृहासमोर मांडण्यात आलेला आहे. हा विषय अत्यंत गंभीर आहे. त्याचे गांभीर्य सर्व सन्माननीय सदस्यांनी ओळखावे. या विषयाबाबत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना सारख्याच आहेत. त्यामुळे हा विषय एखाद्या सन्माननीय सदस्याचा नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचा आहे. संपूर्ण सभागृहाचा विषय आहे. त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण शांतपणे आपापली मते मांडावीत.

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एक तर या राज्यामध्ये कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची सत्ता आहे. सभागृहामध्ये चर्चा करीत असताना राज्यातील संबंधित मंत्री महोदयांचे नाव घ्यावयाचे नाही काय, तो आमचा अधिकार नाही काय, या राज्यात एक मंत्री दुसऱ्या मंत्र्यांबाबत वावगे बोलत असतील तर त्याबाबत आम्ही काही बोलावयाचे नाही काय, जे मंत्री आहेत त्यांच्याच बाबतीत मी बोलत आहे. प्रत्येक वेळी आम्ही बोलल्यानंतर राष्ट्रवादी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून हरकत घेतली जाते हे बरोबर नाही. आम्ही बोलावयाचे नाही काय, आम्ही बोलल्यानंतर त्याबाबत चातुर्याने उत्तर देण्याचा सन्माननीय सदस्यांना अधिकार आहे.

यानंतर श्री.शिगम....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ताबडतोब या चर्चेला सुरुवात करावी. सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना एवढ्या तीव्र आहेत की, एकवेळ शेतकरी पाण्यासाठी थांबतील पण ते या चर्चेकरिता थांबायला तयार नाहीत. म्हणून तातडीने या विषयावर चर्चा सुरु करावी.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मला देखील बोलण्याची संधी द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ही टंचाईची परिस्थिती आताच निर्माण झाली आहे असे नाही. पाऊस जाऊन 6 महिने झालेले आहेत. प्रशासनाने काय केलेले आहे ? या टंचाईच्या परिस्थिती बाबत राज्य शासनाने कामाचे कोणते नियोजन केलेले आहे ? कोणती कामे तातडीने हाती घेतलेली आहेत ? हवामानामध्ये होणा-या बदलाविषयी या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. पण त्या चर्चेची दखल कुठेही घेतली गेली नाही. गेले 4 दिवस कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस पडला आणि तेथील आंब्याचे मुख्य पीक नष्ट झाले. हवामान बदलामुळे शेतीवर जे अनिष्ट परिणाम होत आहेत त्याबाबतीत कृषी खात्याने कोणतेही नियोजन केलेले नाही. तेव्हा आजचे सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला सारुन राज्यात निर्माण झालेल्या पाण्याच्या टंचाईच्या प्रश्नावर तातडीने चर्चा घडवून आणून शासनाने राज्यातील जनतेला, विशेषत: शेतक-यांना दिलासा द्यावा यासाठी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, शेतक-यांचा प्रश्न हा केवळ विरोधी पक्षाचाच आहे असे समजण्याचे कारण नाही. या प्रश्नाची प्रशासनाने, शासनाने दखल घेऊन जी कार्यवाही केलेली आहे त्याची माहिती जाणून घेणे हा या सभागृहाचा आणि सदस्य या नात्याने आमचा अधिकार आहे. दुष्काळसदृश्य परिस्थिती असेल, चारा टंचाईची परिस्थिती असेल, या गंभीर प्रश्नासंबंधीची चर्चा या सदनामध्ये अन्य कामकाज बाजूला ठेवून व्हावी असे आमचेच नाही तर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे मत आहे. म्हणून अन्य कामकाज बाजूला ठेवून या प्रश्नावरील चर्चेला सुरुवात करावी अशी माझी विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : या ठिकाणी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची जी सूचना सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे त्या विषयावर उद्या मंगळवार, दिनांक 10 एप्रिल 2012 रोजी प्रश्नोत्तराच्या तासानंतर ताबडतोबीने चर्चा सुरु करण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

मी माझा निर्णय दिलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची जी सूचना दिलेली आहे तिचे गांभीर्य लक्षात घेता या प्रस्तावावरील चर्चा माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह उद्या, मंगळवार, दिनांक 10 एप्रिल 2012 रोजी प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर घेण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

----

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.15 ते 1.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

यानंतर श्री. भोगले।

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, पॉईंट ऑफ प्रोसीजरसंबंधी माझा मुद्दा आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मघाशी आपण सभागृहात जी चर्चा केली......

**उप सभापती** : माननीय सदस्यांनी चर्चा उपस्थित होईल त्यावेळी चर्चेत भाग घेऊन आपले मुद्दे मांडावेत. मघाशी उपस्थित झालेल्या विषयावर आता बोलता येणार नाही. उद्या प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर ताबडतोब नियम 289 अन्वयेच्या सूचनेद्वारे उपस्थित केलेल्या विषयावर चर्चा घेण्यात येईल. त्या चर्चेच्या वेळी माननीय सदस्यांनी आपले मुद्दे मांडावेत अशी माझी विनंती आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आपल्या निर्णयाबद्दल आमची कोणतीही हरकत नाही. परंतु मघाशी सभागृहात चर्चा सुरु असताना बोलण्याची अनुमती मागण्यासाठी आमचा हात वर असूनही आम्हाला बोलण्याची संधी दिली गेली नाही हे बरोबर नाही. मला आपल्या निर्णयाबद्दल आक्षेप घ्यावयाचा नाही.

**उप सभापती** : नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना मांडली जाते त्या संदर्भात सत्ताधारी पक्षाच्या वतीने बोलता येत नाही. परंतु सौजन्य म्हणून मी माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना बोलण्याची परवानगी दिली. खरे म्हणजे सत्ताधारी बाजूकडून बोलण्याचे कोणतेही प्रयोजन नव्हते. प्रस्तावाची सूचना विरोधी पक्षाकडून देण्यात आली होती. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा केल्यानंतर उद्या एकत्रितपणे चर्चा घेण्याचा निर्णय झालेला आहे. या ठिकाणी मघाशी जे उत्तर दिले गेले त्या मागे काहीतरी नियोजन केलेले असते. मी मध्यंतरीच्या काळात माननीय सभापतींशी चर्चा केली. ज्या गोष्टी सभागृहात करणे शक्य नाही त्या गोष्टी कराव्यात असे माननीय सदस्यांनी म्हटले तर ते कसे शक्य होईल? माझी अडचण सभागृहाने समजून घ्यावी.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, त्या सूचनेवर आम्हाला बोलता येणार नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते बोलत असताना त्यांनी काही मुद्दे मांडले. ते मुद्दे सत्ताधारी पक्षाशी संबंधित होते. त्याबद्दल आमचे मत मांडण्याचा आम्हाला अधिकार आहे. परंतु आम्हाला बोलण्याचा अधिकार नाही असे म्हणता येणार नाही. सत्ताधारी पक्षाकडील माननीय सदस्यांना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे.......

बोलण्याचा अधिकार आहे. त्या मुद्यांबाबत आम्हाला आमचे मत मांडायचे होते. दुष्काळाच्या प्रश्नाबाबत माननीय मुख्यमंत्री आणि माननीय सभापती यांनी उद्या चर्चा घेण्याचे निश्चित केले त्या निर्णयाबद्दल आम्ही त्यांचा आदर करतो. परंतु दुष्काळाच्या प्रश्नाबाबत नियम 260 अन्वये दिनांक 3 एप्रिल, 2012 रोजी सभागृहात चर्चा झालेली आहे. असे असताना आज पुन्हा याच विषयावर चर्चा घेण्याची मागणी का केली जात आहे हेच आम्हाला कळून येत नाही. एकाच विषयाची द्विरुक्ती का होत आहे? माननीय विरोधी पक्षाला उशिरा जाग आली याचा दोष आमच्या माथी का मारण्यात येत आहे? दुष्काळाच्या विषयावर चर्चा झालेली असताना पुन्हा त्याच विषयावर चर्चा घेऊन सभागृहाचा वेळ वाया का घालविण्यात येत आहे? हा आमचा आक्षेपार्ह मुद्दा आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्णयाबद्दल माननीय सदस्यांना बोलता येते का?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विरोधी पक्षाला आपण संरक्षण द्यावे.

श्री.विनायक मेटे : माननीय सभापतींच्या निर्णयाचे आम्ही पालन करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विरोधी पक्षाकडून कोणत्या विषयावर प्रस्ताव द्यायचा हे सत्ताधारी पक्षाकडून सुचविले जाणार आहे काय?

श्री.विनायक मेटे : सभागृहात पुन्हा पुन्हा त्याच विषयावर चर्चा करुन सभागृहाचा वेळ वाया घालविणे कितपत योग्य आहे?

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ पूर्वी श्री. भोगले..... 13:35

श्री. दिवाकर रावते : महोदय, आमची शासनाबरोबर चर्चा झाल्यानंतरही शासनाने त्याबाबतीत नादानपणा केला म्हणून पुन्हा दुष्काळावरील चर्चा घ्यावी लागत आहे, यावर सन्माननीय सदस्यांना काय म्हणावयाचे आहे ते त्यांनी सांगावे.

( सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे आपल्या जागेवरुन बोलत असतात )

-------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनांवरील शासकीय कार्यवाहीचे विवरण पत्रांची यादी सभागृहासमोर ठेवणे

श्री. भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "विधानपरिषदेच्या सन 2011 च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक 12 डिसेंबर ते 23 डिसेंबर, 2011 या कालावधीत मा.मंत्री/मा.राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 358 आश्वासनांची यादी तसेच सन 1991 च्या दुसऱ्या अधिवेशनापासून सन 2011 च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनापर्यंतच्या कालावधीत विधानपरिषदेत देण्यात आलेल्या एकूण 422 आश्वासनांवरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी आणि मा.सभापतींच्या दि. 4 एप्रिल, 2012 रोजीच्या निदेशानुसार प्रलंबित आश्वसनांची संख्या विशद करणारे निवेदन" सभागृहासमोर ठेवतो.

वरीलप्रमाणे विधान परिषदेतील आश्वासन पूर्ततेची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्यानंतर सन 2011 च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनापर्यंत विधान परिषदेत देण्यात आलेल्या एकूण 41648 आश्वासनांपैकी 38106 (91 टक्के) इतक्या आश्वासनांची पूर्तता झालेली आहे व 3542 (9टक्के) आश्वासने प्रलंबित आहेत. अशा प्रकारे मी उपरोक्त माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : आश्वासनांवरील शासकीय कार्यवाहीच्या विवरण पत्रांची यादी आणि प्रलंबित आश्वासनांची संख्या विशद करणारे निवेदन सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

**प्रेस** : येथे सोबत दिलेल्या विवरण पत्रांची यादी छापावी.

--------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेंद्र मुळक (पाटबंधारे राज्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 4.4.2012 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या वर्ष 2012-13 चे वार्षिक नियोजन आणि सन 2011-12 मधील वितरीत तरतूद व जानेवारी, 2012 अखेर खर्चाचा जिल्हानिहाय तपशील मधील पृ.क्र. 2 ची सुधारित प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : पृ.क्र. 2 ची सुधारित प्रत सभागृहासमोर ठेवण्यात आली.

**प्रेस** : येथे सोबतची सुधारित माहिती छापावी.

---------

........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनसंबंधी**

श्री. रामदास कदम : महोदय, गेल्या तीन चार दिवसांची वर्तमान पत्रे पाहिली तर हेडिंगलाच बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत की, भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी त्यांच्या अहवालात राज्यातील जवळपास 10 मंत्र्यांवर ताशेरे ओढलेले आहेत. या निमित्ताने मी शासनाच्या एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, प्रत्यक्षात "कॅग" चा अहवाल अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहात मांडला जातो व त्यावर चर्चा होत नाही. हा अहवाल माझ्याकडे असून तो मी आपल्याकडे पाठवित आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

सभापती महोदय, कॅगच्या अहवालात 9-10 मंत्र्यांवर वेगवेगळया भूखंडाच्या माध्यमातून ताशेरे ओढले गेले असल्यामुळे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी संबंधित मंत्र्यांचे राजीनामे घेतले का, कॅगच्या अहवालात ज्या मंत्र्यांवर ठपका ठेवलेला आहे त्या मंत्र्यांचे राजीनामे माननीय राज्यपाल महोदय घेणार आहेत काय ? संबंधित भ्रष्ट मंत्र्यांवर कारवाई केली जाणार आहे काय ? कॅगचा अहवाल या सदनात कधी ठेवला जाणार आहे ? याची माहिती सदनाला मिळण्याची आवश्यकता आहे. मंत्र्यांच्या घोटाळयावर या सभागृहात चर्चा होऊ नये यासाठी अशा प्रकारचे अहवाल अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी चोरी चोरी, चुपके चुपके, गपचूप सभागृहाच्या पटलावर ठेवले जातात. कॅगच्या फुटलेल्या अहवालाची प्रत तसेच सी.डी. मी आपल्याकडे पोहचवण्याची व्यवस्था करतो. ही बाब अतिशय गंभीर असून ही बाब मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, कॅगचा अहवाल या सभागृहाच्या पटलावर कधी ठेवला जाणार असून त्यावर चर्चा कधी घेतली जाणार आहे याची माहिती सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. कॅगच्या अहवालाच्या संदर्भात शासनाची नेमकी भूमिका काय राहणार आहे? हे शासन भ्रष्ट मंत्र्यांना पाठीशी घालून त्यांच्यावर पांघरुण घालण्याचे काम करीत आहे हे या सभागृहात स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत कॅगच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडून माहिती येत नाही तोपर्यंत या सदनाचे कामकाज थांबविले जावे अशी माझी विनंती आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, कॅगच्या संदर्भातील अहवाल दि. 16 एप्रिल, 2012 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उप सभापती** : माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितल्या प्रमाणे दि. 16 एप्रिल, 2012 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगतो.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी मांडलेल्या कॅगच्या मुद्याच्या संदर्भात आमची शासनाकडे अशी मागणी आहे की, कॅगच्या रिपोर्टमध्ये ज्या मोठमोठया भानगडी उघड झालेल्या आहेत त्यावर अधिवेशनाच्या शेवटच्या आठवडयात चर्चा काही होऊ शकणार नाही. जर कॅगच्या अहवालात भ्रष्टाचार नाही असे शासनाला वाटत असेल तर दूध का दूध और पानी का पानी होऊन जाऊ दे. त्यामुळे कॅगचा अहवाल या आठवडयात सभागृहाच्या पटलावर ठेवावा व दुस-या आठवडयात वाटले तर त्यावर चर्चा करु. हा कॅगचा अहवाल बाहेर आहे त्यामुळे हा अहवाल सभागृहाच्या पटलावर उद्या किंवा परवा ठेवण्यात यवा. हे राज्य भ्रष्टाचाराच्या बजबजपुरीमध्ये नाही असे आपल्याला वाटत असेल तर कॅगचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवून त्यावर एकदा काय ती चर्चा होऊ द्या एवढीच आमची मागणी आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, कॅगचा अहवालावर सर्वात प्रथम कॅबिनेटमध्ये चर्चा केली जाते व चर्चा झाल्यानंतर हा अहवाल 16 तारखेला सभागृहाच्या पटलावर ठेवला जाईल.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी कॅगच्या अहवालाचा संदर्भ देऊन तो उशिरा का सादर होतो आहे, मंत्री फार मोठा भ्रष्टचार करीत आहेत कॅगच्या अहवालावर चर्चा करण्याच्या संदर्भात त्यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. कॅग काय हे सन्माननीय सदस्यांनी अगोदर समजून घेण्याची आवश्यकता आहे. कॅगमध्ये जे ऑडीट ऑब्जेक्शन असते त्यामध्ये भ्रष्टाचार आहे काय हे अगोदर समजून घेण्याची आवश्यकता आहे. विधान परिषदेचे सदस्य असल्यामुळे आपल्याला सगळे बोलण्याची सूट आहे असे समजण्याचे कारण नाही. लोकलेखा समितीचा अध्यक्ष हे विरोधी पक्षाचे असतात. सदनासमोर कॅगचा अहवाल सादर झाल्यानंतर हा अहवाल लोकलेखा समितीकडे जातो व त्यावर चर्चा होत असते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ 13:45

श्री.नारायण राणे...

आवश्यकता असेल तर समिती समोर माननीय मंत्री किंवा प्रधान सचिव यांना बोलाविण्यात येते. त्या संबंधात समितीने केलेल्या शिफारशी राज्य सरकारकडे येतात. त्यानंतर राज्य सरकार आपले मत देते. अशी प्रक्रिया आहे. विरोधी पक्षाकडेच हा सर्व अधिकार असताना हे सर्व आरोप ते कशासाठी करीत आहेत ? कॅगचा रिपोर्ट फुटला असा येथे उल्लेख केला आहे. आता पर्यंत जे तोंडसुख घेतले आहे ते रेकॉर्डवर असता कामा नये. अहवाल अजून सादर झालेला नाही. कॅगच्या ऑडिट ऑब्जेक्शनला भ्रष्टाचार म्हणणार काय ? उचलली जीभ लावली टाळ्याला. बोलायला माईक मिळाला म्हणून काहीही बोलायचे काय ? आम्ही आपणाला बोलायला देणार नाही.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे शब्द कामकाजातून काढून टाकले पाहिजे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, आम्ही पण त्यांचे शांतपणे ऐकून घेतले आहे. त्यामुळे त्यांना देखील आमचे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल. मी त्यांना काहीही बोलू देणार नाही. माझ्याकडे यादी आहे. भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेच्या आमदारांना सरकारी जमीन माफक दराने दिलेली आहे. त्याची यादी माझ्याकडे आहे. ती मी वाचून दाखवितो. श्रीमती शारदागिरी चौधरी, गुरूदर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, आमदार, यांना मौजे सावंगी, हिंगणघाट येथील शासनाची 56 हेक्टर जमीन दिली आहे. श्री.एकनाथ खडसे,माननीय विरोधी पक्ष नेते, विधान सभा यांना मुक्ताई नगर येथील जमीन देण्यात आली. श्री.सुधीर देऊळगावकर, श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.देवेंद्र फडणवीस, या सर्व सन्माननीय सदस्यांनी शासकीय जमिनी माफक दरामध्ये घेतलेल्या आहेत. त्यामुळे सरकार मधील काही माननीय मंत्र्यांवर, काही सन्माननीय सदस्यांवर बिनबुडाचे आरोप ऐकून घेतले जाणार नाहीत. विरोधी बाजूकडील काही सन्माननीय सदस्य भ्रष्टाचाराने माखलेले आहेत. त्यांचे उत्पन्न काय आहे हे मला त्यांनी सांगावे. त्यांच्या प्रॉपर्टीची माहिती माझ्याकडे आहे. त्यामुळे त्यांनी आरोप करू नये. कॅगचा रिपोर्ट सादर होईल. हवे असेल तर आम्ही चर्चेला समोरे जाण्यास तयार आहोत. ह्या सर्वांनी शासकीय जमीन माफक दरामध्येच घेतली आहे ना. मग त्यांनी भ्रष्टाचार केला असे आम्ही म्हणायचे काय ? उचलली जीभ लावली टाळ्याला. असे आम्ही चालू देणार नाही. त्यांची सत्ता असताना सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे पेट्रोल पंपावर जाऊन बसायचे.

......(गोंधळ)......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : या संबंधात माझ्याकडे असलेला निर्णय मी वाचून दाखवितो. माझी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी जागेवर जाऊन बसावे.

श्री.दिवाकर रावते (वेल मध्ये उभे राहून) : सभापती महोदय, आपण सर्वांची मुस्कटदाबी करता.

एक सन्माननीय सदस्य : हा माननीय सभापतींचा अपमान आहे.

**उप सभापती** : मी कोणाचीही मुस्कटदाबी करत नाही. सन्माननीय सदस्यांनी जागेवर जाऊन बसावे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

(विरोधी पक्षाकडील सर्व माननीय सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

**उप सभापती** : माननीय सदस्यांनी प्रथम कृपया आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

(गोंधळ)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, कॅगच्या अहवालावर चर्चा होऊ द्या.

(गोंधळ)

**उप सभापती** : आपण कृपया जागेवर जाऊन बसावे..

श्री.दिवाकर रावते : आपण आम्हाला जागेवर बसवून त्यांची उसनी बाजू घेता काय?

**उप सभापती** : मी कुणाचीही उसनी बाजू घेतलेली नाही. आपण सभागृहामध्ये चर्चेची मागणी केल्यानंतर माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, कॅगचा अहवाल 16 एप्रिलला सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल, त्यानंतर या अहवालावर चर्चा होईल.

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण मंत्री महोदयांचे वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे.

(गोंधळ)

**उप सभापती** :आपण कृपया जागेवर बसावे. मी सभागृहाचे कामकाज 2.15 वाजेपर्यन्त स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.51 ते 2.15 वाजेपर्यंत स्थगित झाली)

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

**सभापतीस्थानी - माननीय उप सभापती**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण आता चर्चा सुरु करीत आहोत काय ?

**उप सभापती** : आपण कोणत्या चर्चेबाबत बोलत आहात ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण कॅगच्या अहवालाच्या संबंधातील चर्चा सुरु करीत आहात काय ? त्यासाठी आमची तयारी आहे.

**उप सभापती** : आपले असे ठरले आहे की, कॅगच्या संदर्भातील चर्चा सोमवारी ....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता आम्हाला यासंदर्भातील चर्चा सुरु करु द्यावी. आमची तयारी आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे.

**उप सभापती** : मी सांगू इच्छितो की, सभागृह हे नियमानुसार चालते.सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हालाच नियम आहेत काय?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. पहिली गोष्ट म्हणजे मघाशी जेव्हा आपण कॅगचा विषय उपस्थित केला तेव्हा माननीय वित्त राज्य मंत्र्यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या वतीने हा अहवाल दिनांक 16 एप्रिल रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. त्यावेळी ही चर्चा बंद झाली होती. नंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेबांनी पुन्हा ही चर्चा सुरु केली. त्यानंतर आरोप-प्रत्यारोप हे होत रहाणार.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी कोणाचेही नाव घेतलेले नाही.

**उप सभापती** : खरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम बोलत असताना मी व्यत्यय आणला नव्हता.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी कोणाचेही नाव घेतलेले नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. आपण जेव्हा कॅगच्या संदर्भात बोलावयास सुरुवात केली तेव्हा आपण प्रत्येक वेळी एकच शब्द म्हणत होतात की,"भ्रष्ट मंत्री, भ्रष्ट मंत्री" आणि खरे म्हणजे मी ते त्याच वेळी कामकाजातून काढावयास पाहिजे होते. परंतु सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य पूर्ण होऊ द्यावे म्हणून मी जरावेळ थांबलो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ते वर्तमानपत्रामध्ये आले आहे.

**उप सभापती** : वर्तमानपत्रामध्ये आलेल्या सगळयाच गोष्टी जर खऱ्या असत्या तर आपल्याला जास्त हस्तक्षेप करावाच लागला नसता.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी आपल्याकडे सर्व कागदपत्रे पाठविलेली आहे.

**उप सभापती** : आपण माझ्याकडे सर्व कागदपत्रे पाठविलेली आहेत हे सर्व मला मान्य आहे. आता सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे जी माहिती पाठविलेली आहे, ती माहिती तरी तुम्हाला खरी मिळालेली आहे की नाही याची शहानिशा जेव्हा सदनापुढे कॅगचा रिपोर्ट येईल तेव्हा होईल. पण कारण नसताना एखाद्या गोष्टीबाबत आपण उगाच जास्त ओढाताण करावयाची, एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करावयाचे हे काही तेवढे बरोबर नाही आणि सभागृहाच्या एकंदरीत वातावरणालाही ते शोभादायक नाही एवढे मी आपल्याला आणि सर्व सभागृहाला सांगू इच्छितो आणि अशी विनंती करतो की, यापुढे सन्माननीय सदस्यांनी विषयाला धरुनच बोलावे, त्याच्या पलीकडे जाऊ नये.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**उप सभापती** : माझे जे म्हणणे आहे, त्याला सन्माननीय सदस्यांची हरकत आहे काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय मंत्री महोदयांनी माझे नाव घेतले आहे.येथे माझ्या नावाचा उल्लेख झालेला आहे, त्यामुळे मला नियमाप्रमाणे याठिकाणी खुलासा करण्यासाठी संधी आहे आणि आपण ती देणार आहात की नाही ? सन्माननीय मंत्री महोदय, याठिकाणी माझे नाव घेऊन बोलले आहेत. त्यांनी अगोदर मला तशा प्रकारची नोटीस दिली नव्हती. मला नोटीस दिलेली नसताना माननीय मंत्री महोदयांनी माझ्यावर आरोप केलेले आहेत मग माझा अधिकार आहे. सभापती महोदय, एकतर आपण त्यावेळी ते कामकाजातून काढून टाकावयास हवे होते. त्यांनी माझे नाव घेतलेले आहे त्यामुळे माननीय मंत्री महोदय माझ्या बाबतीत जे बोलले आहेत, त्याबाबत मला खुलासा केला पाहिजे.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ते मघाशी म्हणाले की,मी पेट्रोल पंपावर बसत असे. त्यावेळी ते माननीय मुख्यमंत्री होते आणि आता त्यांना एवढ्या वर्षानंतर ते आठवले. त्यांनी मला सांगितले होते की नाही हे मला आठवत नाही.पण माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे जेव्हा चेंबूरला घाटल्यामध्ये रहात होते तेव्हा ते काय धंदे करीत होते? हऱ्या-नाऱ्या गँगचे ते कोण होते?





(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया असे करु नये

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : जर सभागृहामध्ये चर्चेची पातळी हीच रहाणार असेल तर ....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, तेव्हा माननीय मंत्री श्री.नारायण राणे हे दारुच्या धंद्यावर बसत होते काय ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : मी ही वाक्ये सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकत आहे.

यानंतर श्री.अ.शिगम. . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**उप सभापती** : मी आता पुढील कामकाज घेत आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, मी घाटल्यामध्ये राहत नव्हतो. तेव्हा प्रथम त्यांनी माहिती घ्यावी. मी कुठे कामाला होतो, काय करीत होतो हे सर्वांना माहीत आहे. मी त्यांच्यावर आरोप केले त्यांना ते असह्य झ ाले, त्यांची काय स्थिती झाली आहे पहा. त्यांना डॉक्टरकडे पाठवा, अन्यथा काही तरी चुकीचे घडेल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी माझ्या बाबतीत जे वक्तव्य केले ते आपण रेकॉर्डवर ठेवलेले आहे. सन्माननीय मंत्री महोदय चेंबूरला टॉकीजवर बसत होते काय याची चौकशी करावी...

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हे सभागृह शासकीय कामकाजासाठी आहे. हे सभागृह म्हणजे आखाडा नाही. मी सभागृहातील सर्व गैरलागू चर्चा थांबवित आहे. मी पुढील कामकाज पुकारलेले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण आताच कामकाजातील काही भाग रेकॉर्डवरुन काढून टाकलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांचे म्हणणे आहे की, मंत्री महोदयांनी त्यांच्या बाबतीत वैयक्तिक उल्लेख केलेला आहे. माझी आपणास विनंती आहे की, आपण पुन्हा एकदा सर्व रेकॉर्ड तपासावा व त्यातील काही आक्षेपार्ह मजकूर काढून टाकावा. माझे असे म्हणणे आहे की, आपण नियमानुसार चर्चा करु.

**उप सभापती** : मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, मी सर्व रेकॉर्ड तपासून पाहीन जो आक्षेपार्ह भाग असेल तो कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील व कपिल पाटील, वि.प.स. यांनी " गुरुवार दिनांक 22 मार्च 2012 रोजी मध्यरात्री मुळा नदीतून भरलेल्या वाळूचे काही ट्रक्स साकूर मार्गे पुणे-नाशिक मार्गाकडे येत असताना आर.टी.ओ.ची गाडी येत असल्याच्या भीतीने गाडीचे दिवे बंद करुन ट्रक वस्ती समोर उभा करणे व आर.टी.ओ.ची गाडी गेल्याचा संदेश मिळताच ट्रक तेथून वेगात नेताना घराबाहेर झोपलेल्या चार तरुणांपैकी योगेश गांजवे याचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या बाबत शासनाने निवेदन करावे.

या नंतर सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "मौजे उस्वद (देवठाणा) तालुका मंठा, जिल्हा जालना येथील पूर्णा नदीच्या पात्रात लिलावापेक्षा जास्त वाळू उपसा होत असल्यामुळे उस्वद देवठाणा गावाच्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरीवर त्याचा परिणाम होत असल्याची एप्रिल 2012 मध्ये उघडकीस आलेली घटना, अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर कारवाई करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

या नंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी "दिनांक 7 एप्रिल, 2012 रोजी पुणे शहरातील जनता वसाहत येथील महापालिकेच्या सिताराम गावंडे विद्यालयातील 115 विद्यार्थिनींना इडली-सांबार खाल्ल्याने विषबाधा झाल्याची घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

या नंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील गांगेश्वर मंदिरापासून 60 मीटर अंतरावर असलेल्या कोकण प्राईड बीअरबार व परमीट रुमला नियमबाह्यरित्या नुतनीकरणाचा परवाना देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय उप सभापती**...

या नंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत,वि.प.स.यांनी "शासकीय तसेच निम शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राध्यापकांना 35 टक्के दराने देण्यात येणारा व्यवसायरोध भत्ता 25 टक्के केल्याने वैद्यकीय शिक्षण संघटनेने नोव्हेंबर 2011 मध्ये केलेले राज्यव्यापी आंदोलन" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित नियम 93 च्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

-------

..4..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तृतीय वर्ष वाणिज्य शाखेची परीक्षा केंद्रे अचानक बदलल्यामुळे सुमारे 1800 विद्यार्थ्यांना परीक्षा देता न येणे या बाबत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.डी.पी.सावंत ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून,आपण निदेश दिल्या प्रमाणे मला निवेदन करायचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 27 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, निवेदनात नमूद केलेले आहे की, "विलेपार्ले व संघवी महाविद्यालय, विलेपार्ले या महाविद्यालयांना अनवधानाने नियमित व दूरस्थ शिक्षण संस्थेचे विद्यार्थी असे दुहेरी वाटप करण्यात आले. सदर संख्या या महाविद्यालयांच्या पट संख्येच्या तुलनेत अतिरिक्त/जादा असल्यामुळे .." म्हणजे जे विद्यार्थी परीक्षेला बसले ते मुळातच जादा होते. तेव्हा तेथे बसण्याची सोय नव्हती म्हणून परीक्षा केंद्र बदलण्यात आले काय ? निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदात नमूद केलेले आहे की, "संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच इतर संबंधित कर्मचाऱ्यांना ज्ञापनाद्वारे सक्त ताकीद देण्यात आली आहे." तेव्हा माझा प्रश्न आहे की, कोणत्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली, परीक्षा कंट्रोलरवर कारवाई झाली काय ? माझा तिसरा प्रश्न आहे की, सूचना फलक आणि फॅक्सद्वारे विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली असे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांची संख्या जवळपास 1800 आहे. तेव्हा या विद्यार्थ्यांपर्यंत मेसेज पोहोचला की नाही याची शहानिशा झाली होती काय ?

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. त्या बाबत मी सांगू इच्छितो की, विद्यापीठाचे जे मध्यवर्ती संगणक केंद्र आहे त्यांच्यामार्फत परीक्षा विभागाला विद्यार्थ्यांची जी यादी जाते त्या यादीमध्ये नियमित विद्यार्थी आणि दूरस्थ विद्यार्थी यांची वेगवेगळी यादी गेल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या कॉलेजला त्यांच्या कॅपॅसिटीपेक्षा जास्त विद्यार्थी देण्यात आले ही चूक परीक्षा नियंत्रकांकडून झाली. म्हणून आपण अगोदरच्या दिवशी त्या त्या ठिकाणी विद्यापीठाची माणसे ठेवली. सगळ्यांना सूचना देण्यात आल्या आणि कोणत्याही विद्यार्थ्याला परीक्षेपासून वंचित राहू देऊ नये अशा प्रकारची खबरदारी घेण्यात आली. त्यामुळे एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिला नाही. सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे सेंट्रल कॉम्प्युटींग फॅसेलिटीजच्या अधीक्षिका श्रीमती मुजूमदार यांना निलंबित करण्यात आले आहे. डेप्युटी रजिस्ट्रार श्रीमती शोभा सोनवणे, असिस्टंट रजिस्ट्रार श्री. हिंमत चौधरी तसेच हेड क्लार्क श्रीमती नलावडे यांना कारणे दाखवा नोटिसेस देण्यात आलेल्या आहेत. अशा प्रकारची चूक परत कधी होऊ नये अशी सक्त ताकीद विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना देण्यात आली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी तिसरा प्रश्न असा विचारला होता की, सूचना फलक लावला, मेसेजेस दिले पण या सर्व विद्यार्थ्यांना या सूचना मिळाल्या की नाही याची शहानिशा आपण केली का, खात्री केली का ?

श्री. डी. पी. सावंत : सभापती महोदय, मी सांगितल्याप्रमाणे सगळ्यांना सूचना दिल्या होत्या. सर्व केंद्रांवर माणसे पाठविली होती. ज्या विद्यार्थ्यांना सूचना मिळाल्या नसतील त्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठाची माणसे त्या ठिकाणी हजर होती. त्या कॉलेजेसना सांगितले गेले होते की, ऐनवेळी जर असे काही विद्यार्थी आले तर त्यांना परीक्षेस बसू द्यावे. तीन कॉलेजेसमध्ये असे विद्यार्थी ऐनवेळी आले होते की ज्यांचे सेंटर या ठिकाणी नव्हते पण त्या विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी परीक्षेस बसू देण्याची मुभा देण्यात आली. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे नुकसान झालेले नाही किंवा कोणत्याही विद्यार्थ्याची तक्रार सुध्दा आलेली नाही.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ. शी./ मु. शी.** : नाशिक शहरातील गोंदे औद्योगिक वसाहतीमध्ये थायसन क्रूफ कंपनीच्या सुरक्षा विभागातील फायर फायटरमध्ये कार्बन डायऑक्साईड गॅसची गळती होणे याबाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. हसन मुश्रीफ ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या कंपनीमध्ये सेफ्टी ऑफिसरने वर्षभरात किती वेळा भेटी दिल्या होत्या ? सेफ्टी ऑफिसरने ज्या वेळी भेटी दिल्या होत्या त्या वेळी त्यांनी काय सूचना केल्या होत्या ? मयताच्या कुटुंबीयांना किती दिवसात भरपाई अदा करण्यात येईल ? जखमी कामगारांना मदत केव्हा मिळेल ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अपघातापूर्वी फॅक्टरी इन्स्पेक्टरने 21.7.2011 रोजी तपासणी केली होती. हा जो अपघात झाला त्यामध्ये खाली कामगार गॅस कटरने वेल्डींग करीत असताना त्या ठिकाणी थोडे ऑईल सांडले होते आणि त्या ऑईलमुळे त्या ठिकाणी आग लागली. ती आग विझवली पण त्या ठिकाणी जी सिस्टीम बसविली होती त्या सेन्सरने आपोआप कार्बन डायऑक्साईड सोडला. त्यानंतर एका मिनिटामध्ये सर्व लोकांनी बाहेर जावयास पाहिजे होते पण एक कामगार त्या ठिकाणी राहिला. तो का राहिला हे पाहण्यासाठी रेस्क्यु ऑफिसचा एक कामगार त्या ठिकाणी आला. त्याने आपल्या तोंडाला जो ऑक्सिजनचा मास्क लावला होता तो फक्त दोनच मिनिटे पुरेल एवढा होता. त्यामुळे तो कामगार त्या ठिकाणी मयत झाला. त्याने ऑक्सिजनचा जो मास्क लावलेला होता तो गळून पडला होता. हा अपघात झाल्यानंतर त्यांना कायद्याप्रमाणे 7 लाख 47 हजार रुपयांचा चेक अदा करण्यात आलेला आहे. त्या शिवाय या कारखान्याने 11 लाख रुपये देण्याचे लेखी लिहून दिलेले आहे. या महिनाअखेर ते पैसे पोहोचतील. त्याशिवाय कामगारांनी आणि व्यवस्थापनाने 4 लाख रुपये देण्याचे मान्य केले आहे. अशा प्रकारे एकूण 22 लाख 47 हजार नुकसानभरपाई त्यांना या महिना अखेरपर्यंत मिळेल.

----

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ.शी./मु.शी.** : राज्यातील अनुदानित मागासवर्गीय वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीऐवजी मानधन दिले जाणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, भगवान साळुंखे, नागो गाणार, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सचिन अहिर ( सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, स्वयंसेवी संस्थांची जी अनुदानित वसतिगृहे आहेत तेथील कर्मचाऱ्यांचा हा प्रश्न आहे. गेल्या अनेक वर्षापासून या संदर्भामध्ये चर्चा सुरु आहे. निवेदने दिली जात आहेत. सभापती महोदय, आपण सुध्दा या कर्मचाऱ्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे. आपल्या दालनामध्ये एक-दोन वेळा बैठकीचे आयोजनही करण्यात आले होते. परंतु काही कारणामुळे बैठक होऊ शकली नाही. यामध्ये या कर्मचाऱ्यांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी देण्याचा प्रश्न आहे. निवेदनामध्ये मानधन कसे दिले होते आणि ते वाढविण्याच्या संदर्भात शासनाचा असलेला मनोदय या संदर्भात माहिती दिलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

परंतु त्यांना वेतनश्रेणी देण्यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे ते नमूद केलेले नाही. या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला तर शासनावर आर्थिक बोजा पडणार आहे हेही खरे आहे. मंत्री महोदयांनी आपल्यालाही पत्र दिलेले आहे. त्या पत्रात त्यांनी या प्रश्नासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनीच पुढाकार घेऊन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे असे म्हटलेले आहे. त्यामुळे आपल्या दालनामध्ये मंत्री महोदयांसमवेत एक बैठक घ्यावी अशी मी विनंती करतो.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, याबाबत बैठक घेण्यात येईल. या लोकांना वेतनश्रेणी देत असताना सेवा नियमामध्ये त्यांचे वय, पात्रता हे मुद्देही समोर येऊ शकतात. माननीय उप सभापती महोदय आपण आणि सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी पुढाकार घेतला असल्यामुळे माननीय उप मुख्यमंत्री, विभागाचे मंत्री महोदय, या सर्वांनी मान्य केले आहे की, या घटकाच्या मानधनात वाढ झाली पाहिजे. त्यांना न्याय मिळाला पाहिजे. म्हणूनच त्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार एक बैठक घेण्यात येईल.

-----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ. शी.** : कोरेगाव परिसरातील सैनिकांच्या विधवा पत्नींच्या नावे दलालांनी म्हाडाच्या लॉटरीसाठी राखीव कोट्यातून अर्ज भरणे

**मु. शी.** : कोरेगाव परिसरातील सैनिकांच्या विधवा पत्नींच्या नावे दलालांनी म्हाडाच्या लॉटरीसाठी राखीव कोट्यातून अर्ज भरणे यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री जयप्रकाश छाजेड, राजन तेली, सुभाष चव्हाण, उल्हास पवार, मोहन जोशी, श्रीमती अलका देसाई, श्री. एस क्यू ज़मा ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सातारा जिल्ह्यातील कोरेगांव परिसरातील 20 ते 25 सैनिकांच्या विधवा पत्नींना मुंबईत घराचे आमिष दाखवून दलालांनी त्यांच्या नावे सन 2008, 2009 व 2010 च्या म्हाडाच्या लॉटरीमध्ये मालाड, दहिसर, प्रतिक्षानगर, गोरेगांव येथील घरासाठी सैनिकांच्या राखीव कोट्यातून अर्ज भरणे, हे अर्ज लॉटरीत यशस्वी ठरल्यानंतर ती घरे दलालांनी खुल्या बाजारात विकल्याचा प्रकार दिनांक 23 फेब्रुवारी, 2012 रोजी उघडकीस येणे, सन 2011 च्या लॉटरीतील 425 घरांच्या घोटाळ्याचे प्रकरण ताजे असतानाच हा प्रकार उघडकीस आल्यामुळे म्हाडा कार्यालयात उडालेली खळबळ सर्वसामान्य नागरिकांच्या म्हाडाच्या लॉटरी कार्यपध्दतीवरील विश्वास उडाल्यामुळे त्यांच्यात पसरलेला तीव्र संताप व याबाबतची शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे मॅटर कोणाला लहान वाटेल. कारण लष्कराच्या नावाने संपूर्ण 'आदर्श' नावाच्या इमारतीतील फ्लॅटच अनेकांनी बळकावले असल्यामुळे म्हाडातील या सदनिका पळविणारे लोक त्या मानाने लहानच आहेत. मघाशी सभागृहात काय झाले आहे ते सर्वांनीच पाहिले आहे. या प्रकरणात शशी जाधव या नावाच्या दलालाने सैनिकांच्या विधवा पत्नींच्या नावे अर्ज करुन सदनिकांचा ताबा घेतला. हे प्रकरण उघडकीस आलेले आहे. त्याबाबत मंत्री महोदयांना एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, म्हाडाच्या सोडत नि:पक्षपातीपणे काढल्या जातात, आदर्श आहेत, संशयाला जागा नाही असे सांगितले जाते, तरीही या जागा लोक शोधून काढत आहेत. या सदनिका वाटपाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. ही प्रक्रिया सदोष आहे हे लक्षात आल्यानंतर त्यातील दोष दूर करण्यासाठी सरकारने कोणती पावले टाकली आहेत ? या कामासाठी एजंट स्वत:चे डोके वापरत नाहीत. त्यामध्ये मिलीभगत असते. ती प्रशासकीय अधिकाऱ्यांची आणि राजकारण्यांची आहे की नाही हे मला माहीत नाही. पण यामध्ये कोणाकोणाची मिलीभगत आहे हे शोधण्यासाठी शासनाने चौकशी केली आहे काय, यामध्ये ज्या चुकीच्या गोष्टी झाल्याचे निदर्शनास आले आहे त्यामध्ये सरकार कशा प्रकारे दुरुस्ती करणार आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, संबंधित व्यक्तीचे नाव शशी कदम असे आहे. म्हाडाच्या सोडतीमध्ये पारदर्शकता येण्यासाठी ऑनलाईन सिस्टिम सुरु केलेली आहे. या व्यवस्थेवर लोकांचा विश्वास आहे. त्यासाठी मॅस्टेक कंपनीवर सोडतीच्या प्रक्रियेची जबाबदारी टाकलेली आहे. ऑन लाईन सिस्टिम सुरु केल्यानंतर एखाद्या व्यक्तीचा अर्ज स्वीकृत झाल्यानंतर व नंबर लागल्यावर संबंधित व्यक्ती स्वत: येऊन म्हाडाकडे पैसे भरत नाही तोपर्यंत तो पात्र ठरत नाही अशी भूमिका शासनाने घेतलेली आहे. यासंबंधी तक्रार आल्यानंतर तेथे प्रत्यक्षात जाऊन तपासणी केल्यावर या लोकांच्या नावाचा गैरवापर करण्यात आला आहे हे दिसून आले. अर्थात बॉण्ड लिहून धेत असताना, फिजिकल ताबा देत असताना पात्र व्यक्तींनाच ताबा दिलेला आहे. हे होऊ नये म्हणून चौकशी करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले होते. व्हिजिलन्स अधिकाऱ्यांमार्फत चौकशी केल्यानंतर 2 किंवा 3 लोकांनी या सदनिका भाड्याने दिल्याचे व उर्वरित 7-8 सदनिका बंद असल्याचे दिसून आले. या लोकांची फसवणूक झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्यानंतर संबंधित लोकांविरुध्द गुन्हा नोंदविलेला आहे. दलाल व संबंधित अधिकाऱ्यांची हात

4...

श्री.सचिन अहिर....

मिळवणी झाली आहे का असे विचारण्यात आले आहे. ही बाब निश्चितपणे तपासली जाईल आणि ज्यांनी अयोग्य काम केले असेल त्यांना पाठिशी घालण्याची भूमिका राज्य सरकारची राहणार नाही.

यानंतर श्री.शिगम....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 14:35

श्री. सचिन अहिर...

या सर्वांविरुध्द कडक कारवाई केली जाईल. पुढच्या काळात यामध्ये अधिक पारदर्शकता यावी यासाठी काही सूचना असतील तर सरकार त्या सूचनांचा निश्चितपणे विचार करील.

श्रीमती अलका देसाई : मी माननीय मंत्री महोदयांचे उत्तर मन लावून ऐकत होते. या विषयाच्या संदर्भात मी काही बाबी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते. महाराष्ट्र हौसिंग बोर्डाच्या कार्यालयामध्ये अगदी वरच्या अधिका-यापासून ते खाली साध्या लिपिकापर्यन्त मिलिभगत असते.आपण शहिदांच्या वारसांकडून फॉर्म भरुन घेता, त्यानंतर त्यांच्या नावाच्या तीन-तीन फाईल्स तयार करता आणि शेवटी त्या अधिका-यांना जे वाटते तेच ते करतात. हा एक भाग. दुसरे असे की, अमुक अमुक कागदपत्राची पूर्तता करा, घरे तुमच्या नावावर करुन दिली जातील अशा प्रकारची जाहिरात वर्तमानपत्रातून दिली जाते. सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर देखील ही मिलिभगत मंडळी लोकांची कामे करीत नाही. मी एक उदाहरण देते. वांद्रे येथील गांधीनगर वसाहतीमधील बूथ क्रमांक 4 येथील गृहनिर्माण संस्थेने हौसिंग बोर्डाच्या कार्यालयामध्ये 11 कोटी रुपये भरले. परंतु या मिलिभगत लोकांच्या गलथान कारभारामुळे त्यांचे काम होत नाही. त्यांचे व्हेस्टेड इंटरेस्ट कुठे तरी थांबले पाहिजेत. त्यांनी त्या संस्थेला पत्र लिहिलेले आहे की, चुकीमुळे दिनांक 20.9.2010चा प्रस्ताव म्हाडाकडे आलेला आहे त्यामुळे आम्ही परवानगी देऊ शकत नाही. मग यांनी वृत्तपत्रातून जाहिरात का दिली ? त्या ठिकाणी बिडकर नावाचे अधिकारी आहेत. ते स्वत:ला फार विद्वान समजतात आणि इतरांना ते अप्रबुद्ध समजतात. त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे. तरीही त्यांच्या भावना लक्षात घेण्यासारख्या आहे. त्यांनी जो विषय येथे मांडला तो निश्चितपणे तपासून पाहिला जाईल आणि काही अयोग्य असेल तर कुणाच्याही बाबतीत मागेपुढे पाहिले जाणार नाही. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेल्या अधिका-यांच्या बाबतीत काही स्पेसिफिक तक्रार असेल तर त्याची देखील दखल घेतली जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : माझे दोन प्रश्न आहेत. सातारा जिल्ह्यातील शहीद जवानांच्या विधवा पत्नींच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. शहीद जवानांच्या विधवा पत्नींना जी जी काही मदत लागेल ती मदत करण्यासाठी राज्य सरकारने ठिकठिकाणी बोर्ड स्थापन केलेली आहेत. त्या बोर्डातर्फे या महिलांना मार्गदर्शन होणे आवश्यक होते. जेव्हा अशा त-हेचे प्रस्ताव म्हाडाकडे पाठविण्यात आले किंवा अशा प्रकारचे अन्य काही प्रस्ताव असतील तर त्याबाबतीत त्यांना बोर्डाकडून का मदत केली गेली नाही, शहिदांच्या विधवा पत्नींची फसवणूक झाल्या प्रकरणी सातारा येथील सैनिक कल्याण बोर्डाकडून का मदत केली गेली नाही, 17 दलालांचा उल्लेख लक्षवेधीच्या निवेदनामध्ये केलेला आहे. या दलालांची नावे पटलावर ठेवण्यात येतील काय ?

....नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.शिगम 14:40

लक्षवेधी सूचना क्र.1....

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, हे प्रकरण 2008 व 2009 मधील आहे. तक्रार मात्र फेब्रुवारी, 2012 मध्ये प्राप्त झाली. तक्रारदाराने संस्थेच्या माध्यमातून पुढाकार घेऊन मुख्यमंत्र्यांकडे फेब्रुवारी, 2012 मध्ये तक्रार सादर केली. या संदर्भातील कारवाई मार्च महिन्यामध्ये सुरु करण्यात आली आणि एप्रिल-मे पर्यंत निर्णय येईल. निर्णय जोपर्यंत येत नाही तोपर्यंत सुमोटो काही करता येणार नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे पुढे दक्षता निश्चितपणे घेतली जाईल. सैनिक कल्याण बोर्डाबद्दलची सूचना केली गेली. आपण लॉटरी पध्दतीचा अवलंब करतो. तेव्हा वैयक्तिक लाभार्थ्याने पुढे यायला पाहिजे. त्या दृष्टीकोनातून आपण पहात असतो. अशा बोर्डाकडून अर्ज मागविता येईल काय या संदर्भात विचार करता येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, म्हाडाच्या सन 2011 च्या ऑनलाईन सोडतीमध्ये एकच पत्ता व एकच दूरध्वनी क्रमांक असलेल्या 334 अर्जदारांनी आणि 17 दलालांनी फसवणूक केल्याचे निवेदनात नमूद केले आहे. म्हाडाचे काम अधिक लोकाभिमुख होण्यासाठी अधिकाऱ्यांकडे जबाबदारी सोपविली जाते. माननीय राज्यमंत्री व मी देखील रिपेअर बोर्डाचे चेअरमन होतो. त्यामुळे लॉटरी पध्दत सुरु करताना ती अधिकाधिक पारदर्शी असावी हाच आपला हेतू होता. 334 अर्जामध्ये एकच पत्ता व संपर्कासाठी एकच दूरध्वनी क्रमांक असल्याचे निदर्शनास आले असताना ज्या अधिकाऱ्यांकडे अर्जांची छाननी करण्याचे काम होते त्या अधिकाऱ्यावर याची जबाबदारी निश्चित करुन त्यांना सस्पेंड केले जाईल काय?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, ही जबाबदारी मॅस्टेक कंपनीकडे दिलेली होती. तक्रार आल्यानंतर सॉफ्टवेअरमध्ये सगळे समान पत्ते व दूरध्वनी क्रमांक शोधून काढणारी यंत्रणा नव्हती. संबंधित कंपनीकडे ही ऑनलाईन प्रक्रियेची एजन्सी दिल्यानंतर त्यांच्यावर ही जबाबदारी निश्चित करता येईल का ही बाब तपासून पहात आहोत. अधिकाऱ्यांचा त्यामध्ये दोष असेल तर त्यांच्याविरुध्द देखील कारवाई केली जाईल.

श्री.भाई जगताप : हा विषय टोलवाटोलवीचा नाही. ऑनलाईन लॉटरी प्रक्रियेचे कॉम्प्युटरायझेशन करण्याचे काम तुम्ही खाजगी कंपनीकडे दिले. त्या प्रक्रियेची अंमलबजावणी म्हाडाने करावयाची आहे. 334 अर्जदार हे एकच असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर अधिकाऱ्यांना दोषी धरणार की नाही, त्यांच्यावर कारवाई करणार की नाही? ऑनलाईन लॉटरी प्रक्रियेचे काम

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.शिगम 14:40

श्री.भाई जगताप..........

एका एजन्सीकडे दिल्यानंतर त्यांची जबाबदारी मर्यादित आहे. ते काम पूर्ण होऊन म्हाडाकडे आल्यानंतर म्हाडाने अलॉटमेंट करावयाचे आहे. त्या संदर्भात अधिकारी जबाबदार नाही असे कसे म्हणता येईल? संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणे आवश्यक आहे. तसा मेसेज जाणे आवश्यक आहे. त्यानुसार कारवाई करण्यात येईल काय?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे या प्रकरणामध्ये निश्चितपणे दोष असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करु. आज प्रथमदर्शनी पाहिल्यानंतर एक एसएमएस आला होता. त्या दृष्टीकोनातून तपासणी केली असता अर्जदाराचे नाव एकच असले तरी पत्ते वेगवेगळे होते व प्रत्येक अर्जामध्ये कॉन्ट्रॅक्ट नंबर एकच होता. हे सॉफ्टवेअरमधून डिटेक्ट करण्याचे काम सुमोटो केले आणि 334 लोकांना गाळे दिले नाहीत. त्यांचे फॉर्म वेगळे काढून त्यांनी जे पैसे भरले होते ते तसेच ठेवले व अलॉटमेंट केले नाही. अलॉटमेंट झाले असते तर संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती असताना अलॉटमेंट केले म्हणून त्यांच्यावर दोष ठेवला आला असता. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ऑब्झर्व्हेशन ठेवण्याची जबाबदारी ज्या संबंधित अधिकाऱ्यांवर होती आणि ती त्यांनी पार पाडली की नाही? योग्यरित्या पार पाडली नसेल तर त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, फेब्रुवारी, 2012 मध्ये शहिदांच्या विधवा पत्नींची फसवणूक झाली. त्यांच्या नावे घरे लुटल्याचे प्रकरण फेब्रुवारी, 2012 मध्ये उघडकीस आले.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. संजय केळकर .......
हे उघडकीस आल्यानंतर देखील दोन महिन्यांनी तक्रार दाखल केली. ही तक्रार दाखल करण्यास विलंब लावण्याचे कारण काय आणि या तक्रारीनुसार संबंधितांवर गुन्हा दाखल झाला आहे काय ?

श्री. सचिन अहिर : महोदय, मी उत्तरात स्पष्ट केलेले आहे की, प्राथमिक स्वरुपात शासनाच्या लक्षात आले की ही फसवणूक झाली त्याच वेळेस माननीय मुख्य मंत्र्यांनी सचिवांना तसे आदेश दिले आणि सचिवांनी देखील व्हिजीलन्सला फिजीकली व्हेरीफाय करण्याचे आदेश दिले. त्यानुसार प्रत्यक्ष चौकशी केली असता असे लक्षात आले की, ज्या रुम्स अलॉट केलेल्या आहेत त्या बंद आहेत तर काही म्हाडाची परवानगी न घेता भाडे तत्वावर दिलेल्या आहेत व त्याबद्दल कोणी नावे सांगण्यास सुध्दा तयार नाहीत. असे आढळून आल्यानंतर एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे. इतकेच नव्हे तर नियम 66 अंतर्गत त्या रुम्स ताब्यात घेण्याची प्रक्रिया देखील सुरु करीत आहोत. समजा एकाला रुम अलॉट झाली असेल आणि तो तेथे राहत नसेल आणि म्हाडाची परवानगी न घेता भाड्याने दिली असेल तर त्या रुम्स ताब्यात घेण्याची प्रक्रिया शासन म्हाडाच्या माध्यमातून करु शकते....अडथळा....मग त्यात लोक प्रतिनिधी असले तरी त्यांच्या रुम्स सुध्दा ताब्यात घेण्याची शासनाची भूमिका राहणार आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, ही तांत्रिक बाब असून हा मुद्दा सॉफ्टवेअरशी संबंधित आहे. एसएमएसच्या माध्यमातून अधिकाऱ्यांनीच ही बाब डिटेक्ट केलेली आहे. मग ज्या कंपनीचे सॉफ्टवेअर आहे त्यातच गोंधळ झालेला असल्याने त्या कंपनीलाच यातून बाहेर काढले पाहिजे. अन्यथा त्याच सॉफ्टवेअरच्या माध्यमातून दुसरा प्रकार सुध्दा होऊ शकतो. म्हणून शासन या कंपनीच्या बाबतीत कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. सचिन अहिर : महोदय, मुळात ही कंपनी खाजगी नसून शासनाचाच एक भाग आहे. मॅस्टेक कंपनीला हा कार्यक्रम दिल्यानुसार त्यांनी त्यावर आधारित सॉफ्टवेअर तयार केले व ते आयआयटी, पवई यांच्याकडून तपासून घेतले आहे. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्यानुसार पुढील काळात प्रिकॉशन घेऊन अशी चूक होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सूचना दिल्या जातील.

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, केवळ म्हाडाचाच विषय या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केला असला तरी शासनाच्या एमएमआरडीए, पीएपी अथवा एसआरए सारख्या योजनांच्या माध्यमातून देखील असे प्रकार अधिकारी वर्ग लोक करतात. गरिबांसाठी उपरोक्त योजनांमार्फत एखादी स्कीम निघत असली तर त्याचा फायदा घेण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेचे लोक अगोदरच कामाला लागतात व गरिबांना ही घरे मिळण्यापूर्वीच ती विकणाऱ्या दलालांचा सुळसुळाट झालेला आहे. हा प्रकार गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. सैनिकांच्या विधवांच्या निमित्ताने ही गोष्ट समोर आलेली आहे. पण अशा प्रकारे एखाद्या अधिकाऱ्याचे नाव घेऊन बोलावयाचे याला अर्थ नाही तर सबंध यंत्रणाच भ्रष्ट झाली आहे आणि अनेक ठिकाणी प्रशासन देखील त्यात सामील होत आहे, यादृष्टीने कोणती कारवाई शासन करणार आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांच्याकडे यासंदर्भातील स्पेसिफिक प्रकरणे असतील तर ती त्यांनी आमच्याकडे दिली तर सदर प्रकरणे नगरविकास खात्याकडे देऊन ही बाब तपासून घेतली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, या विषयाच्या बाबतीत मी अनेक वेळा तक्रारी दिलेल्या आहेत. एमएमआरडीएच्या घरांच्या खाली इस्टेट एजंटांनी दुकाने, ऑफिसेस थाटलेली असून इस्टेट एजंट कोणकोणते फ्लॅट विक्रीसाठी आहेत व त्यांची किंमत किती आहे याची माहिती देत असतात. शासकीय यंत्रणा अशाच प्रकारची कामे करीत असतात. आतापर्यंत आम्ही जी प्रकरणे आपल्याकडे दिलेली आहेत त्या प्रकरणांवर कोणती कारवाई केली जाणार आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावी अशी विनंती आहे.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मुळात हा विषय नगरविकास विभागाचा असून यासंदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी तक्रार दिली तर त्या तक्रारीची नगरविकास खात्याकडून निश्चितपणे चौकशी केली जाईल एवढे मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

---

**लक्षवेधी सूचना क्र-2 बाबत**

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 2 पुढे ढकलण्यात येत असून आता तिसरी लक्षवेधी सूचना घेतली जाईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बारावी अभियांत्रिकी, औषध शास्त्र व वैद्यकीय प्रवेशासाठी सीईटी परीक्षा घेण्या संबंधी निर्णय न होणे

**मु. शी.** : बारावी अभियांत्रिकी, औषध शास्त्र व वैद्यकीय प्रवेशासाठी सीईटी परीक्षा घेण्या संबंधी निर्णय न होणे यासंबंधी डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अभियांत्रिकी, औषध निर्मिती शास्त्र इत्यादी तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी बारावीच्या गुणांना ४० टक्के महत्व देण्यात येणे, मात्र, बारावीचा अभ्यासक्रम माहे एप्रिल, २०१२ पासून सुरु होत असूनही, बदललेल्या अभ्यासक्रमांवर आधारित इयत्ता बारावीची पुस्तके अद्याप उपलब्ध नसणे, त्याचप्रमाणे यावर्षी बारावी अभियांत्रिकी, औषधशास्त्र व वैद्यकीय प्रवेशासाठी सीईटी किंवा केन्द्रीय प्रवेश प्रक्रिया राबवून प्रवेश देणार अथवा कसे याबाबत अद्याप निर्णय झालेला नसणे, या सर्व बाबींमुळे लाखो विद्यार्थ्यांत पालकांत व शिक्षकांत निर्माण झालेले संभ्रमणाचे व गोंधळाचे वातावरण, संतापाची लाट लक्षात घेता या ज्वलंत प्रश्नी शासनाने तातडीने निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता, शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मी जे प्रश्न विचारले होते व त्याच्या संदर्भात विभागाने जे उत्तर दिलेले त्या उत्तरामुळे पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे. अभियांत्रिकी, औषध निर्मिती शास्त्र, तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी बारावीच्या गुणांना महत्व दिले गेले आहे. आपल्याकडे वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी नीट व अभियांत्रिकी परीक्षेसाठी सॅटची परीक्षा घेतली जात असते. परंतु उत्तरामध्ये आयएसईईटी परीक्षा घेतली जाणार आहे,असे म्हटले आहे. दोन्ही परीक्षेच्या संदर्भातील कोणताही अभ्यासक्रम अजून पर्यंत विद्यार्थ्यांपर्यंत पोहचलेला नाही. सन 2012-2013 मध्ये या परीक्षा केंद्रीय धर्तीवर होणार आहेत. त्यामुळे अकरावी व बारावीच्या माध्यमातून नीट व सॅटच्या परीक्षेत जे प्रश्न विचारले जाणार आहेत त्याचा अभ्यासक्रम तयार केला गेला आहे काय ?फार्मसीची एंट्रन्स एक्झाम नेमके कोण घेणार आहे ? याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावी अशी विनंती आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात अभ्यासू सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी चांगले प्रश्न उपस्थित केलेले आहेत. या विषयाच्या संदर्भात मला अधिकची माहिती द्यावयाची आहे की, विद्यार्थ्यांना सीईटी, एआयईईई या परीक्षा द्याव्या लागतात. विद्यार्थ्यांना जर आयआयटीला जावयाचे असेल तर जेईई अशा परीक्षा द्याव्या लागत असतात. विद्यार्थ्यांना जर केंद्राच्या कोटयातून प्रवेश घ्यावयाचा असेल तर त्याला एआयईईई ही परीक्षा द्यावी लागते. यामध्ये 15 टक्के कोटा केंद्राचा असून 65 टक्के कोटा राज्यशासनाचा असतो व 20 टक्के कोटा मॅनेजमेंटला दिलेला आहे. अशा प्रकारे 100 टक्के कोटा इंजिनिअरिंग, मेडिकल व फार्मसीच्या संदर्भात दिला जातो.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ 14:55

श्री.राजेश टोपे....

या सगळ्या पार्श्वभूमीवर 3-3 परीक्षा द्याव्या लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांवर आणि पालकांवर मानसिक दृष्ट्या ताण येतो. 3-3 परीक्षांचा ताण मुलांवर पडू नये हा एक विषय झाला.

दुसऱ्या महत्त्वाच्या विषयाची देखील मला पार्श्वभूमी सांगितली पाहिजे. अलीकडच्या काळात अकरावी आणि बारावीची कॉलेजेस होतच नाहीत अशी परिस्थिती आहे. आजकाल पालक आणि विद्यार्थी सीईटीच्या परीक्षेवर लक्ष केंद्रीत करीत आहेत. त्यामुळे जो मूळ अभ्यासक्रम शिकविण्याचे काम कॉलेजमध्ये होणे आवश्यक आहे ते होतच नाही. त्यामुळे आता बारावीचे महत्त्वच राहिलेले नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे याचा केंद्र शासनाने विचार केला. खरे म्हणजे बारावीच्या प्राध्यापकांना प्रतिष्ठाच राहिलेली नाही, अशी स्थिती आज आहे. त्यांच्या शिकवण्याचे महत्व कमी झाल्यामुळे या अध्यापकांचे महत्त्व देखील कमी झालेले आहे. या सर्वांचा विचार करण्यासाठी केंद्र शासनाच्या मानव संसाधन व विकास मंत्रालयाने तीन समित्या गठित केल्या आहेत. या समितीचा अहवाल देखील आला आहे. त्या अनुषंगाने ISEET चा विचार पुढे आला व सन 2013-14 मध्ये ISEET घेण्याचे ठरले. यासाठी त्यांनी सर्व राज्य शासनासाठी एक ढोबळ आराखडा पाठविला. त्यात त्यांनी 60:40 व्हेटेज देण्याचा देखील प्रस्ताव दिला. केंद्र शासनाच्या प्रस्तावानुसार ISEET परीक्षेसाठी जास्तीत जास्त 60 टक्के आणि इयत्ता 12 वी करिता किमान 40 टक्के गुण विचारात घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. हा 10 ते 15 लाख विद्यार्थ्यांवर परिणाम करणारा निर्णय आहे. त्यामुळे आम्ही देखील काय काय अभ्यास केला आहे हे सांगू इच्छितो.

मी आणखी एक महत्त्वाची माहिती सभागृहाला देणार आहे. या व्हेटेजमुळे बोर्डाच्या परीक्षेला पहिल्यांदाच महत्व येणार आहे. एचएससी बोर्डाला महत्व येणार आहे. कारण आयआयटीच्या प्रवेश परीक्षेला जाण्यासाठी बारावीच्या गुणांचा विचार केला जाणार आहे. त्यामुळे बारावीच्या परीक्षेला महत्व येत येणार आहे. त्यामुळे सर्व राज्यातील करिक्यूलममध्ये साम्यता असावी या दृष्टीने कौन्सिल ऑफ बोर्ड फॉर स्कूल एज्युकेशन म्हणजे कॉब्से ची स्थापना करण्यात आली. या कॉब्सेच्या माध्यमातून असे ठरविण्यात आले की, यामध्ये एक कॉमन कोअर सिलॅबस असावा. 80 ते 90 टक्के सर्व बोर्डाची परिस्थिती एक सारखी असावी. त्या प्रमाणे त्यांनी एक प्रस्ताव आपल्या राज्य शासनाकडे पाठविला. आपल्या शालेय शिक्षण विभागाने कॉब्सेने पाठविलेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे....

प्रस्ताव मान्य केला व कोअर सिलॅबस करण्याचे मान्य केले. कॉब्सेने सुचविलेला अकरावी, बारावीचा सिलॅबस हा देश पातळीवर समान असू शकेल. तो प्रस्ताव आणि विचारही आपण मान्य केला आहे.

सदर अभ्यासक्रम हा येणाऱ्या जून 2012-13 पासून लागू होईल. एकूण सहा विषय आहेत त्या पैकी 5 विषयांची पुस्तकांची छपाई झाली असून त्याच्या वितरणाची परवानगी देखील मिळाली आहे. आता ही पुस्तके बाजारात उपलब्ध देखील आहेत. रसायन शास्त्र भाग-2 हे पुस्तक सोडले तर सगळी पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत. या पुस्तकाची छपाई आणि वितरणाची परवानगी बाकी आहे. याची परवानगी एप्रिल किंवा मे अखेर पर्यंत निश्चितपणे मिळणार आहे. त्यामुळे अकरावी व बारावीचा नवीन अभ्यासक्रम उपलब्ध करून दिला जाणार आहे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.ओटवणेकर ...... 15.00

श्री.राजेश टोपे . . . .

त्यामुळे हा सगळाच ढोबळ विचार असल्यामुळे मी माझ्या उत्तरामध्ये सांगितले की, स्टेट होल्डर मग विद्यार्थी, पालक किंवा शिक्षण संस्था चालकांना एकत्र करुन त्यांना या सगळया बाबतीत पॉवर प्रेझेंन्टेशन केले, त्यावेळी मी तेथे उपस्थित होतो आणि याबाबतीत सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले. त्याठिकाणी वेगवेगळे विचार समोर आले.पण मेजॉरिटीमध्ये असा विचार आला की, 50-50 टक्क्यापर्यंत हे व्हेटेज असावे.परंतु याबाबतीत कोअर कमिटी गठीत करुन आणि ती माहिती वेबसाईट वर टाकून 2 महिन्याच्या आत-बाहेर म्हणजे एकंदर किती व्हेटेज असावे यासंदर्भात शासनाचे पक्के मत आम्ही निश्चितपणे तयार करीत आहोत.

सभापती महोदय, फार्मसीच्या संदर्भात मी एवढेच सांगेन की, एच.आर.डी.ई.ने सुध्दा यासंदर्भात अजून निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे ज्यावेळी एच.आर.डी.ई. मिनिस्ट्री याबाबतीत निर्णय घेईल तेव्हा फार्मसीच्या बाबतीत सुध्दा कळविण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मला दोन-तीन प्रश्नांच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांकडून उत्तरे हवी आहेत आणि ती विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या दृष्टीने महत्वाची आहेत. सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, साधारणपणे हा अभ्यासक्रम जून महिन्यामध्ये येईल. साधारणपणे वैद्यकीय शिक्षणासाठी आणि इंजिनिअरींगसाठी क्लासेस सुरु होतात. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना आपल्याला पीसीएमबी की पीसीबी यापैकी कोणत्या ब्रँचला जावयाचे आहे असा त्यांच्यासमोर नेहमी संभ्रम असतो. पूर्वी विद्यार्थी दोन्हीसाठी तयारी करुन जर समजा मेडीकलसाठी ॲडमिशन मिळाली नाही तर इंजिनिअरींगला जात असत. पण आता तसे होणार नाही. कारण त्यांना आताच इंजिनिअरींगकडे जावयाचे आहे की वैद्यकीय क्षेत्राकडे जावयाचे आहे हे नक्की करावे लागणार आहे.

श्री.राजेश टोपे (खाली बसून) : असे काही नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, दोन वेगवेगळया परीक्षा होणार आहेत. जर तुम्ही जून मध्ये सिलॅबस देणार असाल तर ते परीक्षांची तयारी कशी करणार आहेत? दुसरे म्हणजे पूर्वी या दोन्ही परीक्षा मराठी, उर्दू, इंग्रजी आणि हिंदी या भाषांमध्ये होत असत.परंतु आता या परीक्षा इंग्रजी आणि हिंदीमध्ये होतील हे खरे आहे काय? तिसरा प्रश्न असा की, सी.बी.एस.सी. आणि आय.सी.एस.सी.शाळा आणि आपल्या एस.एस.सी.बोर्डाच्या शाळेतील मुले जेव्हा अकरावी मध्ये जातील त्यावेळी या नवीन अभ्यासक्रमामुळे एस.एस.सी.च्या विद्यार्थ्यांवर काही ताण पडणार आहे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

काय?अशा प्रकारे सिलॅबसमध्ये त्रुटी आहेत असे मला कळलेले आहे.कॉब्सेने जे सिलॅबस दिलेले आहे, ते एस.एस.सी.चे विद्यार्थी कों-अप करु शकणार नाहीत ही गोष्ट खरी आहे काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सीबीएससी चा अभ्यासक्रम समान केला आहे अशातला विषय नाही. कॉब्सेचा जो अभ्यासक्रम ठरविण्यात आलेला आहे तो राज्य शासनाने मान्य केलेला आहे आणि त्याची पुस्तकेही उपलब्ध झालेली असून येत्या जून महिन्यामध्ये ती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहेत. त्यामुळे या वर्षभरामध्ये त्याचा अभ्यास पूर्ण करण्यात येईल. त्या अनुषंगाने सांगावयाचे तर आय.आय.टी.सारख्या महत्वाच्या कॉम्पीटिटीव्ह परीक्षांच्या बाबतीत महाराष्ट्रातील विद्यार्थी, येथील मराठी टक्का कमी होऊ नये या दृष्टीकोनातून सुध्दा याबाबत निर्णय घेणे उचित आहे असे राज्य शासनाला वाटले. म्हणून याठिकाणी या सर्व प्रस्तावाचा स्वीकार केलेला आहे. तसेच सीबीएससी अभ्यासक्रम हा सर्वदूर समान ठेवणार नाही तर आपण कॉब्सेला महत्व दिलेले आहे. त्यामुळे सीबीएससीचाच अभ्यासक्रम आल्याशिवाय आपल्याला देशामधील परीक्षेला बसता येणार नाही असे काही असणार नाही. कॉब्सेच्या संदर्भात जो काही अभ्यासक्रम ठरविण्यात आलेला आहे तो आता बोर्ड स्वीकारणार आहे आणि बोर्डाचे म्हणजे एच.एस.सी.चे विद्यार्थी सुध्दा या वरच्या स्तरावरील कॉम्पिटेटीव्ह परीक्षेला सहजपणे पास होऊ शकतील असा मला विश्वास आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा महाराष्ट्रातील मुलांच्या शिक्षणाबाबतचा प्रश्न आहे.सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी दोन प्रश्न विचारलेले आहेत, मात्र त्याची उत्तरे आलेली नाहीत. एकतर हिंदी आणि इंग्रजीमध्ये परीक्षा होणार आहे. अशा वेळी मराठीमध्ये सुध्दा परीक्षा ठेवण्याच्या बाबतीत आग्रह धरण्याची आवश्यकता आहे. तसेच माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले की, बोर्डाने अजूनही तो अभ्यासक्रम स्वीकारलेला नाही. बोर्डाने हा अभ्यासक्रम अंतर्भूत करुन नववी-दहावी एक स्टेप आणि दुसरी स्टेप अकरावी-बारावी या दोन स्तरावर आपले विद्यार्थी पुरेसे ठरु शकतात यादृष्टीने अभ्यासक्रमामध्ये बदल घडवून आणणे आवश्यक आहे.तसेच अभ्यासक्रमाच्या बाबतीत सांगावयाचे तर सीबीएसई आणि आयसीएससी शाळांच्या तुलनेमध्ये आपली मुले अनेक कारणांमुळे थोडी मागे पडतात. याचे मुख्य कारण म्हणजे नववी-दहावी आणि अकरावी-बारावीला आता दोन वर्षामध्ये आपण बरोबरीला येऊ.परंतु पुढच्या वर्षी जरी सुरवात होणार असली तरी त्या दृष्टीने नववी, दहावी व अकरावी, बारावी या दोन्ही स्तरावर या गोष्टींचा अंतर्भाव आपल्या

. . . .2 झेड-3



APR/ 15:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील . . ..

अभ्यासक्रमामध्ये करण्याची आवश्यकता आहे. याबाबतीत आपण राज्य शासन म्हणून कोणती भूमिका घेणार आहात हा प्रश्न आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हा सीईटीला पर्याय आहे. मराठी भाषेतून परीक्षा व्हावी ही मागणी अत्यंत रास्त आहे. तेव्हा राज्य शासनामार्फत रिजनल लॅंग्वेजमध्येच परीक्षा घेण्यात यावी असा आग्रह धरण्यात येईल.

सभापती महोदय, या ठिकाणी इयत्ता नववी व दहावीचा उल्लेख करण्यात आला. आता कॉब्सेचा अभ्यासक्रम नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना जड जाईल काय असे विचारण्यात आले. त्या संदर्भात सांगू इच्छितो की, शालेय शिक्षण विभागाच्या अनुषंगाने खालच्या स्तरावर योग्य तो बदल होणे अपेक्षित आहे आणि तसा बदल करण्याचा प्रयत्न शालेय शिक्षण विभाग करीत आहे.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांना वेतनेतर अनुदान व इमारत भाडे न मिळणे

**मु.शी.** : राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांना वेतनेतर अनुदान व इमारत भाडे न मिळणे या संबंधी सर्वश्री भगवान साळुंखे, रामनाथ मोते, नागो पुंडलिक गाणार, चंद्रकांत पाटील, डॉ.रणजित पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सन 2004-05 पासून आजपावेतो राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांना वेतनेत्तर अनुदाने व इमारत भाडे दिलेले नसणे, तसेच राज्यातील अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांना सन 2000-2001 पासून वेतनेत्तर अनुदान नसणे, त्यामुळे राज्यातील शाळांमध्ये खडू, फळा, नकाशे, प्रयोगशाळा साहित्य, क्रीडा साहित्य, ग्रंथालय, कार्यानुभव साहित्य, इमारतीची डागडुजी, वीज बिले, फोन बिले, पाणीपट्टी, शैक्षणिक साहित्य, फर्निचर इत्यादी साहित्यांची खरेदी, दुरुस्ती, रंगरंगोटीसाठी आर्थिक तरतूद नसणे, त्याचा अध्यापनावर व अध्ययनावर अनिष्ट परिणाम होणे, पर्यायाने मराठी माध्यमाच्या ग्रामीण, निमशहरी व शहरी भागातील शाळांची शैक्षणिक गुणवत्ता ढासळणे,त्यातून आर्थिक दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागणे, परिणामी सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक यांच्यामध्ये शासनाविषयी पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील...

**उप सभापती** : ही लक्षवेधी सूचना शिक्षकांशी संबंधित असल्यामुळे अन्य सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारण्यासाठी हात वर करु नयेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज सकाळी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी घटनात्मक मुद्दा मांडला होता की, "डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटना बनविली त्यावेळी शिक्षक मतदारसंघ निर्माण केला. त्यांचे असे मत होते की, शिक्षक मतदार संघातून विधानपरिषदेवर एक चांगले विद्वत्तापूर्ण व्यक्तीमत्व जावे." पण मी त्या बाबत सांगू इच्छितो की, घटनेमध्ये शिक्षकांना निवडून द्यावे असे म्हटलेले नाही, चांगले व्यक्तीमत्व निवडून जावे असे म्हटलेले आहे. परंतु शिक्षक मतदार संघातून फक्त शिक्षकच विधान परिषदेवर निवडून येतात असा माझ्या समोर प्रश्न आहे. तेव्हा ही घटनेची अवहेलना नाही काय ? आपण म्हणालात की, शिक्षकांचा प्रश्न असल्यामुळे त्याच्यामध्ये हस्तक्षेप करु नका. आपले म्हणणे बरोबर नाही असा माझा मुद्दा आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील अनुदानित संस्थांना वेतनेत्तर अनुदान मिळण्या संबंधीचा हा प्रश्न आहे. मागील सात-आठ वर्षापासून अनुदान मिळणे बंद झालेले असल्यामुळे संस्थाचालकांची फार वाईट अवस्था झालेली आहे. माननीय मंत्री महोदय त्यांचा स्वत:चा अनुभव लक्षात घेता आणि आज सकाळ पासून त्यांच्याकडून जी उत्तरे येत आहेत ती पाहता या प्रश्नाचे उत्तर देखील नकारात्मक असेल हे मला माहीत आहे. परंतु हा महत्वाचा विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या सुध्दा शाळा आहेत. त्यांच्या शाळा देखील अडचणीत आहेत. संस्थाचालकांना वेतनेत्तर अनुदान देण्या संदर्भात या सभागृहात अनेकवेळा चर्चा झालेली आहे. दिनांक 15 मार्च रोजी सभागृहात चर्चा झाली त्यावेळी हा प्रश्न विचाराधीन असून तो मंत्रिमंडळापुढे नेण्यात येईल असे सांगण्यात आले. दिनांक 4 ऑगस्ट रोजी माननीय सभापतींच्या दालनात माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री आणि शिक्षक प्रतिनिधी यांच्या सोबत बैठक झाली. त्या बैठकीमध्ये शिक्षक सेवकांचे मानधन आणि वेतनेत्तर अनुदान हे दोन्ही प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत असे सांगण्यात आले होते. या संदर्भात नेमलेल्या समितीचा अहवाल आलेला आहे. त्या बाबत आपली चर्चा झालेली आहे. वेतनेतर अनुदान देण्याचे आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

मान्य केलेले आहे. तेव्हा हे वेतनेतर अनुदान दोन टक्के, चार टक्के, पाच टक्के, दहा टक्के देण्याच्या बाबतीत शासन स्तरावर किती दिवसांत सकारात्मक निर्णय होणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या संदर्भात दिनांक 22.1.2008 रोजी मंत्रिमंडळाची उप समिती गठीत करण्यात आली होती. त्या समितीने आपला अहवाल सादर केलेला आहे. हा अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे आणि त्यास खूप दिवस झालेले आहेत हे मला मान्य आहे.

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ...

विभागाकडून या बाबतीत पाठपुरावा होत आहे. शासनाची अशी धारणा आहे की, हे लवकरात लवकर व्हावे. हे लवकरात लवकर होणार आहे. हे आता शेवटच्या टप्प्यावर आलेले आहे आणि धोरणात्मक निर्णय लवकरच होणे अपेक्षित आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : हे 12 टक्के, 4 टक्के की 6 टक्के होणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, कशाचे टक्के हे सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, 12 टक्के वेतनेतर अनुदान देण्याचा कायदा आहे. ही बाब माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आली पाहिजे. टक्के फक्त मंत्रिमंडळात चालतात, बाकी ठिकाणी नाही.

श्री. रमेश शेंडगे : सन्माननीय सदस्यांनी अशा पध्दतीने आरोप करणे बरोबर नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : यामध्ये आपला कोठे संबंध येतो ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांना सर्व मंत्र्यांचे वकीलपत्र दिले आहे का ? सन्माननीय सदस्य काहीही बोलले की ते उभे राहतात.

श्री. रमेश शेंडगे : सन्माननीय सदस्यांनी अशा पध्दतीने आरोप करणे बरोबर नाही.

श्री. दिवाकर रावते : त्या बाबत माननीय मंत्री महोदय उत्तर देतील. आरोपाला उत्तर देण्यास मंत्री महोदय समर्थ नाहीत, असे आपल्याला वाटते का ? आपल्या राज्यामध्ये एवढे कमकुवत मंत्री कसे काय आहेत की तुम्हाला त्यांचे वकीलपत्र घ्यावे लागते. कोणाचेही नाव घेतले की सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे उभे राहतात. माननीय उप सभापतींच्या बाबतीत का उभे राहत नाहीत ? कारण ते तुमच्या पक्षाचे आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, शाळेच्या एकूण पगाराच्या 12 टक्के वेतनेतर अनुदान देण्यात येत होते. ते धोरण शासनाने बदलले आहे का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मंत्रिमंडळाच्या उपसमितीने जो प्रस्ताव केलेला आहे त्याप्रमाणे त्यांनी 5 टक्के प्रस्तावित केले आहे. त्यातील 4 टक्के वेतनेतर अनुदान आणि 1 टक्का इमारत भाडे असे आहे.

...2...



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, वेतनेतर अनुदान अधिवेशन संपण्यापूर्वी शासन जाहीर करणार का ? जर शासन ते जाहीर करणार नसेल तर त्या संस्था चालविण्यासाठी त्यांना विभिन्न शुल्क वाढविण्याची परवानगी शासन देणार का जेणेकरुन वेतनेतर अनुदानाचा खर्च संस्था भागवू शकतील ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब अंतिम टप्प्यात आलेली आहे आणि तो निर्णय लवकरात लवकर घेण्यात येईल.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ. शी.** : बालगृहातून बाहेर पडलेल्या मुलांसाठी विभागीय स्तरावर अनुरक्षणगृहांची उभारणी करण्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे

**मु. शी.** : बालगृहातून बाहेर पडलेल्या मुलांसाठी विभागीय स्तरावर अनुरक्षणगृहांची उभारणी करण्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले, रमेश शेंडगे, ॲड. उषा दराडे, सर्वश्री विक्रम काळे, किरण पावसकर, जयवंतराव जाधव, सतीश चव्हाण, अनिल भोसले, विनोद तावडे, श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात मुंबईत 2, ठाण्यात 1 आणि नागपूर येथे 1 अशी चार बालगृहे उभारण्यात येणे, सदर बालगृहातून दरवर्षी सुमारे 15 हजार मुले 18 वर्षे पूर्ण होऊन बाहेर पडतात, सदर मुले बाहेर पडल्यानंतर ती स्वत:च्या पायावर उभी राहवीत म्हणून त्यांना व्यावसायिक शिक्षण दिले जावे असे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक 18 जून, 2000 रोजी देताना त्याचेकरीता पुणे, औरंगाबाद, नाशिक आणि अमरावती अशी विभागीय स्तरावर अनुरक्षणगृहाची उभारणी करण्याचे दिलेले निदेश, अद्याप मा.उच्च न्यायालयाच्या निदेशाची अंमलबजावणी न झाल्याने बालगृहातून बाहेर पडणाऱ्या मुलांवर ओढवलेले बेकारीचे संकट, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

प्रा. फौजिया खान ( महिला व बालविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अतिशय महत्वाची आहे. आपल्या राज्यामध्ये 33 शासकीय बालगृहे आहेत आणि 1077 स्वयंसेवी बालगृहे आहेत. दोन्ही बालगृहांमध्ये मिळून जवळजवळ 91 हजार 622 मुले आहेत असे निवेदनामध्ये म्हटले आहे. या 91 हजार 622 मुलांपैकी वयाची 18 वर्षे पूर्ण झाल्यानंतर दरवर्षी जवळजवळ 15 हजार मुले बाहेर पडतात. ज्यावेळी 15 हजार मुले बाहेर पडतात त्यावेळी त्या मुलांच्या बाबतीत, त्यांच्या पुढील आयुष्याच्या बाबतीत पुढे जी अनुरक्षणगृहे असावयास पाहिजेत त्याची क्षमता फक्त 250 मुलांची आहे. या 15 हजार मुलांच्या आयुष्यामध्ये अतिशय महत्वाचा प्रश्न असा येतो की, पुढे जाऊन आपण काय करावयाचे ? महाराष्ट्र शासनाने त्यांच्या बाबतीत काय नियोजन केले आहे ? 250 मुले एका बाजूला आणि 15 हजार मुले दुसऱ्या बाजूला अशी परिस्थिती आहे. माननीय मंत्री महोदया सांगतील की, आमचे महिला व बालविकास खाते आहे आणि 18 वर्षाच्या वरील मुले युवक कल्याण खात्याकडे जातात. हा प्रश्न आपण सोडवून 18 वर्षावरील मुलांसाठी अनुरक्षणगृहाची जी क्षमता आहे ती शासन वाढविणार का ? सगळी मुले आपल्या नातेवाईकांकडे जात नाहीत तसेच काही मुलांना नातेवाईक नसतात, ती अनाथ असतात, निराधार असतात, त्यामुळे या अनुरक्षणगृहामध्ये जेवढ्या मुलांना प्रवेश पाहिजे आहे त्या सर्व मुलांची राहण्याची आणि त्यांना पुढचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था शासन करणार का ?

निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे. 2000 सालापासून या राज्यामध्ये अशा समितीच्या किती बैठका झाल्या आणि शासनाने किती मुलांचे पुनर्वसन केले, हे माननीय मंत्री महोदया सांगतील का ?

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. विनायक मेटे )**

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

सन 2020 या वर्षात भारत हा देश जगामध्ये तरुणांचा देश म्हणून गणला जाणार आहे. या तरुणांना दिशाहीन करुन ठेवले तर ते गुन्हेगारी प्रवृत्तीकडे जातील, हे टाळण्यासाठी शासन कोणती भूमिका घेत आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाच्या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधलेले आहे. हे खरे आहे की, 18 वर्षे बालगृहात राहिल्यानंतर त्या मुलांचे पुनर्वसन होणे आवश्यक असते. त्यांच्यासाठी अनुरक्षणगृहांची आवश्यकता आहे. राज्यामध्ये सध्या 4 अनुरक्षणगृहे अस्तित्वात आहेत. ही चार अनुरक्षणगृहे पूर्ण क्षमतेने भरलेली नाहीत.

सभापती महोदय, या निवेदनामध्ये दुरुस्ती करण्याचे राहून गेले. बालगृहातील उपस्थितीची संख्या 93 नसून 57 आहे. या चारही संस्थांमध्ये पुरेसे विद्यार्थी नाहीत. त्यामुळे यावर लक्ष देणे आवश्यक आहे. शासनाने पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती या पाच विभागीय स्तरावर 5 नवीन अनुरक्षणगृहे सुरु करण्याचा निर्णय घेतला असून ती लवकरच सुरु होतील. त्याबाबतचा जी.आर. आजच निर्गमित केला जाणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी अतिशय चांगला विषय लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित केलेला आहे. हा टीका करण्याचा विषय नाही. ही बेवारस मुले आहेत, त्यांना कोणीही वारस नाही. जे गुन्हेगार असतात ते घराबाहेर पडलेले असतात, त्यांचे आई-वडील असतात. बाल वयात गुन्हा केल्यामुळे त्यांना बाल सुधारगृहामध्ये ठेवले जाते. परंतु बाकीची बेवारस मुले आहेत. ही मुले 18 वर्षानंतर आपल्या घरी जातात असे निवेदनात म्हटलेले आहे. ही बेवारस मुले कोठे जातात ? दर 3 महिन्यांनी आढावा घेतला जातो, असे म्हटले आहे म्हणजे काय केले जाते ? शासकीय प्रवेशित संख्या 3,425 इतकी आहे आणि एकूण 88,194 इतकी प्रवेशित मान्य संख्या आहे. या संख्यांमध्ये खूप फरक आहे. 3 महिन्यांनी पुनर्वसन समिती आढावा घेते. ही मुले कोठे गेली, त्यांचा राहण्याचा पत्ता काय आहे, त्यांना पालक आहेत काय, त्यांना पालक असतील तर त्यांना बेवारस कसे म्हणता येईल ? अशा अनेक विसंगती या उत्तरात दिसून येतात. या सर्व मुलांना शासनाने पायावर उभे करण्याचे ठरविलेले आहे. शासनाने

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

किती मुलांना स्वत:च्या पायावर उभे केलेले आहे, कशा पध्दतीने उभे केले आहे ? आरक्षणाचा लाभ घेऊन या मुलांनी बारावीपर्यंत शिक्षण घेतले तर, त्यांना नोकरी मिळण्यासाठी शासनाने कोणती उपायोजना केली आहे त्याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा केला पाहिजे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा ग्रे एरिया आहे. त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. महिला व बाल विकास विभागाच्या आयुक्तांनी लक्ष देण्यास सुरुवात केलेली आहे. त्यामुळे 5 नवीन अनुरक्षणगृहे सुरु करीत आहोत. कौशल्य विकास कार्यक्रम राज्यात सुरु करीत आहोत. ॲप्रेंटिसशिप ॲक्ट या कायद्यामुळे या मुलांना उच्च शिक्षण विभागाच्या माध्यमातून फायदा मिळत आहे. त्यामध्ये या मुलांना सुध्दा समाविष्ट करीत आहोत. इग्नो, एमसीईटी अशा प्रकारच्या प्रशिक्षण संस्था आहेत त्यांची संपूर्ण कोर्स फी शासन भरणार आहे. तसेच कौन्सिलिंग, पुनर्वसन आहे हे सर्व रिसोर्स मोबिलायझेशनचे काम राज्य शासनाच्या कार्यक्रमाद्वारे करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. त्याशिवाय इंटिग्रेटेड चाईल्ड प्रोटेक्शन स्किम अंतर्गत आफ्टर केअर फंड नावाची योजना केंद्र शासनाने प्रस्तावित केलेली आहे. त्या योजनेद्वारे प्रत्येक मुलामागे 2 हजार रुपये खर्च केला जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात पुनर्वसनाच्या कामासाठी 2 लाख रुपये खर्च केले जाणार आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्वसन समिती गठित केलेली आहे..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांना माझी विनंती आहे, या सदनामध्ये महिलांचा विषय आल्यानंतर या सदनातील महिला सदस्यांची एक समिती गठित करण्यात आली होती. त्या समितीने आपला अहवाल सभागृहाला सादर केला होता. आम्हाला शासनाला मदत करावयाची आहे. कारण हा गंभीर विषय आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

या प्रश्नाच्या बाबतीत सदनाची एक कमिटी नेमावी आणि त्या कमिटीच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करावी जेणेकरुन ती मुले आपल्या पायावर उभी राहू शकतील. हा विषय अतिशय गंभीर असून या बेवारस मुलांचा प्रश्न वाढत जाणारा आहे. हजारोंच्या संख्येने मुले बालगृहातून बाहेर पडत आहेत. तेव्हा माननीय मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली आमदारांची एक समिती नेमावी आणि समितीच्या शिफारशी नुसार शासनाने पावले उचलावीत अशी माझी सूचना आहे. या ठिकाणी अधिकारी जे काही लिहून देतात त्या प्रमाणे माननीय मंत्री महोदय उत्तर देतात. अधिकारी काही चुकीचे करतात असे मी म्हणत नाही. कारण उपलब्धी नुसार ते काम करतात. समितीच्या माध्यमातून अहवाल सदनापुढे येऊन उपेक्षित लोकांना न्याय मिळण्यासाठी या सदनाचा उपयोग झाला तर फार बरे होईल. तेव्हा हा एक मार्ग शासनाला काढता येईल.

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना फार चांगली आहे. त्यांच्या सूचनेचा विचार करुन त्याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

डॉ. नीलम गो-हे : बालसुधार गृहातील मुलांच्या संदर्भात मी अनेक वर्षे काम केलेले आहे. चेंबूर येथे अनुरक्षण गृह आहे. त्या ठिकाणी 100-100 मुले आहेत. त्या मुलांचे पुढे काय होते याकडेही बघितले गेले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आमदारांची समिती नेमण्याची सूचना केली. या बालसुधारगृहामध्ये प्रशिक्षित समाजकल्याण सल्लागाराची पदे होती. महिला व बालकल्याण विभागामधील ही पदे नंतर तुरुंग आणि पुनर्वसन विभागाकडे वर्ग करण्यात आली. जेव्हा या संदर्भात साक्ष घेण्यात आली होती त्यावेळी गृह विभागाच्या अधिका-यांनी सांगितले की, हे जे प्रशिक्षित सल्लागार आहेत ते आता पोलीस स्टेशनमध्ये बसतात. या पदांच्या बाबतीत महिला व बालविकास मंत्र्यांनी माहिती घ्यावी.

माझा प्रश्न असा आहे की, सन 1990 ते 2000 पर्यन्त अशा प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्त्यांची किती पदे होती, ही पदे गृह विभागाकडे का वर्ग करण्यात आली ? या मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी एमएसडब्ल्यू झालेल्या प्रशिक्षित लोकांची आवश्यकता आहे. तेव्हा ही पदे पुन्हा नव्याने तयार करण्यात येतील काय जेणेकरुन या मुलांच्या भवितव्यासंबंधीचे प्रश्न सुटू शकतील ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, अशा अनुरक्षणगृहांच्या जागेवर आसपासच्या शिक्षण संस्था अतिक्रमण करीत असतात. उदा. चेंबूर येथील अनुरक्षणगृहाच्या जागेवर शेजारच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

परप्रांतीयांच्या संस्थेने अतिक्रमण केलेले आहे. अशा प्रकारामुळे सुधारगृहांची आणि अनुरक्षणगृहांची संख्या कमी कमी झालेली आहे. तेव्हा या सुधारगृहांच्या आणि अनुरक्षणगृहांच्या जागेचे रक्षण करण्याकरिता शासन कोणती पावले उचलणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबतीत शासन आणखी माहिती घेईल आणि त्यानुसार पुढे विचार करण्यात येईल. तसेच चेंबूर येथील सुधारगृहाच्या बाबतीत जो उल्लेख करण्यात आला त्याही बाबतीत माहिती घेण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : हा अतिशय महत्वाचा विषय आहे. ज्यांना कुणाचा आधार नाही अशी 18 वर्षावरील मुले-मुली सुधारगृहातून बाहेर पडताना शासनाने त्यांच्या शिक्षणाची, नोकरीची व्यवस्था केली पाहिजे, मुलींच्या लग्नाची व्यवस्था केली पाहिजे अशा अटी आहेत. परंतु त्याप्रमाणे काही होत नाही. या मुलांनी पुढे काय करावे याबाबतीत त्यांना कोणतेही मार्गदर्शन होत नाही. सुधारगृहातून बाहेर पडणा-या मुलांना अनुरक्षण गृहामध्ये ठेवावे असे उच्च न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत. तेव्हा सुधारगृहातून बाहेर पडणा-या मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी, त्यांनी स्वत:च्या पायावर उभे रहावे यासाठी शासनाने कोणती योजना आखलेली आहे ? आतापर्यन्त सुधारगृहातून अशी किती मुले बाहेर पडली आणि त्यांची पुढे काय व्यवस्था करण्यात आली ?

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-5.......

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी अगोदर कौशल्य विकास कार्यक्रमाच्या नावाने स्कीम सांगत होते. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी त्यांची सूचना केली. ही योजना प्रस्तावित आहे. त्या माध्यमातून जास्तीत जास्त मुलांना कव्हर केले जाणार आहे. लवकरच ही योजना आपल्यासमोर येईल. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीचे काम आहे त्याबद्दल सुध्दा आढावा घेण्याची आवश्यकता आहे आणि तो आढावा घेण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आढावा घेण्यात यावा. आज जिल्हाधिकाऱ्यांकडे त्या मुलांची यादी सुध्दा उपलब्ध नाही. त्यामुळे अनाथ मुलांना 18 वर्षे पूर्ण होईपर्यंत बालगृहात ठेवायचे आणि नंतर सोडून द्यायचे का?

प्रा.फौजिया खान : पूर्ण विचार करुन व आढावा घेऊन ताबडतोब जे काही करता येईल, जे काही करणार ते मी सांगितले आहे. सभागृहाने जे काही सुचविले आहे त्याचा पण स्वीकार करु. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी समितीचा प्रस्ताव सुचविला आहे. त्या संदर्भात विचार झाल्यावर हे सगळे प्रश्न मिटतील.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी./मु. शी.** : राज्यातील विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढल्यामुळे न्यायदानात येणाऱ्या अडचणी याबाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

महाराष्ट्रातील विविध न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची संख्या गेल्या दीड वर्षात 44 लाखावरुन 35 लाखावर येणे, न्याय व्यवस्थेसाठी पर्याप्त पायाभूत सुविधा नसल्याने न्यायदानात येणाऱ्या अडचणी व पर्यायाने होणारा विलंब ही भारताच्या सर न्यायाधीशांसाठी चिंतेची बाब असणे, आजही न्यायासाठीची प्रतिक्षा निराश करणारी असून न्यायालयात गेल्यावर आपल्या प्रकरणाचा केव्हा निकाल लागेल व अन्याय प्रत्यक्षात केव्हा दूर होईल यासाठी पक्षकाराच्या मनात निर्माण झालेले संभ्रम, न्यायालयासमोर येणारे काही (अन्यायी) पक्षकार व त्याला तो अन्याय सुरु ठेवण्यासाठी मदत करणारे काही थोडे अपवादात्मक विधी व्यावसायिक या दोघांनाही भूमिकेत बदल करण्याची गरज, त्यासाठी सूज्ञ विधिज्ञांनी अशा प्रवृत्तीना व व्यक्तींना बदलण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता हा विषय मी विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मुंबईतील महर्षी दयानंद महाविद्यालयातील एकांकिका स्पर्धेतील नाटकामध्ये वारकऱ्यांची केलेली बदनामी याबाबत श्रीमती शोभा फडणवीस,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

मुंबई येथील महर्षी दयानंद महाविद्यालयाच्या श्री.अभिजित खांडये दिग्दर्शित आणि श्री.अंबर हडप लिखित "थरारली वीट" या एकांकिकेत पंढरीच्या वारीत वेश्या व्यवसाय चालतो असे दाखवून वारकऱ्यांना बदनाम करण्याचे संबंधित नाटकाद्वारे दाखविण्यात येणे, त्यामुळे जगभरातील हिंदूच्या धार्मिक भावना दुखावल्या जाणे, सदर नाटकामुळे महाराष्ट्राची परंपरा बदनाम होत असणे, महाविद्यालयाने या एकांकिकेचे प्रयोग कायमस्वरुपी बंद करण्यात यावे अशी हिंदू जनजागृती समिती व वारकरी सेना यांनी केलेली मागणी, वारकऱ्यांची मने दुखावण्याचे व त्यांना बदनाम करण्याच्या प्रकारावर शासनाने त्वरित आळा घालण्याची आवश्यकता, त्यातच नाटक सेन्सॉर बोर्डावर बरेच वर्षापासून एकच अध्यक्ष कार्यरत असणे, त्यामुळे नाटक सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष बदलण्याची आवश्यकता, शासनाने यावर करावयाची कारवाईकडे मी विशेष उल्लेखाद्वारे लक्ष वेधू इच्छिते.

--

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी ठाणे उप विभागासाठी केलेल्या साहित्य खरेदीतील भ्रष्टाचार याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी सन 2009-2010 या आर्थिक वर्षात आपल्या अधिपत्याखाली असलेल्या उप विभागांना त्यांच्या मागणीनुसार साहित्य पुरवठा करण्यासाठी रक्कम रु.61,21,586 इतकी मंजूर करण्यात आली आहे. यामधून वसई, पालघर, भिवंडी या उप विभागांकरिता चूना, गेरु, पावसाळी साहित्य व वसई उप विभागाकरिता विश्रामगृहाचे किचन व डायनिंग हॉलसाठी साहित्य खरेदी करण्यात आलेली आहे.

त्यामुळे पावसाळा संपल्यानंतर सदरचे साहित्य कोठे वापरले याची नोंद नाही. जुन्या साहित्याचे काय केले हे आढळून येत नाही. बहुतांशी साहित्याचे दर जिल्हा दर सूचीवर आधारित नसताना खुल्या बाजारातून दरपत्रक मागवून दर निश्चित करुन निविदा मागविणे आवश्यक होते.

गैरव्यवहाराबाबत मुख्य अभियंता, ठाणे विभाग यांच्याकडे हिंदूराव रमेश यशवंत, मु.न्हावे, पो.सासणे, ता.मुरबाड व कॉ.रमेश गोविंद गायकवाड, मु.पो.साळगाव, ता.मुरबाड यांनी केलेल्या तक्रारीवरुन चौकशी केल्यावर मुख्य अभियंता यांनी तक्रारीत प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे मत व्यक्त केले आहे. मात्र याबाबत कोणतीच कारवाई न करता दोषींना अभय देण्यात आले. सबब या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा शासन करीत आहे याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : भटक्या व विमुक्त जातीसाठी निकष ठरवून स्वतंत्र हेड निर्माण करण्याची आवश्यकता याबाबत ॲड.उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

वसंतराव नाईक महामंडळाचे कर्ज माफ करण्याची घोषणा करणे, या महामंडळास नाममात्र निधी घोषित करणे, देताना मात्र मंडल आयोगाच्या अहवाल अंमलबजावणीपासून 45 कोटी रुपये शासन महामंडळास देणार, त्या निधीतून कापून घेण्याचा घेण्यात आलेला अन्यायकारक निर्णय, कर्जाचे माफ करावयाचे कर्ज शासनाने स्वतःच्या निधीतून देण्याची आवश्यकता, भटक्या विमुक्तांना स्वतंत्र बजेट देण्याची आवश्यकता, शासनाने बजेटमध्ये भटक्या विमुक्तांसाठी जातीचा निकष ठरवून वेगळा हेड देण्याची आवश्यकता, वसंतराव नाईक महामंडळास लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदान देण्याची आवश्यकता, त्याबाबत शासनाने उपाययोजना करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

---

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले...... 15:30

**अर्धा तास चर्चेच्या सूचना**

**पृ.शी.**: चंद्रपूर व गडचिरोलीतील आदिवासींना अद्यापही वन जमिनीचे पट्टे न मिळणे

**मु.शी.**: चंद्रपूर व गडचिरोलीतील आदिवासींना अद्यापही वन जमिनीचे पट्टे न मिळणे यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :--

"चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील वन जमिनीवर 25 ते 30 वर्षापासून शेतकरी अतिक्रमण करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील अतिक्रमण धारकांचे वन हक्क कायद्याप्रमाणे वन हक्क समितीने दावे दाखल केल्यामुळे शेतकरी पट्टे मिळण्यापासून वंचित असणे, जिल्ह्यात अतिक्रमण धारक पात्र असूनही त्यांना अद्यापही पट्टे न मिळणे त्यामुळे सदर वनजमिनीवरील अतिक्रमण धारकांना पट्टे देण्याची अंत्यत आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महोदय, ज्यांनी वन जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे त्यांना पट्टे द्यावेत असा कायदा 15 सप्टेंबर, 2000 मध्ये शासनाने केला. त्यानंतर जवळपास 12 वर्षे होऊन गेली तरी देखील पाहिजे त्या प्रमाणात हे आदिवासींचे पट्टे शासनाने दिले नाहीत. त्यात पहिली अट 25-25-25 अशा तीन पिढ्यांची अट टाकली असून 75 वर्षापूर्वीचा दाखला अतिक्रमण धारकांनी सादर करावा अशी आहे. शासनाने ही अट आदिवासींच्या बाबतीत "शेजारी शेतकरी असेल किंवा गावातील 75 वर्षाची व्यक्ती असेल आणि त्याने सांगितले की, ही व्यक्ती याच गावात राहत असून मी त्यांना ओळखतो" अशी अट घालून शिथिल केलेली आहे. परंतु बाकीच्या लोकांसाठी ही अटच लागू केलेली नाही. ज्या ठिकाणी वन जमिनीवर अतिक्रमण केले आहे त्या ठिकाणी वन खात्यात वन ग्राम म्हणून गांवे होती. ब्रिटीशांच्या काळात ही गांवे म्हणजे मजुरांच्या वस्त्या होत्या त्यालाच वन ग्राम म्हणून संबोधले जात होते. त्यानंतर सन 1971 च्या काळात या गावांना महसूल ग्राम म्हणून ठरवले गेले. अशा प्रकारे सन 1971 चा जरी विचार केला तरी त्या दिवसापासून या लोकांची नोंद रहिवासी म्हणून होऊ शकते. त्याचबरोबर त्या भागात ग्राम पंचायती नसल्यामुळे दाखले सुध्दा नव्हते. जंगलात

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस ........

राहणाऱ्या लोकांना आपल्या मुलांची नांवे नोंदविणे एवढी समजही नव्हती, त्यामुळे रहिवासाचा दाखला किंवा 75 वर्षापूर्वीचा दाखला मिळणे कठीण होऊन बसले आहे. म्हणून केवळ आदिवासीच नव्हे तर वन ग्राम मध्ये जे लोक नव्हते त्यांना वन ग्रामच्या बाबतीत जो न्याय शासनाने दिला तोच न्याय या अतिक्रमण धारक लोकांनाही दिला पाहिजे अशी मी विनंती करते. ज्याप्रमाणे शासनाने आदिवासींच्या बाबतीत एक अट शासन शिथिल केली त्याप्रमाणे या लोकांच्या बाबतीत जर शासन ही अट शिथिल करु शकले तर या लोकांना न्याय मिळेल. कारण 75 वर्षांचा दाखला आणणे ही सोपी गोष्ट नाही म्हणून या अतिक्रमण धारकांना ही सवलत द्यावी अशी माझी मागणी आहे.

विशेष म्हणजे आपण ग्राम पंचायतीच्या पातळीवर वन हक्क समिती स्थापन केली व त्या समितीचे सर्व काम आदिवासी विकास विभागाने पहावे असा निर्णय घेतला व पट्टे देण्याचे काम जिल्हाधिकाऱ्यांनी करावे असेही शासनाने ठरविले. आदिवासी विकास विभाग तसे पाहिले तर अशी यादी तयार करण्याचे किंवा त्या लोकांची नांवे नोंदविण्यापर्यंत अथवा अर्ज स्वीकारण्यापर्यंतचे काम करु शकतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

सभापती महोदय, आदिवासी विभाग दाखले तयार करणे, याद्या तयार करणे, नाव नोदविणे किंवा त्यांचे अर्ज स्वीकारण्याचे काम करीत असता. आदिवासी विकास विभाग अर्ज स्वीकारण्याचे काम करीत नाही तर वन ग्राम समिती अर्ज स्वीकारण्याचे काम करीत असते. अटी पूर्ण झाल्या की, नाही हे पाहण्यासाठी ते तहसीलदारांकडे पाठविले जाते. अर्धातास चर्चेला दिलेल्या उत्तरात असे म्हटले आहे की, जीपीएस प्रणालीच्या माध्यमातून वनातील जमिनी मोजण्यात आल्या आहेत. जीपीएस प्रणाली नुसार सर्व वनजमिनी मोजल्या आहेत असे माझे मत नाही. वन विभागाचे पट्टे मिळाले पाहिजे या कारणासाठी तहसीलदारचा प्रतिनिधी म्हणजे पटवारी, वन विभागाचा प्रतिनिधी म्हणून गार्ड तसेच वन हक्क समितीचा अध्यक्ष म्हणून ग्रामपचांयतीचा सचिव या सर्वांनी जाऊन पाहणी करावयाची, अतिक्रमण आहे का ते बघायचे असते व त्या नंतर जीपीएस प्रणाली द्वारे जमिनीचे मोजमाप केले जात असते. परंतु नकाशे कोणी काढावयाचे हा महत्वाचा प्रश्न येतो. आजही मशिनद्वारे अतिक्रमण धारकांच्या जागा तपासल्या गेल्या, नोंद केली गेली परंतु अजुनपर्यंत नकाशे तयार झालेले नाहीत. नकाशे जिल्हाधिकाऱ्यांनी उपलब्ध करुन दिले पाहिजे असे मी त्यांना म्हणाले होते परंतु जिल्हाधिकारी असे म्हणाले की, कायद्यानुसार वन हक्क समितीने नकाशे दिले पाहिजेत. वन हक्क समितीमध्ये आदिवासी असतात त्यामुळे त्यांना यासंदर्भात काहीच समजत नाही. आम्हाला कोणी नकाशे काढून दे म्हटले तर आम्हाला सुध्दा नकाशे काढून देता येणार नाहीत. गावचा प्रमुख हा वन हक्क समितीचा प्रमुख असला तरी त्यांना नकाशे काढता येत नाहीत. त्यामुळे जिल्हाधिका-यांच्या तसेच पटवाऱ्याच्या माध्यमातून नकाशे दिले गेले पाहिजेत.

महसूल व वन खात्याच्या भांडणामुळे आदिवासींना पट्टे मिळत नाही. त्यामुळे वन विभागाच्या लोकांनी तरी आम्हाला नकाशे काढून द्यावेत अशी आम्ही मागणी केली होती. परंतु अजूनपर्यंत आदिवासींच्या पट्टयाचे नकाशे तयार झालेले नाहीत. त्यामुळे मोठया प्रमाणात नकाशाचा प्रश्न अडचणीचा होऊन बसलेला आहे. तहसीलदार कार्यालयामध्ये छोटया छोटया तसेच कारण नसलेल्या त्रुटी काढल्या जातात. काम करावयाचे नाही म्हणून काही तरी त्रुटी काढल्या जातात. वन विभागाने पट्टयाच्या संदर्भात अजूनपर्यंत रिपोर्ट सुध्दा सादर केलेला नाही. वन विभागाच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

अधिकारी कर्मचा-यांच्या मनात आदिवासींना वनाचे पट्टे मिळू नये असेच असते. आदिवासींना हुसकून लावण्यासाठी त्यांची टीमच्या टीम जाते परंतु आदिवासींना न्याय देण्यासाठी व पट्टे देण्यासाठी वन विभागाचे लोक तयार होत नाहीत. आदिवासींना आजही वन विभागाचे सहकार्य, सहभाग मिळत नसल्यामुळे आदिवासींच्या पट्टयांचे प्रश्न मोठया प्रमाणात निर्माण झालेले आहेत. 12 वर्षे उलटून गेली असली तरी शासन आदिवासींना पट्टे देऊ शकले नाही ही दुर्दैवाची बाब आहे.

1978 च्या कायद्यान्वये काही ठिकाणी सर्व्हे होऊन अस्थायी पट्टे दिले गेले होते व हे काम महसूल खात्याने केले होते. परंतु त्यानंतर सन 2005 पर्यंत 1978 च्या पुढील पट्टे दिले गेले नाहीत. त्यामुळे खऱ्या अर्थाने गरीब आदिवासीना पट्टयापासून वंचित ठेवले गेले आहे. त्यामुळे माझी मागणी आहे की, तहसीलदाराने ज्या त्रुटी काढलेल्या असतात त्या त्रुटी सामंजस्याने सोडविल्या पाहिजेत. परंतु तहसीलदार छोटया छोटया त्रुटी असल्या तरी उपविभागीय अधिका-याकडे पाठवितात व उपअधिका-याकडून ते अर्ज जिल्हाधिकाऱ्याकडे जातात व नंतर जिल्हाधिकारी यासंदर्भात चौकशी करतात. त्रुटी पूर्ण झालेल्या असतांना सुध्दा पट्टे देण्याचे काम अजूनपर्यंत सुरु झाले नाही. त्यामुळे जी प्रकरणे त्रुटी काढून पूर्ण झालेली असतील किंवा क्षुल्लक गोष्टींसाठी अडलेली असतील अशी प्रकरणे तातडीने पूर्ण करुन आदिवासींना पट्टे दिले जातील असे आश्वासन आम्हाला शासनाकडून मिळाले आहे. परंतु आश्वासन व कृती यामध्ये प्रचंड फरक असतो. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, मानवतेच्या दृष्टिकोनातून, गरिबांना न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून 15 किंवा एक महिन्याचा कार्यक्रम आखून वन जमिनीचे पट्टे अतिक्रमण धारकांना ताबडतोब मिळतील व आदिवासींना त्यांचे हक्क मिळतील अशा पध्दतीची योजना शासनाने करावी अशी माझी अर्धातास चर्चेच्या माध्यमातून शासनास विनंती आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.राजेंद्र गावित (आदिवासी विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी वन हक्कांच्या बाबतचा प्रश्न आता पर्यंत 2-3 अधिवेशनात उपस्थित केला आहे. या राज्यात अनुसूचित जमाती व इतर पारपंरिक वन निवासी कायद्याची अंमलबजावणी दिनांक 31.12.2006 पासून झाली आहे. परंतु, याची अंमलबजावणी 12 वर्षापासून ज्या प्रमाणात व्हायला पाहिजे होती त्या प्रमाणात झालेली नाही. तरी पण दिनांक 1.1.2008 पासून या कायद्याची योग्यरितीने अंमलबजावणी होण्याकरिता गाव पातळीवर जवळ जवळ 1502 वन हक्क समित्या, उप विभागीय स्तरावर 14 उप विभागीय समित्या व जिल्हा स्तरावर 18 समित्यांची नेमणूक करण्यात आली. या समित्यांवर नियंत्रण असावे म्हणून राज्य स्तरावर राज्य स्तरिय सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली. नोडल एजन्सी म्हणून आदिवासी विकास आयुक्तांची नेमणूक करण्यात आली आहे. वन विभागाच्या व महसूल विभागाच्या समन्वयाच्या अभवामुळे जशी अंमलबजावणी व्हायला पाहिजे होती तशी झालेली नाही हे खरे आहे.

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांमध्ये जिल्हानिहाय अंमलबजावणी झालेली आहे. त्याची अगदी थोडक्यात आकडेवारी मी आपल्याला सांगतो. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये ग्रामसभेचे 21238, गडचिरोली जिल्ह्यामध्ये 61043 प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. ग्रामसभेने चंद्रपूर जिल्ह्यामध्ये अमान्य केलेले दावे 1922 आहेत, तर गडचिरोली मधील 15926 अमान्य दावे आहेत. चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील उप विभागीय स्तरिय समितीकडे प्राप्त झालेल्या दाव्यांची संख्या अनुक्रमे 19316, 44827 आहे, तर उप विभागीय स्तरिय समितीने चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील अमान्य केलेल्या दाव्यांची संख्या अनुक्रमे 15983, 22537 एवढी आहे. चंद्रपूर जिल्हा स्तरिय समितीकडे प्राप्त झालेले दावे 3282 असून गडचिरोली जिल्हा स्तरिय समितीकडे प्राप्त झालेले दावे 21252 इतके आहेत. त्याच प्रमाणे चंद्रपूर जिल्हा स्तरिय समितीने अमान्य केलेल्या दावांची संख्या शून्य आहे आणि गडचिरोली जिल्हा स्तरिय समितीने अमान्य केलेल्या दाव्यांची संख्या 39 आहे. चंद्रपूर जिल्हा स्तरिय समितीने अंतिमत: मान्य केलेल्या दाव्यांची संख्या 3077 आहे. गडचिरोली जिल्हा स्तरिय समितीने अंतिमत: मान्य केलेल्या दाव्यांची संख्या 21298 एवढी आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये वाटप केलेले टायटल 2959 आहे, तर गडचिरोली जिल्ह्यामध्ये वाटप केलेले टायटल 21165 एवढे आहे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र गावित.....

चंद्रपूरमध्ये वाटप केलेल्या टायटलचे एकरा मधील क्षेत्रफळ 7973 एवढे असून, गडचिरोलीमध्ये वाटप केलेल्या टायटलचे एकरा मधील क्षेत्रफळ 4 लाख 3795 एवढे आहे. अशा प्रकारे या दोन्ही जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी झाली आहे.

बिगर आदिवासी आणि आदिवासी या संबंधी माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी प्रश्न विचारला आहे. गैर आदिवासी क्षेत्रातील वास्तव हे 13 डिसेंबर 2000 पूर्वीचे म्हणजे तीन पिढ्यांचे असणे आवश्यक आहे. त्यानुसार गैर आदिवासी दावेदारांचा दाव्यांमध्ये तीन पिढींचा पुरावा जोडलेला नसेल तर त्यांचे दावे नामंजूर करण्यात आलेले असून त्यांना पुढे पट्टे देण्यात आलेले नाहीत. ही अट आदिवासींना लागू नसल्यामुळे या अटी नुसार कोणत्याही आदिवासीचे दावे नामंजूर करण्यात आलेले नाहीत. तीन पिढ्यांचा 25-25-25 वर्षांचा पुरावा देताना अनेक अडचणी येत असल्या तरी आदिवासी आणि गैर आदिवासी असा भेदाभेद करता कामा नये. कारण तेथे आदिवासी बांधव देखील राहतो.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.ओटवणेकर ...... 15:45

श्री.राजेंद्र गावित . . . .

परंतु पिढ्यानपिढ्या त्याठिकाणी बिगर आदिवासी सुध्दा मोठ्या प्रमाणात रहातात. त्याठिकाणी आदिवासींच्या कल्चरबाबतचे, आदिवासींचे आणि बिगर आदिवासींचे सुध्दा प्रश्न आहेत आणि या बाबतीत आदिवासी विकास विभागाची नोडल एजन्सी आहे.त्यांच्याकडून याबाबतचा आढावा घेऊन एक निश्चित सकारात्मक निर्णय शासनाकडून गंभीरतेने घेतला जाईल असे मी सांगू इच्छितो.

----

. . . .3 आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सभागृहाच्या कामकाजातील आक्षेपार्ह भाग वगळण्याबाबत</u>

**उप सभापती** : आज दुपारी झालेल्या कामकाजामध्ये सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे आणि सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांच्यामध्ये जे काही सगळे सुसंवाद झालेले आहेत, त्यातील जो आक्षेपार्ह भाग असेल तो वगळण्यात यावा असे मी सांगितले होते आणि त्याबाबतीत खबरदारी घेण्यात यावी.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आम्ही आपल्या निर्णयाबद्दल आभारी आहोत. पण याबाबत थोडेसे .......

**उप सभापती** : आता याबाबतीत काहीही चर्चा होणार नाही. परत-परत खपली काढू नका. एकदा मी ते सगळे मिटवलेले आहे. त्यामुळे आता सर्व काही शांततेमध्ये होऊ द्यावे. आता अर्धा तास चर्चा घेण्यात येईल.

-----

. . . .3 आय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यामध्ये प्लास्टिक पिशव्यांचा सर्रास व अनियंत्रितपणे होणारा वापर

**मु.शी.** : राज्यामध्ये प्लास्टिक पिशव्यांचा सर्रास व अनियंत्रितपणे होणारा वापर यासंबंधी श्री.जयवंतराव जाधव यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"राज्यामध्ये प्लॅस्टिक पिशव्यांचा सर्रास व अनियंत्रितपणे होणारा वापर, 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचे उत्पादन, साठा व पुरवठा करणे कायद्याने गुन्हा असणे, राज्यातील शहरी भागासह ग्रामीण भाग प्लास्टिकमुक्त करुन पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्यांचे उत्पादन व वापर करणाऱ्यां विरोधात प्रभावीपणे व परिणामकारक रित्या कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, प्लॅस्टिकच्या पिशव्यांमुळे पर्यावरणाचा जो ऱ्हास होत आहे, त्या निमित्ताने मी येथे अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. राज्यात 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पॉलिथीन पिशव्यांच्या वापरावर बंदी घातलेली आहे. परंतु जर राज्यातील वस्तुस्थिती पाहिली तर यासंबंधात कुठेही नियमांचे पालन होत नाही हे दिसून येत आहे. याबरोबरच आपण पाहिले तर असे दिसून येईल की, जे काही मोठमोठे मॉल्स् असतील किंवा इतर ज्या काही गोष्टी असतील त्याठिकाणी फक्त बोर्ड लावला जातो की, याठिकाणी प्लॅस्टीकची बॅग मिळणार नाही किंवा जर बॅग पाहिजे असेल तर त्यासाठी चार्ज घेण्यात येईल. पण याबाबतीत कुठेही निर्बंध घालण्यात आलेला नाही. एखाद्या भाजी बाजारामध्ये गेले किंवा मच्छीमार्केट मध्ये किंवा मटन मार्केटमध्ये गेले तरी तेथे सर्रासपणे प्लॅस्टीकच्या पिशव्यांचा वापर होताना दिसून येतो. याबाबतीत मला माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती करावयाची आहे की, आजकाल प्लॅस्टीकच्या पिशव्यांचा वापर होत असताना दिसून येते, पण त्याची ज्याठिकाणी निर्मिती होत आहे तेथे राज्य शासनाच्या वतीने, पर्यावरण विभागाच्या वतीने धाडी टाकून संबंधितांवर का कारवाई केली जात नाही ? अशा प्रकारे जर आपण त्याठिकाणी कारवाई केली तर पावसाळ्यामध्ये सर्व लोकांना जो त्रास होत असतो किंवा प्लॅस्टीक पिशव्या जाळल्यामुळे देखील निसर्गावर जो काही विपरित परिणाम होतो तो रोखण्यासाठी जर शासनाने प्लॅस्टीकच्या पिशव्यांच्या वापरावर निर्बंध घातले तर ती निश्चित चांगली बाब होईल.



श्री.जयवंतराव जाधव . . . .

सभापती महोदय, दुसरी बाब म्हणजे जी पर्यटन स्थळे आहेत त्याठिकाण्ी आपण पहिले तर प्लॅस्टीकच्या पिशव्याबरोबरच मिनरल वॉटरच्या ज्या बाटल्या असतात, त्याचा वापर करुन सर्रासपणे तेथे फेकण्यात येतात. यावर देखील शासनाने काही निर्बंध घालणे आवश्यक आहे. तसेच त्याठिकाणी अशा प्रकारे जे नियमांचा भंग करतात त्यांच्यावर काही कारवाई करणे आवश्यक आहे आणि तशी ती केलेली आहे काय असा माझा प्रश्न आहे. अशा प्रकारच्या अनेक गोष्टी आहेत. मी या सदनाचा फार वेळ घेणार नाही. यापूर्वी देखील या विषयाच्या संबंधातील प्रश्नोत्तराच्या दरम्यान आपण असे सांगितले होते की, याबाबतीत आपण महानगरपालिका आणि नगर परिषदांना अधिकार दिलेले आहेत आणि त्या प्रमाणे ते कारवाई करतात. पण महानगरपालिका असेल किंवा नगर परिषद असेल, त्यांनी याबाबतीत खरोखर कारवाई केलेली आहे काय किंवा महानगरपालिकेच्या माध्यमातून जी कारवाई केली जाते त्याबाबत राज्य शासनाच्या वतीने विचारणा करण्यात येणार आहे काय ?

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे (पर्यावरण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "राज्यात प्लास्टिकच्या पिशव्यांचा होणारा सर्रास वापर" या विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करताना आपले विचार व्यक्त केले.

सभापती महोदय, आपणा सर्वांना माहीत आहे दिनांक 26 जुलै 2006 रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे सर्वत्र पाणी साचले होते. प्लास्टिकच्या पिशव्यांमुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे लक्षात आल्यानंतर शासनाने सन 2006 मध्ये प्लास्टिक पिशव्यांच्या वापरा संदर्भात कायदा केला. त्यानुसार 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांवर बंदी घालण्यात आली. तसेच पिवशीचा आकार 8 x 12 इंचापर्यंत असावा असे देखील निर्बंध घालण्यात आले होते. या संदर्भात केंद्र शासनाची दिनांक 4.2.2011 रोजीची अधिसूचना आहे. या कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा स्थानिक स्वराज्य संस्था मग त्यामध्ये महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद कार्यालय आहे. ते या कायद्यानुसार संबंधितांवर दंडाची कारवाई करु शकते. 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीची प्लास्टिकची पिशवी आढळून आली नाही तर पहिल्यांदा पाच हजार रुपये दंड नंतर दहा हजार रुपये दंड आकारण्यात येतो. त्यानंतर पंचवीस हजार रुपये दंड आणि सजा आहे, अशा स्वरुपाच्या तरतूदी आहेत. हे काम स्थानिक संस्थांकडे आहे. या पूर्वी महानगरपालिकेने दंड आकारलेला आहे. महानगरपालिकेने कोणकोणती कारवाई केली याची माहिती पर्यावरण विभाग घेत असतो. परंतु त्यांच्याकडून परिपूर्ण माहिती प्राप्त होत नाही. ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी म्हणून राज्य स्तरावर सल्लागार समिती देखील नेमलेली आहे. त्या समितीमध्ये अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेकडून आतापर्यंत किती दंड वसूल झाला, किती जणांवर कारवाई केली या बाबत त्यांनी नियमित अहवाल द्यावा असे त्यांना सांगितलेले आहे.

सभापती महोदय, 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांवर उद्योग विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे कारवाई करता येते. त्या नुसार काही उद्योगांवर नोटीस देखील बजावलेली आहे तर काही उद्योग बंद केलेले आहेत. प्लास्टिक पिशव्यांचे उद्योग घरगुती देखील आहेत. ते आपल्या उद्योगाची नोंदणी करीत नाहीत त्यामुळे त्याची माहिती मिळत नाही. परंतु ज्या ठिकाणी असे उद्योग चालतात तेथे धाडी टाकण्यात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे....

येतात. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, भाजी मार्केट, मटन शॉप इत्यादी ठिकाणी कमी मायक्रॉनच्या पिशव्यांचा वापर होतो. 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या आढळून आल्यास दंड आकारण्याची तरतूद आहे. तेव्हा या निर्णयाची अत्यंत कठोरपणे कारवाई करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकांना सूचना देण्यात येतील.

सभापती महोदय, दिनांक 18 जून 2011 रोजी एक परिपत्रक प्रसिध्द केलेले आहे. त्याद्वारे लोकांचे जनरल ओपिनियन मागविलेले आहे. प्लास्टिक पिशव्यांव्यतिरिक्त कमी मायक्रॉनपेक्षा प्लास्टिकच्या वस्तू करण्यात येत असतील तरी त्या बाबत देखील कारवाई करण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन 2006 मध्ये जुलै महिन्यात मुंबईमध्ये जो महापूर आला त्यामध्ये 250 माणसे मेली. त्यावेळी पाहणी केली असता असे लक्षात आले की, प्लास्टिकच्या बॅगांमुळे पाण्याचा निचरा होऊ शकला नाही, त्यामुळे सर्वत्र पाणी साचले होते. माझी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी आता माझ्या सोबत यावे, मी त्यांना रस्त्यावरील परप्रांतीय फेरीवाल्यांकडे 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या सापडतील हे दाखवून देतो. त्यांना आपल्या कायद्याची काही पडलेली नाही. आतापर्यंत कायदा मोडला म्हणून किती फेरीवाल्यांना तुरुंगात पाठविले या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे आहे. मंत्री महोदय येथे सरकार म्हणून उत्तर देत आहेत. परंतु सरकार म्हणून आपले अस्तित्व बाहेर जाणवत नाही. ही जबाबदारी महानगरपालिकेची असेल तर महानगरपालिका काय करणार ? कारण पोलीसच संबंधितांवर गुन्हा नोंदविणार आणि तुरुंगात पाठविणार,

यानंतर श्री.बरवड..

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

पोलीस संध्याकाळी पिशवी घेऊन फिरतात. ते काय वाट लावणार ? ती सुध्दा त्यांनीच फुकट दिलेली प्लास्टीकची पिशवी असते. त्यामुळे कायद्याची ठोस अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात जबाबदारी म्हणून आपण उत्तर देऊन चालणार नाही. आपण या कायद्याची माहिती देऊ शकता पण कारवाई करण्याच्या बाबतीत गृह खातेच उत्तर देऊ शकते.

या महाराष्ट्रामध्ये एवढा मोठा अपघात झाल्यानंतर आणि एवढे सगळे झाल्यानंतर सुध्दा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आणि शासन म्हणून आपण उत्तर देणार आणि चर्चा संपली असे होता कामा नये. यामधून निष्पन्न काय झाले ? या सभागृहामध्ये अर्धा-तास चर्चा किंवा विविध आयुधांच्या माध्यमातून जे प्रश्न येतात त्याबाबत शासनाची निर्णायक काय भूमिका आहे हे आम्हाला कधीच कळत नाही. या ठिकाणी मी सन्माननीय सदस्यांना सांगत असतो की, आपण उगाच ओरडू नका. यामध्ये सरकारची बाजू घेण्याचा प्रश्न येत नाही. आपण या सदनामध्ये बसलेलो आहोत आणि सगळ्यांना वाटते की, हा त्रास आहे. त्या त्रासातून कसे मुक्त होणार हा प्रश्न आहे. टँकरचा विषय तसाच आहे. प्रदूषणाचा विषय तसाच आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितले की, एक प्रश्न विचारल्यावर पोल्यूशन बोर्डाचे लोक त्या गेले, त्या कारखान्याला नोटीस दिली. विधान परिषदेत प्रश्न आल्यानंतर तो कारखाना बंद झाला आणि 200 लोक बेकार झाले. इतके दिवस ते चालूच होते. आपण या ठिकाणी आम्हाला सगळे समजावून सांगत आहात पण बाहेर त्याबाबत कृती नसते.

सभागृहामध्ये सरकारची बाजू म्हणून शून्य कृती आराखडा सांगणे हेच जर मंत्र्याचे काम असेल तर राज्य सरकारला मंत्र्यांची गरज नाही. ते अधिकारी सुध्दा आम्हाला सांगू शकतात. निष्पन्न न होणाऱ्या कर्तृत्वाप्रमाणे जर शासन प्रत्येक सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देणार असेल तर ते बरोबर नाही. मी माननीय मंत्री महोदयांना दोष देत नाही. आपण ठाम भूमिका घ्यावयास पाहिजे. हा प्रश्न सभागृहामध्ये आल्यानंतर या प्रश्नाला मला उत्तर द्यावयाचे आहे त्यामुळे मी गृह खात्याच्या मंत्र्यांबरोबर बरोबर बैठक घेतली, सभागृहात सरकारच्या वतीने काय सांगू, किती कारवाई झाली, कोणावर कारवाई केली याची माहिती घेतली, हे करावयास पाहिजे. आताही

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....
आपण बाहेर गेलो तर प्लास्टीकच्या पिशव्या सापडणारच आहेत. त्यामुळे आम्हाला कृतिशील सरकार दिसणार आहे की नाही ? प्रत्येक वेळी चर्चा उपस्थित करावयाची, सगळे मांडावयाचे आणि काही निष्पन्न होत नाही, तसे होता कामा नये. त्या दृष्टीने आपल्याकडून अपेक्षा आहेत.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, प्लास्टीकच्या संदर्भातील प्रश्न हा राज्यातील असून ग्रामीण भागात, शहरी भागात जशी प्लास्टीकमुळे ड्रेनेज लाईन चोकअप होते त्याचप्रमाणे प्लास्टीकमुळे शेतकऱ्यांना सुध्दा अनेक अडचणी निर्माण होतात. ज्या ठिकाणी कचरा डंपींग करतात त्या ठिकाणी प्लास्टीक नसावयास पाहिजे असा कायदा आहे. या बाबतीत आपण महानगरपालिकेला अधिकार दिलेले आहेत. त्या ठिकाणी महानगरपालिकेचे पथक जाऊन दंडात्मक कारवाई करतात. जर एखादी स्थानिक स्वराज्य संस्था या बाबतीत दखल घेत नसेल तर त्यांच्यावर शासन कायद्याने काय कारवाई करणार ?

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, मघाशी सांगितल्याप्रमाणे जे उद्योग आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि उद्योग विभाग कारवाई करीत असतात. त्याचप्रमाणे अशा उद्योजकांकडून दंड वसूल करुन त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. 9 उद्योजकांनी प्लास्टीक पिशव्यांचे उत्पादन सुध्दा बंद केलेले आहे. भाज्यांसाठी वगैरे ज्या पिशव्या स्थानिक स्तरावर मिळतात त्या बाबतीत अंमलबजावणी करण्याकरिता महानगरपालिका किंवा ज्या ज्या संबंधित संस्था आहेत त्यांच्यावर जबाबदारी आहे. किती आढळले, काय कारवाई केली, याचा अहवाल त्यांच्याकडून आपण मागवतो. त्यांना दंडात्मक कारवाईचे अधिकार कायद्यामध्ये दिलेले आहेत. महानगरपालिकेचे जे आयुक्त आहेत त्यांना अधिकार दिलेले आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे अगोदर त्यांनी मोठ्या प्रमाणावर मोहीम राबविली आणि दोन वर्षे चांगल्या पध्दतीचे काम केले. आता त्या कामामध्ये शिथिलता आलेली आहे. 2005 मध्ये जो पूर आला ती पार्श्वभूमी लक्षात घेता ग्रामीण भागापासून सगळीकडे आता प्लास्टीकचा जो मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे त्याचा उद्या फार मोठ्या

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय देवतळे .....

प्रमाणावर परिणाम होणार आहे. त्यामुळे यामध्ये मी स्वत: लक्ष घालीन. या बाबतीत कडक अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने खरे म्हणजे प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत किंवा विविध स्वयंसेवी संस्थांमार्फत किंवा वेगवेगळी पथनाट्ये सादर करुन त्या माध्यमातून लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामध्ये लोकांचे सहकार्य सुध्दा आवश्यक आहे. त्या बाबतीत सुध्दा प्रयत्न होत आहे. जे लोक वापरतात त्यांच्यावर दंडात्मक कारवाईची तरतूद आहे त्याप्रमाणे कडक कारवाई होण्याच्या दृष्टीकोनातून मी स्वत: या बाबतीत नगरविकास खात्याचे सचिव यांच्याबरोबर त्या संदर्भात बैठक घेऊन त्याप्रमाणे पुढील अंमलबजावणी करण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, प्लास्टिकच्या पिशव्या हा राज्यात गंभीर विषय होत चालला आहे आणि त्यात वाढ होत जाणार आहे. प्लास्टिक पिशव्यांमुळे प्रदुषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होणार आहे. मंत्री महोदयांनी यासंबंधी केलेल्या उपाययोजनांची माहिती दिलेली आहे. शासनाकडून अनेक कायदे केले जातात. परंतु त्याची अंमलबजावणी कितपत होते त्याचा शासनाकडून आढावा घेतला जातो काय ? या कायद्याची अंमलबजावशी कशा प्रकारे करण्यात आली, कितीजणांवर कारवाई करण्यात आली, हे दर सहा महिन्यांनी, एक वर्षानंतर पाहण्यासाठी शासनाकडे यंत्रणा आहे काय, असल्यास त्यांच्यामार्फत कशा प्रकारे काम केले जात आहे ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की, प्लास्टिकच्या उद्योजकांकडून 2 लाख 30 हजार रुपयांचा दंड वसूल केलेला आहे. 9 उद्योजकांनी कायम स्वरुपी उद्योगही बंद केलेले आहेत. त्याचप्रमाणे या संदर्भातील कायद्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणारी यंत्रणा आहे, मग महानगरपालिका असेल, नगरपालिका असेल, त्यांची यासंबंधी मी स्वत: बैठक घेईन. दापोली नगरपंचायतीने प्लास्टिक पिशवी निर्मूलनासाठी सर्वांना सोबत घेऊन चांगले काम केलेले आहे. त्या धर्तीवर सर्वांचे सहकार्य घेऊन काळजी घेण्यात येईल.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, प्लास्टिक उद्योग हा चर्चेचा विषय आहे. प्लास्टिक निर्माता, उपभोक्ता आणि विक्रेता या तिघांची एक साखळी तयार झालेली आहे. आपण सर्वजण कळत नकळत उपभोक्त्यामध्ये येतो. यामध्ये आपला क्रमांक दुसरा असला तरी समाजामध्ये प्लास्टिकच्या पिशव्यासंबंधी जाणीव व जागृती निर्माण करणारी यंत्रणा असणे आवश्यक आहे. तसेच त्यावर कठोर उपाय करण्याची आवश्यकता आहे. प्लास्टिक पिशव्यांपासून होणारे प्रदूषण व मानवी आरोग्याला घातक घटक या दोन बाबी लक्षात घेऊनच शासनाने यासंबंधी कायदा केलेला आहे. या कायद्याची व्याप्ती वाढवून त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, याबाबत कायदा अस्तित्वात आहे. फक्त त्याची कठोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे हा खरा प्रश्न आहे.

**उप सभापती** : अर्धा तास चर्चा संपलेल्या आहेत.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही